कृषीवल

रायगड, बुधवार, दि. २७ नोव्हेंबर २०२४

किंमत ४ ₹

## पनवेलमध्ये बिंगो जुगार जोमात

**पनवेल :** पनवेल शहरातील खांदा कॉलनी येथील सेक्टर १० मध्ये एका इमारततीच्या दुकान गळ्यामध्ये बिंगो जुगार अड्डा जोमाने सुरूच आहे. ऐन विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता सुरू असतानाही खांदेश्वर पोलिसांच्या डोळ्यादेखत हा बेकायदेशीर जुगार सुरूच होता. हा जुगार अड्डा बंद करण्याबाबत खांदेश्वर पोलिसात तक्रार अर्ज सादर करूनदेखील हा जुगाराचा धंदा पोलिसांच्या आशीर्वादाने मोकाटपणे सुरूच होता, असे येथील रहिवाशांचे म्हणणे आहे. याबाबत नवी मुंबई पोलीस आयुक्तालय परिमंडळ-२ चे सहाय्यक पोलीस पान २ वर

HIRING ALERT
Looking For South Indian Cook
(Preffered Male Candidate)
Hotel : Outpost
Job Location : Alibaug
Salary As Per Industry Standards,
Age :- Below 40,
Relevant Experience : 4 to 6 years.
Interested candidates may connect immediately on 8010151284 / 7798467555 & email your latest resume on Sujit.patil@outpostalibaug.com& Pradeep.bhardwaj@Outpostalibaug.com and update your expected salary.

घरातील प्रत्येकासाठी!
MS-CIT
आंतरराष्ट्रीय दर्जाचा परिपूर्ण कॉम्प्युटर कोर्स
Powered by Artificial Intelligence (AI)
Learn Basic to Advanced
New Age Digital Skills
mscit.mkcl.org
प्रवेशासाठी आजच MS-CIT केंद्राशी संपर्क साधा.

आजचा अग्रलेख
**झारखंडातील थप्पड**

# रायगड जिल्ह्यात सात मतदारसंघांत ७२६४ मतांची तफावत

# आकडेवारीत घोळ

## निवडणूक आयोगाचा गडबड घोटाळा उघड

**प्रमोद जाधव**
**। अलिबाग ।**

विधानसभा निवडणुकीचा मतदारांचा डेटा, प्रत्यक्षात झालेले मतदान आणि मिळालेल्या मतांमध्ये फरक आढळून आला आहे. रायगड जिल्ह्यातील सात विधानसभा मतदारसंघांमधील केंद्रीय निववडणूक आयोगाच्या संकेत स्थळावरील मतदानाची आकडेवारी आणि जिल्हा निवडणूक आयोगाने सादर मतांची आकडेवारी यामध्ये मोठा घोळ दिसून येत आहे. केंद्रीय निवडणूक आयोगाच्या मते, रायगड जिल्ह्यात सात मतदारसंघांमध्ये अंतिम मतदान ६९.१५ टक्के होते. जिल्ह्यात एकूण मतदार १७,२१,०३८ इतके होते. त्यापैकी १७,२८,३०२ प्रत्यक्षात मतदान केले असून, संपूर्ण मतदानात ७२६४ इतकी वाढीव मते आढळून आली आहे. ही वाढीव मते आली कुठून, हा प्रश्न बुचकळ्यात टाकणारा आहे.

अलिबाग-मुरुड-रोहा मतदारसंघामध्ये एकूण ३,०६,२३० मतदार असून, त्यापैकी निवडणूक अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार २,३६,२४४ मतदारांनी मतदान केले. मात्र, प्रत्यक्षात उमेदवारांना मिळालेले मतदान २,३८,००० इतके आहे. याचा अर्थ, यामध्ये १७५६ मतदार वाढीव असल्याचे दिसून आले आहे.

कर्जत मतदारसंघामध्ये एकूण मतदार ३,१८,७४२ असून, त्यापैकी २,४०,०१० जणांनी मतदान केले. मात्र, मतपेटीत २,३९,९९९ इतकीत मते पडली आहेत. उर्वरित ११ मते गेली कुठे, असा सवालही उपस्थित होत आहे?

उरण मतदारसंघामध्ये ३,४२,१०१ मतदार असून, पैकी २,६२,७४७ जणांनी प्रत्यक्षात मतदान केल्याचे समजते. परंतु, प्रत्यक्षात उमेदवारांना २,६३,५४८ मते मिळाल्याचे आकडेवारीतून दिसून येते. त्यामुळे ८०१ वाढीव मते असून, ही मते नेमकी आली कुठून, ही आकडेवारी बुचकळ्यात टाकणारी आहे.

श्रीवर्धन मतदारसंघामधील मतदारांची संख्या २,६५,२८६ इतकी असून, त्यापैकी १,६२,७९४ मतदारांनी प्रत्यक्षात मतदान प्रक्रियेत सहभाग नोंदविल्याची आकडेवारी प्रसिद्ध करण्यात आली आहे. असे असताना प्रत्यक्षात मोजणीदरम्यान १,६३,९३९ मतदारांनी मतदान केल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे ११४५ इतका मतांचा आकडवा वाढल्याचे आकडेवारी सांगते. मग, ही वाढीव मते कुठून आली, याबाबत निवडणूक विभाग बोलायला तयार नाही.

महाड मतदारसंघात २,९६,३८८ इतके मतदार असून, त्यापैकी २,१२,०१६ इतक्या मतदारांनी प्रत्यक्षात मतदान केले आहे. मात्र, उमेदवारांना मिळालेल्या मतांची बेरीज २,१३,३२५ इतकी असल्याचे दिसून येते. त्यामुळे १३०९ इतकी वाढीव मते या मतदारसंघात आढळून आली आहेत.


पेण मतदारसंघामध्ये एकूण ३,०७,९७९ मतदारांची नोंद करण्यात आली आहे. त्यापैकी पान २ वर

## ५ लाख मतं गेली कुठे?

**मुंबई :** महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या निकालांमधील विसंगती आणि याबाबतच्या अनेक तक्रारी येत आहेत. या विसंगतींवर अद्याप निवडणूक आयोगाने भाष्य केलेले नाही. त्यांनी निवडणूक प्रक्रियेतील डेटा पारदर्शकता आणि अचूकतेचे महत्त्व बळकट केले आहे. नुकत्याच पार पडलेल्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुका २०२४ मधील मतदार डेटा आणि मतमोजणी आणि मिळालेल्या मतांमध्ये फरक आढळून आला आहे.

केंद्रीय निवडणूक आयोगाच्या मते, अंतिम मतदान ६६.०५% होते, जे एकूण मतदान झालेल्या ६४,०८८,१९५ मतदार होते. त्यात ३०,६४९,३१८ महिला, ३३,४३७,०५७ पुरुष आणि १८२० इतर यांचा समावेश आहे. अशा प्रकारे एकूण मतांची बेरीज ६४,५९२,५०८ आहे, जी एकूण मतदानाच्या मतांपेक्षा ५,०४,३१३ आहे. ५,०४,३१३ चा हा फरक संपूर्ण राज्यात मोजण्यात आलेल्या निव्वळ अतिरिक्त मते दिसून येत आहेत. ५ लाखांपेक्षा ही अधिकची मतं आली कुठून, असा सवाल उपस्थित होत आहे.

आठ मतदारसंघांमध्ये मतमोजणी झालेल्या मतांची संख्या मतदानापेक्षा कमी होती, तर उर्वरित २८० मतदारसंघांमध्ये, मतमोजणी करण्यात आलेल्या मतांपेक्षा जास्त होती. सर्वात मोठी तफावत आष्टी मतदारसंघात नोंदवली गेली. जिथे मतदानापेक्षा ४,५३८ मते जास्त पान २ वर




## भाजपला पाठिंब्याची चर्चा खोटी

■ जयंत पाटील घेतील तो निर्णय मला बंधनकारक
■ आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख यांचे स्पष्टीकरण

**। सांगोला । प्रतिनिधी ।**



शेतकरी कामगार पक्षाने कोणाला पाठिंबा द्यायचा याबाबत अद्याप कोणताही निर्णय घेतला नसल्याने भाजपच्या पाठिंबाबाबतची चर्चा आहे ती खोटी असून, मला बदनाम करण्याचा कट असल्याचे मत शेकापचे नूतन आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख यांनी व्यक्त केले. जर कोणाला पाठिंबा द्यायचा असेल, तर त्याबाबत निर्णय घेण्याचा अधिकार आमच्या पक्षाचे सरचिटणीस भाई जयंत पाटील यांना आहे. मी पक्षाचा पाईक आहे, पक्ष जो निर्णय घेईल, तो मलाही बंधनकारक असणार आहे, असेही आ. देशमुख म्हणाले.

सध्या मुंबईमध्ये सत्ता स्थापनेसाठी राजकीय घडामोडीला उधाण आले असून, त्यामध्ये सांगोल्याचे नूतन आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख यांनी भाजपला पाठिंबा दिला असल्याचे इलेक्ट्रॉनिक मीडियावर सांगण्यात येत आहे. त्याबाबत बोलताना आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख यांनी मत व्यक्त केले.

महायुतीला व विशेषतः भाजपला मोठे यश मिळाले आहे, त्यामुळे ते आमच्याशी कसे बोलतील. जर बहुमतासाठी गरज असती, तर ते आमच्या पक्षाशी बोलले असते. त्यांना बहुमत मिळाले आहे. सध्या जे काही प्रसिद्ध होत आहे, ते मला बदनाम करण्यासाठी कोणीतरी प्रयत्न करीत असेल, असे मला वाटत असल्याचेही आ. देशमुख यांनी सांगितले.

## वेधक

### ‘आगामी निवडणुका बॅलेट पेपरवर घ्या’

**उरण :** राज्यातील विधानसभा निवडणुकीचे निकाल धक्कादायक लागले आहेत. महाविकास आघाडी व पराभूत उमेदवारांनी ईव्हीएम मशीनवर संशय व्यक्त केला आहे. तसेच आगामी होणाऱ्या निवडणुका या बॅलेट पेपरवर घेण्याची मागणी जोर धरू लागली आहे. राज्यातील विधानसभा निवडणुकीनंतर आता महाराष्ट्रातील काही महापालिका, जिल्हा परिषद, नगरपालिका, ग्रामपंचायत अशा अनेक स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होणार आहेत. विधानसभा निवडणूक निकालानंतर पुन्हा एकदा ईव्हीएमचा मुद्दा उपस्थित केला जाऊ लागला आहे.

### जिल्हास्तरीय लोकशाही दिनाचे आयोजन

**अलिबाग :** प्रत्येक महिन्याच्या पहिल्या सोमवारी जिल्हास्तरीय लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येते. त्यानुसार डिसेंबर २०२४ मध्ये होणारा जिल्हास्तरीय लोकशाही दिन सोमवार, दि.२ डिसेंबर रोजी दुपारी १ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयाच्या राजस्व सभागृहात आयोजित करण्यात आला आहे. या दिवशी आपण स्वत: आपल्या कार्यालयाकडे प्रलंबित असलेल्या अर्जाच्या अद्ययावत माहितीसह उपस्थित राहावे, असे उपजिल्हाधिकारी (सा.प्र.) डॉ. रवींद्र शेळके यांनी कळविले आहे.

### राज्यसभेसाठी २० डिसेंबरला मतदान

**नवी दिल्ली :** राज्यसभेच्या सहा जागांसाठी २० डिसेंबर रोजी मतदान होणार आहे. केंद्रीय निवडणूक आयोगाने निवडणुकीची अधिसूचना जारी केली आहे. राज्यसभेच्या सहा जागांसाठी २० डिसेंबर रोजी निवडणूक होणार असून, त्याच दिवशी निकालही जाहीर होणार आहेत. आंध्र प्रदेशात तीन आणि ओडिशा, हरयाणा आणि पश्चिम बंगालमधील प्रत्येकी एका जागेसाठी ही निवडणूक होणार आहे. या निवडणुकीसाठी १० डिसेंबर ही नामांकनाची अंतिम तारीख आहे. तर ११ डिसेंबर रोजी उमेदवारी अर्जांची छाननी होणार आहे. १३ डिसेंबरपर्यंत नावे मागे घेण्याची मुदत आहे. २० डिसेंबर रोजी सकाळी ९ ते दुपारी ४ या वेळेत मतदान होणार आहे. त्याच दिवशी सायंकाळी ५ वाजल्यापासून मतमोजणी होणार आहे. त्यानंतर निकाल जाहीर करण्यात येणार आहेत.

## जिल्ह्यात संविधान दिन साजरा



**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी २६ नोव्हेंबर १९४९ रोजी भारताचे पहिले राष्ट्रपती डॉ. राजेंद्र प्रसाद यांच्याकडे संविधान सुपूर्द केले. त्यामुळे हा दिवस संविधान दिन म्हणून साजरा केला जातो. रायगड जिल्ह्यात वेगवेगळ्या शासकीय कार्यालयात संविधान दिन साजरा करण्यात आला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून त्यांना अभिवादन करण्यात आले.

**अलिबागमधील चेंढरे येथील समाजकल्याण विभाग सहाय्यक आयुक्त कार्यालयामार्फत संविधान दिन साजरा करण्यात आला. यावेळी सहाय्यक आयुक्त समाधान इंगळे, कार्यालयीन अधीक्षक माधुरी पाटील, समाजकल्याण निरीक्षक अंकुश पोळ आदींसह सर्व कर्मचारी उपस्थित होते.**

अलिबागमधील रायगड जिल्हा परिषदेच्या कार्यालयात संविधान दिन मंगळवारी (दि.२६) साजरा करण्यात आला. संविधान दिनानिमित्त जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड यांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार पान २ वर



● अलिबागच्या विठ्ठल-रखुमाईच्या पाच दिवसांच्या यात्रेला मंगळवारपासून प्रारंभ झाला. पहाटेपासूनच भाविकांनी मंदिरात दर्शनासाठी गर्दी केली होती. यात्रेनिमित्त विविध प्रकारची दुकाने थाटण्यात आली आहेत. (छायाचित्र : समीर मोलोदे)

## राज्यात गारठा वाढणार

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

राज्यात आता हळूहळू थंडीचा जोर वाढू लागला आहे. बांगलच्या उपसागरात कमी दाबाचा पट्टा तयार झाल्याने महाराष्ट्रावर त्याचा परिमाण होणार आहे. राज्यात तापमानात मोठी घट होताना दिसत आहे. रात्रीची थंडी वाढल्याने अनेक जिल्हे गारठले आहेत. पुणे, जळगाव, नाशिक, सातारा, कोल्हापूर, सांगली, जळगाव, भंडारा, चंद्रपूर, गोंदिया अशा जिल्ह्यांमध्ये तापमानात घट झाली आहे. कमाल तापमानात १ ते २ अंशांनी घट झाली आहे. त्यामुळे डिसेंबर महिन्यात आणखी थंडी वाढण्याची शक्यता पान २ वर

## पिकअपच्या धडकेत दुचाकीवरील दोघे गंभीर

**। खोपोली । प्रतिनिधी ।**

मुंबई-पुणे जुन्या महामार्गावर नडाळ गावाजवळ एका पिकअप गाडीने समोरील रस्ता ओलांडणाऱ्या दुचाकीला जोरदार धडक दिल्याने भीषण अपघात होऊन दुचाकीवरील चालक आणि एक महिला जखमी झाली आहे.



मुंबई-पुणे जुन्या महामार्गवरून मुंबईकडून पिकअप (एमएच १६-सीसी-१७०२) हा चालक अखिल बाबुलाल बागवान (३४, रा. मालंगी, ता. कर्जत, जि. अहमदनगर) घेऊन जात असताना तो नडाळजवळील श्रीराम ऑटो मॉलसमोर आल्यानंतर दुचाकी क्रमांक (एमएच ०५ डीवाय ८३१५) वरील चालक कुंदन गणेश पवार (२०, रा. ओवळे व पाठीमागे बसलेली महिला पान २ वर

## घंटागाडी न आल्यास प्रशासनाकडे तक्रार

# स्वच्छतेसाठी घराघरावर बारकोड

**। पनवेल । विशेष प्रतिनिधी ।**

स्वच्छ भारत अभियान प्रभावीपणे राबवण्यासाठी राज्य सरकारकडून घरोघरी सर्वेक्षण करून घराच्या दारावर बारकोड लावण्याचे काम सध्या पनवेल पालिका हद्दीत सुरु आहे. दारात दररोज घंटागाडी येते की नाही? दररोज प्रत्येक प्रभागात स्वच्छता होते की नाही? हेदेखील यामुळे प्रशासनाला कळणार असून, जर घंटागाडी आली नाही तर घरावर बसवलेला बारकोड स्कॅन करून नागरिक मोबाइलद्वारे थेट पालिका प्रशासनाकडे तक्रार करू शकणार आहेत. शहर स्वच्छतेसाठी उपयुक्त ठरू शकणारे हे बारकोड नागरिकांनी घरावर व दुकानावर बसवून घ्यावे व पालिकेला सहकार्य करावे, असे आवाहन प्रशासनाने केले जात आहे.

घंटागाडी प्रत्येकाच्या घराजवळ पोहोचावी, शहर स्वच्छतेत कोणतीही कसर राहू नये, हा यामागचा हेतू आहे. पनवेल शहरात या योजनेचा शुभारंभ झाला असून, येत्या काही दिवसात पालिका हद्दीतील प्रत्येक घरावर, दुकानावर अगदी शाळा व दवाखान्यावर, सार्वजनिक शौचालयावरदेखील हे बारकोड बसविण्यात येणार आहेत. त्याद्वारे प्रत्येक घर, शाळा, दवाखाना, दुकान, हॉटेल्स यांना एक विशिष्ट क्रमांक प्राप्त होणार आहे. घंटागाडी कर्मचारी प्रत्येक प्रभागात, प्रत्येक घराजवळ जाऊन संबंधित बारकोड स्कॅन करून मगच त्या ठिकाणचा ओला व सुका कचरा घेऊन घंटागाडीत टाकणार आहेत. या बारकोडमुळे घंटागाडी दारोदारी पोहोचू शकेल, असा विश्वास प्रशासनाला आहे.

**सद्यःस्थितीत प्रशासनाकडून नेमण्यात आलेल्या खासगी एजन्सीचे कर्मचारी पनवेल शहरात घरोघरी जाऊन सर्वेक्षण करून बारकोड बसवण्याचे काम करत आहेत. पनवेल शहारानंतर इतरही भागात हे काम सुरु होणार आहे.**

> **“सुरुवातीला प्रत्येकाच्या दारावर हे बारकोड लावण्यात येणार होते. मात्र, रहिवासी इमारतीत घंटागाडीतील कर्मचारी प्रत्येकाच्या दारावर जाणे शक्य नसल्याने इमारतीच्या प्रवेशद्वारावर अथवा बैठ्या चाळीच्या मुख्य भागात हे बारकोड बसवण्यात यावेत, अशी विनंती राज्य सरकारकडे करण्यात आली आहे.”**
> **– डॉ. वैभव विधाते, पालिका उपायुक्त**

## महामानवाने भेटी दिलेल्या स्थळाकडे दुर्लक्ष

**ऐतिहासिक, सांस्कृतिक स्थळांचा विकास कागदावरच**
**चरी येथील ग्रंथालय, वाचनालय, सभागृहाचे काम प्रलंबितच**

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

चरी येथील शेतकऱ्यांचा संप एक ऐतिहासिक लढा म्हणून संबोधला जातो. महामानवाने भेट दिलेल्या या स्थळाच्या विकासासाठी गेल्या सात वर्षांत निधीच आला नाही. ग्रंथालय, वाचनालय व सभागृहाचे काम अद्यापही कागदावर आहे. त्यामुळे हे ठिकाण दुर्लक्षित असल्याची माहिती समोर येत आहे.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सामाजिक, राजकीय, व आर्थिक क्षेत्रातील योगदान व आधुनिक भारत घडविण्यामध्ये मोलाचा सहभाग राहिला आहे. त्यांच्या संघर्षाची



समाजाला प्रेरणा मिळावी यासाठी शासनाने एक वेगळा उपक्रम हाती घेतला महामानवाच्या १२५ व्या जयंतीनिमित्त अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांसाठी ऐतिहासिक व सांस्कृतिकदृष्ट्या महत्त्वाची ठिकाणे, स्थळांचा विकास करण्यासाठी निधी मंजूर करण्यात आले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनाशी निगडीत पान २ वर

# अखेर बोर्लीपंचतनमधील वाहतूक कोंडी फुटणार

## ■ पोलिसांच्या समन्वयाने व्यापाऱ्यांची बैठक; दिलेल्या वेळेतच वाहनांना प्रवेश



**। दिघी । वार्ताहर ।**

श्रीवर्धन तालुक्यातील बोर्लीपंचतन शहराच्या मुख्य रस्त्यावर गेली अनके वर्षे वाहतूक कोंडी होत होती. यामुळे स्थानिकांसह पर्यटकांनाही मोठा त्रास सहन करावा लागत होता. मात्र, आता दिघी सागरी पोलीस ठाण्याचे प्रभारी सहा. पोलीस निरीक्षक हनुमंत शिंदे यांच्या समन्वयाने ही कोंडी फुटणार आहे.

या वाहतूक कोंडीबाबत प्रभारी अधिकारी शिंदे यांनी बोर्ली शहरातील सर्वच व्यापाऱ्यांची बैठक सोमवारी आयोजित केली होती. यावेळी मालवाहतुकीचे ट्रक कोणत्याही वेळेत पार्किंग करण्यावरून नाराजी व्यक्त केली.

दिवेआगर तसेच दिघी व श्रीवर्धनकडे जाण्यासाठी बोर्लीपंचतन हाच मुख्य मार्ग असल्याने या मार्गावर पर्यटकांची नेहमीच रेलचेल असते. याशिवाय स्थानिकांनादेखील या गाड्यांचा त्रास होतो. सध्या पर्यटन हंगाम सुरू झाला आहे. तसेच आजूबाजूच्या गावातील ग्रामस्थ खरेदीसाठी बोर्लीलाच येतात. शाळा व महाविद्यालयात जाणारे विद्यार्थी याच मार्गाने जातात. वाहनधारकांच्या रांगा प्रचंड लांब असल्यामुळे अर्धा-अर्धा तास वाहतुकीची कोंडी सुटत नव्हती.

राज्यातील प्रसिद्ध पर्यटन स्थळ म्हणून श्रीवर्धन तालुक्यातील दिवेआगरची ओळख आता वाढू लागली आहे. परिणामी, बोर्लीपंचतन शहरातील बाजार पेठेतील बेकायदा पार्किंगमुळे एसटी महामंडळाच्या लांब पल्याच्या गाड्या, पर्यटकांची ये-जा, सोबत दळण-वळणासाठी परिसरातील ३८ गावांचा सबंध असल्याने वाहतूक नियंत्रण न होण्यास कारण बनले होते. यावेळी पोलिसांकडून कोंडीवर कायमस्वरूपी नियोजन होत असल्याने लवकरच प्रवासी, पादचाऱ्यांची वाहतूक कोंडीतून सुटका होणार आहे.

### पोलिसांनी सुचवले हे उपाय

**व्यापाऱ्यांनी दुपारी यावेळेत माल उतरावा, एकाच वेळेला किराणा मालाचे ट्रक रस्त्यात पार्किंग करू नये, दिवेआगर पर्यटनसाठी वीकेंडला होणारी गर्दी पाहता, या दिवसात माल ट्रक बोलावू नये. आता पोलिसांच्या या नियोजनामुळे लवकरच चालकांना दिलासा मिळणार आहे.**

> **माल उतरताना ठरलेल्या नियोजनाप्रमाणे प्रत्येक व्यापाऱ्यांकडून पोलीस प्रशासनाला व वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी सहकार्य राहील.**
> **– मनुभाई कोठारी, अध्यक्ष, व्यापारी संघटना**

# २७ नोव्हेंबरला सार्वत्रिक सुट्टी द्यावी

### चरी ग्रा.पं.च्या सरपंचांची मागणी



**। पेण । प्रतिनिधी ।**

शेतकऱ्यांच्या चरीच्या संपाच्या ९१ व्या वर्धापन दिनाच्या पूर्वसंधेला चरी ग्रामपंचायतीचे सरपंच प्रशांत पाटील यांनी भविष्यात शासनाकडून योग्य कार्यवाही करुन २७ नोव्हेंबर या दिवशी जिल्ह्यात सार्वजनिक सुट्टी जाहीर करावी, अशी मागणी जिल्हा प्रशासनाकडे केली आहे.

ते म्हणाले की, जागतिक इतिहासात ज्या चरीच्या संपाचा उल्लेख आहे आणि तो एकमेव संप तब्बल सात वर्षे शेतकऱ्यांनी के.ना.ना. पाटील यांच्या नेतृत्वाने सुरू ठेवून यशस्वी केला. त्या शेतकरी संपाच्या आठवणी आता कुठे तरी लोप पावू लागल्या आहेत. म्हणूनच मी चरी गावचा सरपंच या नात्याने जिल्हा प्रशासनाला आवाहन करीत आहे की, शासनाकडून आपण योग्य ती कार्यवाही करून २७ नोव्हेंबर या दिवशी रायगड जिल्ह्यात सार्वत्रिक सुट्टी जाहीर करावी. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जयंतीला आणि महानिर्वाणदिनी सुट्टी जाहीर असल्याने लाखो डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे अनुयायी चैत्यभूमीत जातात, त्याचप्रमाणे जर २७ नोव्हेंबरला जिल्हा प्रशासनाने सुट्टी दिल्यास रायगड जिल्ह्यातील शेतकरी व शेतकऱ्यांची मुले एक दिवस तरी का होईना चरीच्या ऐतिहासिक भूमीत येऊन नतमस्तक होतील.

# ग्रामपंचायतीमध्ये संविधान दिन साजरा



**। उरण । वार्ताहर ।**

उरण तालुक्यातील ग्रामपंचायत कार्यालयात संविधान दिन मंगळवारी (दि.२६) साजरा करण्यात आला. संविधान दिनाचे औचित्य साधून धुतूम ग्रामपंचायतीच्या सरपंच सुचिता प्रेमनाथ ठाकूर यांनी ग्रामपंचायत कार्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून, संविधानाची शपथ शासकीय अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालयातील सदस्य यांच्या उपस्थितीत घेतली.

संविधान दिन किंवा राष्ट्रीय विधी दिन हा २६ नोव्हेंबर रोजी भारतभर साजरा केला जातो. २९ ऑगस्ट १९४७ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली भारतीय संविधानाच्या निर्मितीसाठी मसुदा समिती स्थापन झाली. अनेक बैठका व चर्चासत्रांनंतर या समितीने सादर केलेला अंतिम मसुदा २६ नोव्हेंबर १९४९ रोजी संविधान सभेने स्वीकारला.तेव्हापासून २६ नोव्हेंबर रोजी संविधान दिन साजरा केला जातो.

उरण तालुक्यातील अनेक ग्रामपंचायत कार्यालयात संविधान दिन साजरा करण्यात आला.धुतूम ग्रामपंचायतीच्या सरपंच सुचिता ठाकूर यांनी ग्रामपंचायतीचे ग्रामपंचायत अधिकारी नागनाथ घाडगे, उरण पंचायत समितीचे ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे उपअभियंता भटेश चव्हाण, माजी उपसरपंच कविता ठाकूर, ग्रामपंचायत सदस्य प्रेमनाथ ठाकूर यांनी संविधान दिनाचे औचित्य साधून ग्रामपंचायत कार्यालयात संविधानाची शपथ घेतली.

# पादचाऱ्याचा मृत्यू

**। पनवेल । वार्ताहर ।**

दुचाकीच्या धडकेने एका पादचाऱ्याचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना खांदा वसाहत परिसरात घडली आहे. कासम (४५) असे या पादचाऱ्याचे नाव असून, ते खांदा वसाहतीमधील खांदेश्वर मंदिर परिसरात राहतात. रात्रीच्या वेळी खांदेश्वर मंदिराच्या समोरुन रस्ता ओलांडून पलीकडे जात असताना पनवेलच्या दिशेने जाणाऱ्या दुचाकीने त्यांना जोरदार धडक दिली. त्यात ते गंभीररित्या जखमी झाले. व रुग्णालयात उपचारार्थ दाखल करण्यापूर्वीच त्यांचा मृत्यू झाला आहे. याप्रकरणी दुचाकी चालक अनिकेत सागवेकर याच्या विरुद्ध खांदेश्वर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

# पारंपरिक चरख्याचा उसाचा रस...



**■ वरसोली येथील विठ्ठल-रखुमाई मंदिर परिसरात यात्रा भरली असून, यात्रेत बैलाच्या सहाय्याने चालणाऱ्या चरख्यातून उसाचा रस काढला जात आहे. तो उसाचा रस पिण्यासाठी भाविक गर्दी करत आहेत. हे चरखे फक्त यात्रेमध्येच पहायला मिळतात.**
**(छायाचित्र : समीर मालोदे)**

पान १ वरून

## आकडेवारीत घोळ

२,२४,८९२ मतदारांनी मतदानाच्या दिवशी मतदान केल्याचे समजते. त्यानुसार २,२६,५२७ इतकी मते उमेदवारांना मिळाली असून, १६३५ इतकी मते अधिकची आहेत. पनवेल मतदारसंघामध्ये ६,५२,०६२ एकूण मतदार असून, त्यापैकी ३,८२,३३५ मतदारांनी प्रत्यक्षात मतदान प्रक्रियेत सहभाग नोंदविला आहे. त्यानुसार या मतदारसंघातील उमेदवारांना ३,८२,९६४ इतकी मते मिळाली आहेत. दरम्यान, ६२९ इतकी मते अधिकची असून, वाढीव मते आली कुठून, याबाबत प्रश्न उपस्थित करण्यात येत आहे.

याबाबत निवडणूक आयोगाकडे अनेक तक्रारी करण्यात आल्या आहेत. मात्र, त्यावर अद्याप कोणतीही प्रतिक्रिया आलेली नाही. विसंगतींचे प्रमाण निवडणुकीच्या निकालांवर त्यांच्या संभाव्य प्रभावाबद्दल प्रश्न निर्माण करते. शेकडो किंवा हजार मतांचा फरक निर्णायक असू शकतो, आणि अशी तफावत अनेक मतदारसंघांमध्ये अस्तित्वात असल्याने निकालांची अचूकता सुनिश्चित करण्यासाठी जवळून तपासणी करणे आवश्यक आहे. मतदानाच्या आकडेवारीतील घोळ याविषयी अधिक माहिती जाणून घेण्यासाठी निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न करण्यात आला असता तो होऊ शकला नाही. त्यामुळे आकडेवारीतील स्पष्टता समजू शकली नाही.

## ५ लाख मतं गेली कुठे?

मोजली गेली आणि धाराशिव मतदारसंघात, जिथे ४,१५५ मतांचा फरक होता. नवापूर मतदारसंघामध्ये मतदानापेक्षा जास्त मते मोजली गेली. नवापूर (अनुसूचित जमाती) विधानसभा मतदारसंघात, एउख डेटानुसार, एकूण मतदारांची संख्या २,९५,७८६ होती आणि मतदानाची टक्केवारी ८१.१५% होती. मात्र, एउख ने प्रकाशित केलेल्या निकालांनुसार, एकूण मतांची मोजणी २,४१,१९३ होती, जी मतदान झालेल्या मतांपेक्षा १,१७१ मते अधिक आहे. येथे उमेदवराचा विजय १,१२२ मतांनी झाला आहे. त्याचप्रमाणे मावळ विधानसभा मतदारसंघात, निवडणूक आयोगाच्या आकडेवारीनुसार, एकूण मतदारांची संख्या ३,८६,१७२ होती आणि मतदानाची टक्केवारी ७२.५९% होती. हे २० नोव्हेंबर २०२४ रोजी झालेल्या २,८०,३१९ मतांमध्ये भाषांतरित होते. तथापि, आयोगाने प्रकाशित केलेल्या निकालांनुसार, एकूण मतांची मोजणी २,७९,०८१ होती, जी मिळालेल्या मतांपेक्षा १,२३८ मते कमी आहेत. निवडणुकीत करण्यात आलेले मतदान आणि करण्यात आलेली मतमोजणी यात अनेक मतदारसंघात तफावत आढळून आली आहे. तसेच ईव्हीएमबाबतही अनेक पक्षांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. महाराष्ट्र निवडणुकीच्या निकालानंतर आता ईव्हीव्हीएमबाबत पुन्हा एकदा साशंकता व्यक्त करण्यात येत आहे.

## पनवेलमध्ये बिंगो जुगार जोमात

आयुक्त अशोक राजपूत यांच्यादेखील कानावर सदर बाब टाकण्यात आली असून, या जुगार अड्ड्यावर कारवाई करण्याचे आश्वासन पोलिसांमार्फत देण्यात आले. मात्र, सहाय्यक पोलीस आयुक्तांच्या आदेशाला झुगारून खांदेश्वर पोलीस अशा जुगार धंद्यांना पाठबळ देताना दिसत आहेत, अशी चर्चा आहे. याठिकाणी खालील खान हे सदरचा धंदा चालवीत असून, त्यांचे परिमंडळ-२ मध्ये इतरही ठिकाणी कामोठे, खांदा कॉलनी वैगेरे अशा प्रकारचे जुगार अड्डे सुरू आहेत. शहरामध्ये तरुणांना जुगाराकडे वळवून देशाचे भवितव्य असणाऱ्या युवा पिढीला बरबाद करण्याचे काम या जुगार अड्ड्यांमुळे होत असल्याने याठिकाणी कारवाई होणे गरजेचे आहे, तसेच सदर अवैध धंदे हे कायमस्वरूपी बंद करण्यात यावे, अशी मागणी पत्रकार सुरक्षा समितीच्या वतीने दिलेल्या तक्रार अर्जामध्ये करण्यात आली आहे.

सदरचा दुकान गाळा बाहेरून बंद करण्यात येत असला तरी आत ऑनलाईन बिंगो जुगार हा धंदा सुरू असतो. भिंतीवर जवळपास ७ ते ८ मशीन लावण्यात आल्या आहेत. त्यावर अनेकजण जुगार खेळत असतात. व्हिडिओ पार्लर चालविणाऱ्या खालील खान यांच्यामार्फत दिवसाढवळ्या करोडो रुपयांचा व्यवहार केला जात आहे. त्यामुळे युवा पिढीला वाचविण्यासाठी नवी मुंबई पोलीस आयुक्तालय हद्दीतील बिंगो जुगार कायमचे बंद करण्यात यावेत, अशी मागणीदेखील यावेळी करण्यात आली आहे. पोलीस प्रशासन मात्र याबाबत कारवाई करण्यासाठी धजावत आहेत, असेच चित्र सध्या समोर आले आहे. त्यामुळे नवी मुंबई पोलीस आयुक्तालय हद्दीतील परिमंडळ-१ आणि परिमंडळ-२ मधील तरुणाई बिघडविणारे अवैध धंदे बंद करण्यासाठी वेळीच उपोषणाचे हत्यार उपसले जाण्याची तयारी पत्रकार सुरक्षा समितीच्या पदाधिकाऱ्यांकडून करण्यात आली आहे.

## राज्यात गारठा वाढणार

हवामान विभागाने वर्तवली आहे.

हवामान विभागाच्या माहितीनुसार, रात्रीच्या तापमानानंतर काही शहरात कमाल किंवा किमान तापमानात घट होताना दिसत आहे. भारतीय हवामानशास्त्र विभागाच्या आकडेवारीनुसार, पुण्यात कमाल तापमान २८.४ अंश सेल्सिअस नोंदले गेले होते, जे या हंगामातील सर्वात कमी कमाल तापमान होते. तर किमान तापमान १२.१ अंश सेल्सिअस नोंदवले गेले होते. जे आजपर्यंतच्या हंगामातील सर्वात कमी किमान तापमान आहे. नोव्हेंबर महिना सुरु झाल्यापासून तापमानात चढ-उतार होत आहे.

## जिल्ह्यात संविधान दिन साजरा

अर्पण करीत आदरांजली वाहिली. यांनतर उपस्थित अधिकारी व कर्मचारी यांनी संविधानाच्या प्रास्ताविकेचे सामूहिक वाचन केले.

यावेळी जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यजित बडे, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा प्रकल्प संचालक प्रियदर्शनी मोरे, मुख्य लेखा वित्त अधिकारी राहुल कदम, ग्रामपंचायत विभाग उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजेंद्र भालेराव, प्राथमिक शिक्षण अधिकारी पुनिता गुरव, महिला व बालविकास अधिकारी निर्मला कुचिक, पशुसंवर्धन अधिकारी डॉ. शामराव कदम, बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता राहुल देवांग यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

अलिबाग शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून सामाजिक संस्थेमार्फत त्रिसरण व पंचशील घेण्यात आले. यावेळी महामानवाला अभिवादन करण्यात आले. त्यानंतर संविधानातील प्रास्ताविकेचे सामूहिक वाचन करण्यात आले. जिल्ह्यातील वेगवेगळ्या शासकीय कार्यालयात संविधान दिन साजरा करण्यात आला असून, सामाजिक, शैक्षणिक आदी विविध संस्थामार्फतदेखील हा दिन साजरा करण्यात आला. दरम्यान, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनाबद्दल माहिती देण्यात आली.

## ...दुचाकीवरील दोघे गंभीर

तेजस्विनी रमेश वारंगे, १९, रा. जासई) हे नडाळ चौक रस्ता ओलांडत असताना पाठीमागून येणाऱ्या पिकअपने जोरदार धडक दिली. या अपघातात दुचाकीवरील चालक आणि महिला गंभीर जखमी झाली असून, तयांना तात्काळ चौक येथील ग्रामीण रुग्णालयात पुढील उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे.

## महामानवाने भेटी दिलेल्या स्थळाकडे दुर्लक्ष

असलेल्या स्थळांचा विकास करून तो परिसर पर्यटनवाढीला चालना देण्यासाठी विकसित करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. या स्थळांच्या विकासासाठी ग्रामपंचायत, नगरपरिषद, विविध स्वयंसेवी संस्थांकडून प्रस्ताव घेऊन निधी वितरीत करण्याचे परिपत्रक २४ मार्च २०१७ मध्ये काढण्यात आले. अलिबाग तालुक्यातील चरी या ठिकाणी ९१ वर्षांपूर्वी शेतकऱ्यांनी सावकाराविरोधात संप पुकारला होता. शेतकऱ्याचे नेते नारायण नागू पाटील यांच्या नेतृत्वाखाली हा लढा करण्यात आला होता. प्रदीर्घ काळ हा संप चालला होता. या संपाला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी पाठिंबा देत अनेक वेळा चरीला भेट दिली होती. या सामाजिक चळवळीतून कसेल त्याची जमीन हा कायदा पारित झाला. सावकारी पाशात अडकलेल्या शेतकऱ्यांना मुक्त करण्यास यश आले. महामानवाने भेटी दिलेल्या स्थळांचा विकास करण्यासाठी शासनाने चरी येथील विकासासाठी एक कोटी रुपयांचा निधी मंजूर केला होता. ग्रंथालय, वाचनालय आणि सभागृह बांधण्याचे नियोजनही झाले होते. या कामाचे भूमीपूजनदेखील तत्कालीन मंत्र्यांच्या हस्ते झाले होते. परंतु, गेल्या सात वर्षांत या स्थळांच्या विकासासाठी निधीच उपलब्ध झाला नसल्याची माहिती जिल्हा परिषद बांधकाम विभागाकडून देण्यात आली आहे.

रायगड जिल्ह्यातील पदभार काही दिवसांपूर्वी हाती आला आहे. चरी येथील ऐतिहासिक स्थळाचा विकास करण्याबाबतची माहिती घेऊन पुढील कार्यवाही करून हा प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला जाईल, अशी ग्वाही, समाधान इंगळे, सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण विभाग यांनी दिली.

**चरी येथील ग्रंथालय, वाचनालय व सभागृहाच्या कामांसाठी निधी मंजूर झाला होता. परंतु, निधी अद्याप उपलब्ध झाले नसल्याने हे काम प्रलंबित राहिले आहे.**
**- राहुल देवांग, कार्यकारी अभियंता, रायगड जिल्हा परिषद**

# संविधान दिनानिमित्त विद्यार्थ्यांकडून पथनाट्य




**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत शहरात संविधान दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. अभिनव ज्ञान मंदिर संस्थेचे विद्यार्थ्यांनी पथनाट्याद्वारे भारतीय संविधानाचे महत्त्व पटवून देण्याचा प्रयत्न केला. त्यासाठी कर्जत नगरपरिषद कार्यलयातील आवारात आणि कर्जत रेल्वे स्थानकात पथनाट्य अभिनव शालेच्या विद्यार्थ्यांनी सादर केली.

२६ नोव्हेंबर रोजी संविधान देशाने स्वीकारले आणि त्यामुळे आजचा दिवस संविधान दिवस म्हणून साजरा करण्यात आला. त्यानिमित्ताने घर-घर संविधानांतर्गत संविधान आधारित पथनाट्य कर्जत नगरपरिषद आणि रेल्वे पोलीस यांच्या पुढाकाराने सादर करण्यात आले. या पथनाट्याच्या लेखन अभिनव शाळेचे चित्रा देशमुख आणि शाळेचे पर्यवेक्षक अनिल गलगले यांनी केले होते. या पथनाट्याचे सादरीकरण शाळेची विद्यार्थिनी तन्मयी सेठ व अन्य विद्यार्थ्यांनी केले. या पथनाट्याच्या रचना व लेखन, दिग्दर्शन रुपाली मोरे तसेच सहाय्यक चित्रा देशमुख आणि गीतांच्या चाली जयमाला जांभळे यांच्या होत्या. या पथनाट्यासाठी शिक्षक अशोक रोकडे, सुजित देशमुख,बळीराम डोंगरे, मधुरा पवार यांचे सहाय्य लाभले.

संविधान दिनानिमित्त पथनाट्य सादरीकरण कार्यक्रमाला कर्जत नगरपरिषद इमारतीच्या आवारात प्रशासक आणि मुख्याधिकारी वैभव गारवे तसेच अभिनव शाळेचे मुख्याध्यापक धुराजी शिंदे, उपमुख्याध्यापिका नीता बारगजे, पर्यवेक्षक, अनिल गलगले, ज्येष्ठ शिक्षिका मिताली मुसळे आदींसह कर्जत नगरपरिषदेचे कक्ष अधिकारी रवींद्र लाड, पाणीपुरवठा अधिकारी सुनील लाड हे उपस्थित होते. तर कर्जत रेल्वे स्थानकातदेखील अभिनव शाळेच्या विद्यार्थ्यांनी स्थानकातील प्रवाशांच्या समोर 'मी भारतमाता बोलतोय' हे पथनाट्य सादर केले. त्यावेळी कर्जत स्थानक रेल्वेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक मुकेश ढगे यांच्यासह कर्जत स्थानक प्रबंधक प्रभास लाल, गोपनीय विभागाचे पोलीस कर्मचारी राज बागुल आदी उपस्थित होते.

# मटारचे दर निम्म्यावर

**। पनवेल । वार्ताहर ।**

एकीकडे बोचऱ्या थंडीची चाहूल लागली की बाजारातही सगळीकडे टपोरे दाणे भरलेले हिरवे मटार नि लालचुटूक गाजरे नजरेस पडतात. मग आपसूक मटार पुलाव आणि गाजर हलव्याचे बेत ठरतात. सध्या पनवेल परिसरातील घाऊक आणि किरकोळ बाजारात हिरवा वाटाणा मोठ्या प्रमाणात दाखल होत आहे. त्यामुळे वर्षभर गगनाला भिडलेले दरही निम्म्यावर आले आहेत.

घाऊक तसेच किरकोळ बाजारात गगनाला भिडलेल्या वाटाण्याचा नोव्हेंबर अखेरीस स्वस्ताईचा हंगाम सुरू होतो. मुंबई कृषी उत्पन्न बाजारात हिरव्या वाटाण्याचा हंगाम सुरू झाला असून आवक वाढण्यास सुरुवात झाली आहे. त्यामुळे प्रतिकिलो शंभरी पार केलेल्या हिरव्या वाटाण्याचे दर निम्म्यावर उतरले आहेत. मागील आठवड्यात घाऊक बाजारात प्रतिकिलो १००-१२० रुपयांवरून उपलब्ध असलेला वाटाणा आता ६०-७० रुपयांवर विक्री होत आहेत. त्यामुळे किरकोळ बाजारातही वाटाणा आवाक्यात आहे.

# रक्तदान करून शहिदांना वाहिली आदरांजली




**। कर्जत । प्रतिनिधी ।**

२६/११ रोजी मुंबईवर झालेल्या दहशतवादी हल्ल्यात शहीद झालेल्या पोलीस अधिकारी आणि कर्मचारी यांच्या स्मरणार्थ कर्जतमध्ये रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले होते. ९५ रक्तदात्यांनी रक्तदान करून शहिदांना आदरांजली वाहिली आहे. सार्वजनिक रक्तदाता राजाभाऊ कोठारी यांनी आयोजित केलेले कर्जत-खालापूर तालुक्यातील ५०१ वे रक्तदान शिबीर ठरले.

कर्जत पोलीस ठाणे आणि सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने २६ /११ शहीद दिनाच्या निमित्ताने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. प्रारंभी शहिदांना श्रद्धांजली वाहण्यात आली. कर्जत पोलीस ठाण्याच्या सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान शिबिराचे उद्घाटन कर्जत पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सुरेंद्र गरड यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी सार्वजनिक रक्तदाते राजाभाऊ कोठारी, सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाचे अध्यक्ष आशिष गोखले, अभिजीत मराठे, सहाय्यक पोलीस निरीक्षक तौसिफ सय्यद, पोलीस उपनिरीक्षक निरीक्षक जयवंत वारा, पोलीस उपनिरीक्षक किर्तीकुमार गायकवाड, पोलीस ठाण्याचे अंमलदार उपस्थित होते. श्रीकृष्ण सुपे यांनी सर्वप्रथम रक्तदान करून रक्तदान शिबिराचा शुभारंभ केला. कल्याण येथील संकल्प रक्तकेंद्राच्या डॉ. सोनाली देसाई, राजशेखर नायर, समृद्धी देसाई, समृध्दी देसाई, अंजली दुबल, शितल पवार, रोहिणी ओटी, कल्पना जोशी, कोमल गौर आदींनी रक्तसंकलनाचे काम केले.

# संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन

**। पनवेल । वार्ताहर ।**

पनवेल महानगरपालिकेच्या मुख्यालयात मंगळवारी (दि. २६) 'संविधान दिवसानिमित्त' भारतीय संविधानाच्या उद्दिशिकेचे सामूहिक वाचन करण्यात आले.

यावेळी आयुक्त श्री. मंगेश चितळे यांनी आपल्या संविधान उद्देशिकेबाबत जाणीव जागृती निर्माण व्हावी, स्वातंत्र्य, समता, बंधुता याबाबत सजग होण्याच्या उद्देशाने या संविधान उद्देशिकेचे वाचन करण्यात आल्याचे सांगितले. तसेच महापालिका कार्यक्षेत्रात 'घर घर संविधान' अभियान राबविण्यात येणार असल्याचे सांगितले.

यावेळी अतिरिक्त आयुक्त भारत राठोड, उपायुक्त कैलास गावडे, उपायुक्त बाबासाहेब राजळे, उपायुक्त डॉ. वैभव विधाते, मुख्य लेखाधिकारी मंगेश गावडे, मुख्य लेखा परीक्षक निलेश नलावडे, मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. आनंद गोसावी, महापालिका अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

निवडक

## चार बांगलादेशींना अटक

**नवी मुंबई :** वाशीतील जुहू गावात बेकायदा वास्तव्यास असलेल्या चार बांगलादेशी नागरिकांना अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाने छापा मारून अटक केली. या कारवाईत तीन पुरुष व एका महिलेला ताब्यात घेण्यात आले आहे.रफिक समद शेख, आलामीन रफिक शेख,यामीन रफिक शेख व अकोली रफिक शेख (२०) अशी चौघांची नावे आहेत. त्यांनी बांगलादेशातील उपासमारीला कंटाळून भारतात बेकायदा प्रवेश केल्याची कबुली दिली. त्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## ८५ हजारांचे दागिने लुटले

**पनवेल :** रस्त्याने पायी चालत जात असलेल्या महिलेच्या गळ्यातील अडीच तोळे वजनाची ८५ हजारांची सोनसाखळी दुचाकीवरून आलेल्या दोघा लुटारूंनी खेचून पलायन केले. अनुराधा पाठक या कळंबोलीतील रोडपाली भागात राहण्यास असून रविवारी सायंकाळी त्या भाजीपाला आणण्यासाठी गेल्या होत्या. भाजीपाला खरेदी केल्यानंतर त्या घरी परतत होत्या. हंसध्वनी इमारतीसमोर दोघा लुटारूंपैकी पाठीमागे बसलेल्या एकाने ८५ हजार रुपये किमतीची सोनसाखळी खेचून पलायन केले.

## रक्तदान शिबिराचे आयोजन

**पोलादपूर :** सुंदरराव मोरे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयामध्ये प्रभाकर मोरे यांच्या जयंतीदिनाचे औचित्य साधून रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. महाड येथील जनकल्याण रक्तपेढीच्या विशेष सहकार्याने महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग व आजीवन अध्ययन तसेच विस्तार कार्य विभाग यांच्या विद्यमाने आयोजित केलेल्या शिबिरामध्ये इच्छुक रक्तदात्यांनी सहभाग व नावनोंदणीसाठी संपर्क साधावा, असे आवाहन केले आहे.

## २० लाखांचा मुद्देमाल जप्त

**पनवेल :** पोलिसांनी गॅसने भरलेला टँकर, तसेच गॅस भरण्यासाठी आणलेले ४२ रिकामे व्यावसायिक सिलिंडर व गॅसने भरलेले नऊ व्यावसायिक सिलिंडर, गॅस सिलिंडर नेण्यासाठी वापरण्यात येत असलेली जीप, स्कूटी,सिलिंडरमधून गॅस काढण्यासाठी वापरण्यात येत असलेले नोजल व मशीन व इतर साहित्य असा २० लाख २० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणातील टोळी गॅस सिलिंडर काळ्या बाजारात दोन ते अडीच हजार रुपयांमध्ये विकत असल्याचे आढळून आले आहे.

## फलकासाठी झाडांची छाटणी

**खारघर :** नागरिकांना जाहिरातीचे होर्डिंग व्यवस्थित दिसण्यासाठी झाडांची छाटणी केली जात असल्यामुळे पर्यावरणप्रेमींमध्ये नाराजी पसरली आहे. खारघर सेक्टर ३५ ते ४० परिसर तसेच अप्पर खारघर आणि तळोजा परिसरात मोठ्या प्रमाणात इमारतींची बांधकाम सुरू आहेत. त्यामुळे बांधकाम व्यावसायिकाकडून मोठ्या प्रमाणात जाहिरात केली जात आहे. दरम्यान, मुर्बी गावाकडे जाणाऱ्या रस्त्यावर असलेल्या सर्कलमध्ये उभ्या झाडांची छाटणी करून होर्डिंग उभारले जात आहेत.

# पीडितांना मायेचा आधार

### ■ मनोधैर्य योजनेतून २३९ जणांना एक कोटी ४८ लाख ७५ हजार रुपयांची मदत

**। अलिबाग । प्रमोद जाधव ।**

पीडित महिलांना सक्षम करून त्यांना उभारी देण्यासाठी जिल्हा विधी प्राधिकरणामार्फत ३१० पीडित महिलांना मायेचा आधार देण्यात आला आहे. सहा वर्षात मनोधैर्य योजनेतून एक कोटी ४८ लाख ७५ हजार रुपयांची मदत करण्यात आली आहे.

महिलांना स्व रक्षणाचे धडे देत त्यांना शारिरीक व मानसिकदृष्ट्या बळकट करण्याचे काम केले जात आहे. वेगवेगळ्या संस्था संघटनादेखील महिला सक्षमीकरणासाठी पुढाकार घेत आहेत. महिलांवरील अत्याचार रोखण्यासाठी वेगवेगळ्या योजना राबविल्या जातात. अत्याचार करणाऱ्या गुन्हेगारांना गंभीर शिक्षा व्हावी यासाठीदेखील प्रयत्न केला जातो. पोलिसांच्या मदतीने संबंधित गुन्ह्याचा तपास करून न्यायालयामार्फत त्यांना न्याय देण्याबरोबरच मानसिक व शारीरिक आघातामधून बाहेर काढण्याचा प्रयत्नदेखील होत आहे.

समुपदेशन करणे, वैद्यकिय व कायदेशीर मदत करणे, त्यांना आत्मविश्वास मिळवून देणे हेदेखील महत्वाचे आहे. पीडित महिलांना आर्थिक दृष्ट्या सक्षम आणि त्यांचे पुनर्वसन करण्यासाठी मनोधैर्य योजना सुरु करण्यात आली आहे. दोन ऑक्टोबर २०१३ पासून योजनेची अंमलबजावणी करण्यात आली.

महिला व बालकल्याण विभागामार्फत या योजनेची अंमलबजावणी केली जात आहे. पीडित महिलांची माहिती घेणे, समुपदेशन करणे, न्यायिक मदत करणे अशा कामांबरोबरच त्यांना अर्थसहाय्य केले जाते. गेल्या सहा वर्षात २०१८ पासून आतापर्यंत मनोधैर्य योजनेसाठी ८३४ अर्ज जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाकडे प्राप्त झाले आहेत. त्यामध्ये पडताळणी करून ३१० अर्ज पात्र ठरले असून ४८८ अर्ज वेगवेगळ्या तांत्रिक कारणामुळे अपात्र ठरले आहेत. एक कोटी ४८ लाख ७५ हजार रुपयांचा मदतीचा हात विधी सेवा प्राधिकरणाद्वारे देण्यात आला आहे. दुर्दैवी घटनेमुळे पीडित महिलेचे शारीरीक, मानसिक व आर्थिक नुकसान होते. त्यांचे मनोधैर्य वाढावे, त्यांना बळकट करण्यासाठी शासनाने मनोधैर्य योजना सुरु केली आहे.

### अर्थसहाय्याावर दृष्टीक्षेप

| वर्ष | अर्ज | पात्र | अपात्र | अर्थ सहाय्य( रुपये ) |
|---|---|---|---|---|
| २०१८ | ७६ | ४६ | ३० | ३ लाख ९० हजार |
| २०१९ | ६९ | ४० | २९ | १३ लाख ५० हजार |
| २०२० | ७१ | ३२ | ३९ | १५ लाख |
| २०२१ | ९७ | १६ | ८१ | ९ लाख ९० हजार |
| २०२२ | १६६ | ३२ | १३४ | ३१ लाख ८० हजार |
| २०२३ | २०९ | ९३ | ११६ | ५५ लाख १२ हजार ५०० |
| २०२४ | १४६ | ५१ | ४९ | १९ लाख ५२ हजार ५०० |
| एकूण | ८३४ | ३१० | ४८८ | १ कोटी ४८ लाख ७५ हजार |

> महिला व बालकल्याण विभागामार्फत ही योजना राबविली जाते. मनोधैर्य योजनेसाठी आलेल्या अर्जाची पडताळणी करून पिडीतांना आर्थिक आधार देण्याचा प्रयत्न केला जात आहे. महिलांचे पुनर्वसन करण्यासाठी ही योजना आहे. या योजनेमार्फत ३००हून अधिक महिलांना अर्थ सहाय्य करण्यात आले आहे.
> – अमोल शिंदे,
> – सचिव जिल्हा विधी प्राधिकरण सेवा, रायगड

# वाढीव वीज बिलांमुळे ग्रामस्थांमध्ये नाराजी


### तक्रारीकडे महावितरणाचे दुर्लक्ष

**महावितरणकडून देण्यात येणारे वीज देयक वेळेवर न भरणा केल्यास वीजजोडणी तत्काळ बंद केली जाते; मात्र ग्राहकांनी वाढीव बिलासंदर्भात तक्रार केल्यास त्याकडे दुर्लक्ष केले जाते. महावितरणच्या वरिष्ठांनी ग्रामस्थांना वाढीव वीजबिले का देण्यात आली? या विषयी कर्मचाऱ्यांकडे विचारणा करावी, तसेच योग्य प्रकारे वीजबिले देण्यात यावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून केली जात आहे.**

**। खारघर । वार्ताहर ।**

खारघरमधील ग्रामस्थांना मागील महिन्याची वीजबिले मिळाली असून या वीजबिलांमध्ये गत महिन्यांच्या तुलनेत अचानकपणे दुप्पट ते तिप्पट वाढ झाली आहे. त्यामुळे ग्रामस्थांमध्ये नाराजी पसरली असून महावितरणकडून रिडींग न घेताच बिल पाठविले जात असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.

खारघर प्रकल्पग्रस्त गावची लोकसंख्या पाच हजारांहून अधिक आहे. ग्रामस्थांची शेतजमीन सिडकोकडे हस्तांतरण झाल्यामुळे बहुतांश सुशिक्षित तरुण रिक्षा तसेच जे मिळेल ते काम करून कुटुंबाचा उदनिर्वाह करीत आहेत; तर काही ग्रामस्थ खोली भाड्याने देऊन उपजीविका करीत आहेत. दरम्यान, वीजबिलापोटी येणारे देयक नियमितपणे भरणा करीत असताना मागील महिन्यात बहुतांश ग्रामस्थांना वीजबिलांमध्ये गत महिन्यांच्या तुलनेत अचानकपणे दुप्पट ते तिप्पट वाढ करून वीजबिल पाठविण्यात आले आहे.




काही ग्रामस्थांना मासिक अडीच ते पाच हजार रुपये; तर काहींना १८ ते २५ हजार रुपये वाढीव बिले देण्यात आल्यामुळे ग्रामस्थांमध्ये नाराजी पसरली आहे. महावितरणकडून रिडींग न घेताच वीजबिल पाठविले जात असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला असून म हावितरणने वीज मीटरची तपासणी करून त्यातील दोष दूर क न योग्य ती वीजबिले देण्यात यावीत, अशी मागणी केली जात आहे.

> महावितरणकडून दुप्पट बिले देण्यात आली आहेत. रिडींग न घेता बिल दिल्याचे दिसून येते. महावितरणच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी ही समस्या दूर करावी.
> – यश खेडेकर, ग्रामस्थ, खारघर गाव

# डॉक्टरांनी रुग्णांना उत्तम सेवा द्यावी

### ■ किशन जावळे यांचे निर्देश



**। रायगड । प्रतिनिधी ।**

जिल्ह्यात सर्पदंश सगळीकडे होत असतात, यामध्ये विंचूदंश हे विशेष असून डॉक्टरांनी सर्पदंश व विंचू दंश झालेल्या रुग्णांना उत्तम सेवा देवून त्यांची काळजी घ्यावी, असे निर्देश जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी दिले.

रायगड जिल्हा मध्यवर्ती बँक कॉन्फरन्स हॉल येथे आयोजित कार्यशाळेत ते बोलत होते. या कार्यशाळेला जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.भरत बास्टेवाट, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.अंबादास देवमाने, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. मनिषा विखे, पद्मश्री डॉ.हिम्मतराव बावस्कर आदी उपस्थित होते.

यावेळी जिल्हाधिकारी किशन जावळे म्हणाले की, रायगड जिल्हा जंगळमय असून समुद्र तटी आहे. त्यातच जिल्ह्यात पावसाचे प्रमाण जास्त असल्यामुळे सरपटणारे प्राणी याकाळात बाहेर येवून मानवीवस्तीत येत असतात. त्यामुळे सर्पदंश व विंचूदंशाचे प्रमाण वाढत आहे. याकरिता वेगळ्या दिशेने संशोधन करणे गरजेचे आहे. शासनाकडून वैद्यकीय सेवेकरिता डॉक्टर घडावेत याकरिता मोठ्या प्रमाणावर खर्च केला जात आहे.यासाठी डॉक्टरांनी आपल्या ज्ञानाचा उपयोग जनसेवेसाठी करावा, अशा सूचना त्यांनी संबंधितांना दिल्या.

मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.भरत बास्टेवाट म्हणाले की, डॉ.हिम्मतराव बावस्कर यांनी जिल्ह्यात अनेक प्रकारच्या विंचूदंशावर उपचार करुन नागरिकांना जीवदान दिले असल्यामुळे त्यांच्या या कार्याची दखल घेत त्यांना शासनाकडून पद्मभूषण ही पदवी देण्यात आली असून ती कौतुकास्पद आहे. जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रात कार्यरत असलेल्या डॉक्टरांनी मुख्यालयात राहून जनसेवा करावी, अशा सूचना त्यांनी यावेळी संबंधितांना दिल्या. कार्यशाळेची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दिपप्रज्वलन करुन करण्यात आली. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन डॉ.फाळके यांनी मानले.

# वडखळ बायपासमुळे व्यावसायिक अडचणीत

**। वडखळ । वार्ताहर ।**

मुंबई-गोवा महामार्गाच्या चौपदरीकरणाचे काम जोरात सुरू आहे, मात्र यामुळे पेण तालुक्यातील मध्यवर्ती ठिकाण असणाऱ्या वडखळ येथील बाजारपेठेला याचा सर्वाधिक फटका बसत आहे.

वडखळ येथे येणाऱ्या प्रवाशांना वळसा घेऊन बाजारपेठेत यावे लागते. त्यामुळे ग्राहक संख्या कमी झाली असून येथील व्यवसायावर त्याचा परिणाम झाला आहे. त्यामुळे रोडे- कांदळे फाट्यापासून सदर रस्ता सरळ वडखळला जोडण्यात यावा, अशी मागणी येथील व्यावसायिकांसह ग्रामस्थांनी केली आहे.



एकेकाळी रायगड जिल्ह्यातील सर्वांत मोठी बाजारपेठ म्हणून वडखळकडे पाहिले जात होते. गेल्या अनेक वर्षांपासून सफेद कांदे, ओली- सुकी मासळी, पोहे, पापड, भात, मीठ, मोठ-मोठी हॉटेल्स, स्पेअर पार्ट दुकाने यासह येथील ग्रामीण भागातील नागरिकांकडून विक्रीसाठी येणारा भाजीपाला मोठ्या प्रमाणात आणि ताजेतवाने मिळत असल्याने मुंबई, पनवेलकडून येणारे पर्यटक येथे थांबून अनेक वस्तूंची मोठ्या प्रमाणात खरेदी करत होते. मात्र मुंबई-गोवा महामार्गाच्या चौपदरीकरणात वडखळ बायपास रस्ता झाल्याने पर्यटकांसह ग्राहकांची संख्या अत्यंत कमी झाली आहे.

बाजारपेठेत ये-जा करणाऱ्या वाहनांना तसेच विद्यार्थी, कामगार, ज्येष्ठ नागरिकांना अंतर्गत रस्त्यातून वळसा घालून यावे लागते. त्यामुळे कादळे गावाच्या पुढे ठेवण्यात आलेल्या महामार्गाच्या खालील बोगद्यामुळे अपघात होण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे.

त्यामुळे रोडे-कांदळे फाट्याजवळून सरळ रस्ता वडखळला जोडण्यात यावा, याकरिता वडखळ ग्रामपंचायतीच्या वतीने अनेकदा पत्र व्यवहार करण्यात आला आहे.

> वडखळ बाजारपेठ होती, मात्र महामार्गाच्या चुकीच्या धोरणामुळे बाजारपेठ बंद होण्याच्या मार्गावर आली आहे. अनेकांचे व्यवसाय बंद झाले आहेत. वडखळकडे येणारा अंतर्गत रस्ता रोडे फाट्यापासून सरळ करण्यात यावा, अशी मागणी करण्यात आली आहे.
> –प्रभाकर म्हात्रे, ग्रामस्थ.

# ऐनवहाळ येथील रमेश गोळे यांचे निधन

**। खांब । वार्ताहर ।**

रोहा तालुक्यातील ऐनवहाळ येथील सामाजिक कार्यकर्ते रमेश सखाराम गोळे यांचे शुक्रवारी (दि.२२) वयाच्या ६४ व्या वर्षी अल्पशा आजाराने राहत्या घरी निधन झाले.



रमेश गोळे यांनी आपल्या हयातीत सामाजिक बांधिलकीच्या नात्यातून समाजासाठी व आपल्या गावासाठी बहुमोलाचे योगदान दिले होते.तर आपल्या गावाच्या विकासात त्यांचा मोठा वाटा होता. त्यांच्या निधनाचे वृत्त समजताच समाजातील विविध क्षेत्रातील मान्यवर मंडळी यांच्यासह त्यांचे आप्तस्वकीय मित्रपरिवार सगेसोयरे यांनी त्यांच्या निवासस्थानी भेट देऊन त्यांचे अंत्यदर्शन घेऊन त्यांच्या परिवाराचे सांत्वन केले.त्यांच्या पश्चात पत्नी दोन मुले एक मुलगी सुना जावई नातवंडे असा परिवार असून त्यांचे दशक्रियाविधी १ डिसेंबर तर अंतिम धार्मिकविधी ३ डिसेंबर रोजी राहत्या निवासस्थानी होणार आहे.

## कोलाड येथे संविधान दिवस साजरा

**। कोलाड । वार्ताहर ।**

कोलाड गोवे येथील तटकरे तंत्रनिकेतन व आयटीआय येथे आज २६ नोव्हेंबर भारतीय संविधान दिवस मोठ्या उत्साहात संपन्न करण्यात आला.या कार्यक्रमाच्या सुरूवातीला प्राचार्य विपुल मसाल व आयटीआयचे प्राचार्य हजारे यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून भारतीय घटनेचे शिल्पकार, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पमालिका अर्पण करण्यात आली.

यावेळी विद्यार्थी शिक्षक तथा शिक्षकेतर कर्मचारी वर्ग उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या सुरूवातीला संविधान प्रतिज्ञेचे सामुदायिक वाचन करण्यात आले. यानंतर उपस्थित मान्यवरांकडून संविधान दिनाचे महत्त्व समजवण्यात आले.

# ‘संविधान दिवस हा भारतीयांसाठी सोनेरी दिवस’

### ■ मुरुडच्या वसंतराव नाईक महाविद्यालयात संविधान दिन साजरा

**। कोर्लई । वार्ताहर ।**

आपल्याला बोलण्याची संधी नव्हती, विचार मांडण्याची पाबंदी होती,भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधान यामुळे अंधारी रात्र सरुन उष:काल झाला. संविधानाने जगण्याचा हक्क निर्माण झाला, या संविधान कॉन्स्टिट्यूशनला राष्ट्रीय कायदा दिवस म्हटले जाते. असे प्रतिपादन मुरुडच्या वसंतराव नाईक महाविद्यालयात संविधान दिवस निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात माजी विद्यार्थीनी तथा ॲड. विद्या देऊळकर यांनी केले.



यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जे.के.कांबळे, ॲड. विद्या देऊळकर, ॲड. मनाली सतविडकर, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. एस. एस. भैरगुंडे, प्रा.डॉ.जी.डी.मुनेश्वर, प्रा. डॉ. एस. एल. म्हात्रे, प्रा. डॉ. एन. एन. बागूल, प्रा. डॉ. सीमा नाहिद, प्रा. चिंतन पोतदार, प्रा. प्रणव बागवे आदी महाविद्यालयीन विद्यार्थी उपस्थित होते.

यावेळी बोलताना ॲड. विद्या देऊळकर यांनी सांगितले कि, आज मी जे शिक्षण घेतले आणि तुमच्यासमोर उभी आहे. ती या संविधानामुळेच. शिक्षणामुळे माणसाकडे दूरदृष्टी, प्रगल्भता, मुक्ती संपन्न, तत्ववेत्ता विद्वान होण्याची संधी संविधान व शिक्षण देते, संविधानामुळे जात, धर्म, भेद, वर्ण, पंथ याचा भेदभाव कुठे ठेवलेला नाही तर आपल्याला एकात्मतेने कसे जगावे हे शिकवले आहे. न्यायासाठी लढा देणे व न्याय मिळवणेही संविधानाने शिकवले आहे. हे सर्व ज्ञान दान रुपाने आपल्याला भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी दिले असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी ॲड.मनाली सतविडकर यांनी आपले विचार मांडले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ.जे.के.कांबळे यांनी केले तर सुत्रसंचलन व आभार प्रा.डॉ.एम. पी.गायकवाड यांनी मानले.

## बालाजी सावंत यांना पत्नीशोक

**पाली :** नांदगाव येथील सामाजिक कार्यकर्ते बालाजी सावंत यांच्या पत्नी, तसेच नांदगाव विभाग सुधागड तालुका अध्यक्ष सुधीर सावंत यांच्या मातोश्री अर्चना सावंत यांचे अल्पशा आजाराने नुकतेच निधन झाले. मृत्यूसमयी त्या ६३ वर्षाच्या होत्या. त्यांच्या अंत्यविधीसाठी रायगड जिल्ह्यातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक आणि शैक्षणिक क्षेत्रातील नागरिकांसह त्यांचे सगेसोयरे उपस्थित होते. नांदगाव येथे त्यांच्यावर अंतिम संस्कार करण्यात आले. त्यांचे पश्चात दोन मुलगे, एक मुलगी, सुना, नातवंडे, पतवंडे असा मोठा परिवार आहे.त्यांचे दशक्रिया विधी शनिवारी (दि.३०) सकाळी ९ वाजता नांदगाव येथे तसेच उत्तरकार्य मंगळवारी (दि.३) रहात्या घरी होणार आहेत.


### वैध मतांच्या तुलनेत अपेक्षित मते न मिळाल्याचा फटका

# निवडणुकीत 54 जणांचे डिपॉझिट जप्त

**। रायगड । प्रतिनिधी ।**

**निवडणूक प्रचारामध्ये विरोधकांचे डिपॉझिट म्हणजेच अनामत रक्कम जप्त करू, अशा वल्गना अनेक उमेदवारांकडून केल्या जातात. हे डिपॉझिट जप्त करणे म्हणजे काय, असा प्रश्न अनेक मतदारांना पडतो. एकूण वैध मतांच्या तुलनेत अपेक्षित मते न मिळाल्यास उमेदवारांची अनामत रक्कम जप्त केली जाते. जिल्ह्यामधील सात विधानसभा मतदारसंघात निवडणूक लढवणाऱ्या ७३ उमेदवारांपैकी तब्बल ५४ उमेदवारांचे डिपॉझिट जप्त झाले आहे.**

जिल्ह्यातील महाड, श्रीवर्धन, अलिबाग, पेण, उरण, कर्जत व पनवेल या सात मतदारसंघांमध्ये २० नोव्हेंबरला विधानसभेची निवडणूक पार पडली. जिल्ह्यातील या सात मतदारसंघामध्ये १११ जणांनी उमेदवारी अर्ज दाखल केले होते. त्यापैकी ३८ उमेदवारांनी अर्ज मागे घेतल्याने प्रत्यक्ष निवडणूक रिंगणात ७३ उमेदवार होते. यामध्ये महाड विधानसभा मतदारसंघातून पाच, पनवेल येथून १३, कर्जत येथून नऊ, उरणमधून १४, पेणमधून सात, अलिबागमधून १४, तर श्रीवर्धनमधून ११ उमेदवार निवडणूक रिंगणात होते. या उमेदवारांपैकी निवडणुकीत विजयी झालेले सात उमेदवार व पराभूत झालेल्या इतर १२ अशा एकूण १९ उमेदवारांनी आपली अनामत रक्कम वाचवली, परंतु उर्वरित ५४ उमेदवारांचे मात्र अनामत रक्कम जप्त करण्यात आली आहे. ही अनामत रक्कम आता सरकारी तिजोरीत जमा होणार आहे.



लोकप्रतिनिधी कायदा १९५१ नुसार संसदीय किंवा विधानसभा निवडणूक लढवणाऱ्या प्रत्येक उमेदवाराला विशिष्ट सुरक्षा रक्कम जमा करणे बंधनकारक आहे.

यालाच अनामत रक्कम असे म्हणतात लोकसभा निवडणुकांसाठी ही रक्कम पंचवीस हजार रुपये, तर विधानसभा निवडणुकीसाठी ही रक्कम १० हजार रुपये, अशी प्रत्येक उमेदवारामागे असते. कोणीही उठून निवडणुकीचे नामांकन भरू नये यासाठी ही तजवीज केलेली आहे.

लोकप्रतिनिधी कायदा १९५१ नुसार निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराला मतदारसंघातील एकूण वैध मतांच्या एक षष्ठांश पेक्षा कमी मते मिळाली, तर त्याची सुरक्षा ठेव म्हणजेच अनामत रक्कम जप्त केली जाते. एखाद्या निवडणुकीत एकूण एक लाख ८० हजार वैध मते असतील, तर आपली सुरक्षा रक्कम म्हणजेच अनामत रक्कम वाचवण्यासाठी निवडणूक लढवणाऱ्या प्रत्येक उमेदवाराला या मतांच्या एक षष्ठांश म्हणजेच किमान ३० हजार मते मिळवावी लागतात. २०१९ च्या लोकसभा निवडणुकीमध्ये ८६ टक्के उमेदवारांनी आपली अनामत रक्कम गमावली होती.

### डिपॉजिट जप्त झालेले उमेदवार

| मतदारसंघ | उमेदवार |
|---|---|
| महाड | ३ |
| अलिबाग | ११ |
| पेण | ४ |
| कर्जत | ६ |
| श्रीवर्धन | ९ |
| पनवेल | १० |
| उरण | ११ |

# नांदगाव विद्यालयात अमृत महोत्सवी संविधान दिन साजरा



**। पाली/गोमाशी । वार्ताहर।**

संत नामदेव माध्यमिक विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय नांदगाव येथे मंगळवारी (दि.२६) संविधान दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमात शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी सर्वांनी मिळून संविधान उद्देशिकेचे वाचन केले. संविधान दिनानिमित्त सोनल ठकोरे, महेंद्र जाधव, अशोक शिंदे यांनी संविधानाची महत्वाची कलमे, नागरिकांचे मुलभूत हक्क व कर्तव्य यांची सखोल माहिती दिली. तसेच मुळात संविधानाची गरज का आहे याबाबत सविस्तर विवेचन केले. आणि संविधान विषयी सखोल माहिती देवून जनजागृती केली. या कार्यक्रमास अशोक शिंदे, महेंद्र जाधव, महेंद्र निकुंभ, नागेश सायगावकर, स्वाती शिंदे, तन्मयी शिंदे, सोनल ठकोरे, जयश्री अहिरराव आदी उपस्थित होते.

# झारखंडातील थप्पड

लोकशाहीमध्ये निवडणुका म्हणजे जनमताची चाचणी असते. देशाचा वा राज्याचा विकास कसा व्हावा, कोणत्या प्रश्नांना प्राधान्य द्यावे, कोणते प्रकल्प हाती घ्यावेत इत्यादी गोष्टींची चर्चा निवडणूक प्रचारात व्हावी अशी अपेक्षा असते. जनता सर्व पक्षांच्या बाजू ऐकून त्यावर आपला फैसला मतदानातून देईल अशी यातील कल्पना आहे. राजकीय पक्षांचे चारित्र्य, नेत्यांचा प्रामाणिकपणा, सर्वांना बरोबर घेऊन जाण्याची वृत्ती यांचीही यात परीक्षा होत असते. भाजपवाल्यांनी हे वातावरण गढूळ करून टाकले आहे. शत्रुदेशाशी लढत असल्याप्रमाणे ते निवडणुका लढवतात. प्रत्येक वेळी काही ना काही विषारी प्रचार करतात. त्यासाठी एकाहून एक विघातक मुद्दे मांडतात. विरोधक हे जणू देशद्रोही असावेत अशी टीका त्यांच्यावर करतात. वेगवेगळ्या मार्गांनी हिंदू विरुध्द मुस्लिम असा संघर्ष पेटवणे हा त्यांचा अजेंडा असतो. महाराष्ट्रात लव्ह जिहादविरुध्द धर्मयुध्द करण्याची हाळी देवेंद्र फडणवीसांनी दिली. झारखंडमध्ये बांगलादेशी मुस्लिम घुसखोरी करीत असल्याची आवई उठवण्यात आली. हे घुसखोर आदिवासींच्या जमिनी हडप करीत आहेत, स्थानिक महिलांशी लग्ने करून आपली लोकसंख्या वाढवत आहेत हा यंदाच्या निवडणुकीतला भाजपचा मुख्य मुद्दा होता. वास्तविक झारखंडला कोणत्याही परकीय देशाची सीमा लागलेली नाही. बांगलादेशाची सीमाही येथून भरपूर लांब आहे. शिवाय, हे घुसखोर मुंबई वा दिल्लीसारख्या महानगरांमध्ये लपून राहू शकतात. झारखंडसारख्या कमी लोकसंख्येच्या व कमी विकसित राज्यात ते लोकांच्या दृष्टीस न पडणं हे कठीण आहे. पण भाजपचे धाडस असे की, तरीही अगदी पंतप्रधानांपासून सर्वांनी हा पूर्णपणे खोटा प्रचार पुढे रेटला. चांगली गोष्ट अशी की झारखंडची जनता पुरोगामी व विचारी महाराष्ट्रापेक्षा अधिक सूज्ञ व विचारी निघाली. तिने हा प्रचार पूर्णपणे नाकारला व भाजपच्या जवळपास कानाखाली आवाज काढला. लड के लिया महाराष्ट्र, हंस के लेंगे झारखंड असे भाजपला वाटत होते. त्यांना चांगला धडा तेथील जनतेने शिकवला आहे.

## सोरेन यांचा पराक्रम

झारखंडच्या निवडणुका महाराष्ट्रासोबत झाल्या. मात्र आकाराने महाराष्ट्राच्या एकतृतियांश इतकेच असलेल्या या राज्यात दोन टप्प्यांमध्ये मतदान घेण्यात आले. कारण एकच. मोदी आणि बाकीच्या नेत्यांना भरपूर प्रचार करता यावा. पण तमाम सर्व प्रयत्न करूनही तेथील मतदारांनी भाजपला सणसणीत चपराक लगावली. हेमंत सोरेन यांच्या नेतृत्वाखालील झारखंड मुक्ती मोर्चा पुन्हा सत्तेत आला. सोरेन यांच्या पक्षाला गेल्या वेळपक्षा नऊ टक्के मते अधिक मिळाली. एकूण ४३ लढवलेल्या जागांपैकी ३४ वर हा पक्ष विजयी झाला. काँग्रेसला गेल्या वेळप्रमाणे १६ जागा मिळाल्या. ८१ सदस्यांच्या विधानसभेत झारखंड मुक्ती मोर्चा व मित्र पक्षांना ५६ जागा मिळाल्या. विरोधी भाजपच्या मतांची टक्केवारी वाढली असली तरी जागा मात्र २५ वरून २१ अशा घटल्या. झारखंडची स्थापना २००० मध्ये करण्यात आली. झारखंड मुक्ती मोर्चाने त्यासाठी चळवळ केली. तिचे संस्थापक शिबू सोरेन यांच्यापेक्षाही अधिक उजवे यश त्यांचा मुलगा हेमंत सोरेन यांनी मिळवले आहे. मुख्यमंत्र सोरेन यांच्याविरुध्द एका जमिनीच्या प्रकरणाचे निमित्त करून गेल्या वर्षी त्यांना अटक करण्यात आली. त्यामुळे त्यांना पद सोडावे लागले. पण त्यांच्या पत्नी कल्पना यांनी चांगला किल्ला लढवला. कल्पना या इंजिनिअरिंग आणि मॅनेजमेंटची पदवी घेतलेल्या उच्चविद्याविभूषित नेत्या आहेत. आधी त्या राजकारणात सक्रीय नव्हत्या. पण हेमंत यांच्या अनुपस्थितीत इंडिया आघाडीच्या व्यासपीठावर त्याच हजर राहिल्या. मुख्यमंत्रिपद चंपई सोरेन यांना देण्यात आले. नंतर सोरेन यांच्याविरुध्दचे खटले निराधार असल्याचे सांगून न्यायालयाने त्यांना जामीन दिला. त्यानंतर सोरेन हे पुन्हा मुख्यमंत्री झाल्याने चंपई हे दुखावले व भाजपच्या गळाला लागले. चंपई सोरेन यांच्या निमित्ताने आपल्याला आदिवासी मतांमध्ये शिरकाव करता येईल असा भाजपचा कावा होता. पण नंतर तो उघडा पडला. यंदा आदिवासींच्या २७ पैकी केवळ चंपई यांची एकमेव जागा भाजपला जिंकून येता आली.

## दुही निर्माण करणारा प्रचार

भाजपने हेमंत बिस्व सरमा यांची खास नियुक्ती प्रचारासाठी केली होती. हे सरमा गृहस्थ सतत नागासारखे फूत्कार टाकतच बोलत असतात. आसामचे मुख्यमंत्री असले तरी त्यांना कसलाही पोचपाच नाही. यंदा आसामात पूर आला त्यालाही मुस्लिमांच्या शिक्षणसंस्थांच्या इमारती जबाबदार असल्याचा आरोप त्यांनी एकदाच नव्हे तर अनेकदा केला. भडक बोलण्याबाबत योगी आदित्यनाथांसोबत यांची स्पर्धा सुरू असते. यांनी झारखंड म्हणजे दुसरा पाकिस्तान होत असल्याचे चित्र रंगवले. बांगलादेशमध्ये मध्यंतरीच्या अस्थिरतेमुळे हिंदूंवर हल्ले झाले हे खरे आहे. मात्र त्यामुळे एकाही हिंदूने तो देश सोडून भारतात पलायन केले असे घडले नाही. तेथे नव्याने आलेल्या सरकारनेही हिंदूंना अभय दिले. नवे नेते महंमद युनूस यांनी हिंदूंच्या देवळात जाऊन दर्शन घेतले. तरीही येथे सरमा यांच्यासारख्यांचा खोटा प्रचार चालूच होता. हे बांगलादेशी झारखंडमध्ये घुसून लोकांच्या जमिनी, नोकऱ्या, शेती व कंत्राटे बळकावत असल्याचा आरोप ते करीत होते. जोडीला सोरेन यांच्या भ्रष्टाचाराच्या खोट्या कहाण्या सांगितल्या गेल्या. वास्तविक, सोरेन यांना जामीन देताना न्यायायलाने इडी व सीबीआयवर ताशेरे मारले आहेत. त्यामुळे सोरेन यांची बाजू भक्कम होती. तरीही त्यांची प्रतिमा डागाळण्याचे प्रयत्न सुरू होते. २०१४ मध्ये निवडणूक जिंकण्यासाठी राहुल गांधींचे मेव्हणे रॉबर्ट वड्रा यांच्यावर विविध आरोप करण्यात आले. त्यानंतर केंद्रात व राजस्थान इत्यादी राज्यांमध्ये भाजप सत्तेत आली. पण वड्रा यांच्यावर काहीही कारवाई झालेली नाही. याच प्रकारचे आरोप कर्नाटकाचे मुख्यमंत्री सिध्दरामय्या यांच्यावर करण्यात आले. दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना बरेच महिने तुरुंगात ठेवण्यात आले. विरोधकांना निवडणुकीत हरवता येत नसेल तर इतर मार्गांनी खच्ची करा, पण सत्ता सोडू नका हा भाजपचा एकमेव मंत्र सध्या बनला आहे. आनंदाची गोष्ट अशी की झारखंडची जनता या सूत्राला बळी पडली नाही.

---

**विचार**

# चरीच्या शेतकरी संपाची संघर्ष कथा!

***खोत, सावकारांच्या मगरमिठीत सापडलेल्या कोकणातील शेतकऱ्यांना चरीच्या संपातून एकत्र करण्याचे धारिष्ट्य शेतकऱ्यांचे नेते नारायण नागू पाटील यांनी केले होते. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा या लढ्याला पाठिंबा मिळाला. प्रदीर्घ काळ चाललेल्या या संपाची दखल सरकारला घ्यावी लागली त्यामुळेच कसेल त्याची जमीन हा कायदा पारित झाला.***





**प्रमोद बळीराम जाधव**

कोकणातील जुलमी खोत व सावकारांच्या विरोधातील लढ्याचा परमोच्च बिंदू म्हणजे चरी (ता. अलिबाग) परिसरातील चौदा गावांनी तब्बल सात वर्षे केलेला प्रदीर्घ संप होय. हा संपूर्ण लढा प्रेरणादायी आहे. त्यावेळी सावकारांनी डावपेचानेकिती जमीन हडप केली होती याची दोन ठळक उदाहरणेआहेत.

१. भेंडखळ ता. उरण या गावाच्या परिसरातील एकूण ९६० एकर जमिनीपैकी ७०० एकर जमिन त्या गावातील सावकाराकडे होती.

२. कुलाबा (रायगड) जिल्ह्यात १९ व्या शतकात १,०४,९०८ शेतकऱ्यांकडे २,१३,१९९ एकर जमिन होती याउलट खोत सावकार जमिनदार अशांचा समावेश असणाऱ्या ५,६९३ व्यक्तीकडे एकूण ४,०३,४४० एकर जमिन होती. विशेष म्हणजे १८७८ साली कुलाबा (रायगड) जिल्ह्यात ५,९२७ सावकार होते.

या लुटमारीमुळे जनता त्रस्त झाली होती. याविरुध्द डॉ. बाबासाहेब आंबेडकर, स्व.श्री नारायण नागू पाटील (पेझारी), श्री. सुरबा नाना टिपणीस (महाड), भाई अनंत चित्रे (पोलादपूर) यांनी व्यापक जनआंदोलन उभे केले.

चरीच्या परिसरातील शेतकऱ्यांची परिस्थिती उर्वरित कोकणपट्टीप्रमाणे होती. बहुतांश जमीन कावेबाज सावकारांनी गिळंकृत केली होती. मूळचे शेतकरी त्यामुळे कुळ/भूदास अवस्थेत आले. सावकार एक जाचक अटींचा लेखी करार (कबूलायत) करुन जमिन कुळांना कसायला देत. वीस मणाचा एक खंडी भात हेमोजण्याचे परिमाण होते. यातील बारा मण सावकाराला व आठ मण कुळांना मिळे. यातील दोन मण धान्य पुढच्या वर्षीसाठी बियाणे म्हणून ठेवावे लागे. त्यामुळे प्रत्यक्षात सहा मण धान्य कुळांना मिळे. त्यावेळी धान्याचे आकारमान मोजण्यासाठी फरा हे साधन वापरले जाई. यातही सावकार लबाडी करत. स्वतः धान्य घेताना ते अधिकृत फऱ्यापेक्षा मोठा फरा वापरत. याला सावकाराला पोसणारा म्हणून पोश्या फरा म्हणत. मात्र कुळांना धान्य देतांना अधिकृत फऱ्यापेक्षा लहान फरा वापरत. याला शेतकऱ्यांना नाडणारा म्हणून नाडया फरा म्हटले जाई. एखाद्या वर्षी दुष्काळ, अतिवृष्टी, टोळधाड, असे कोणत्याही कारणामुळे उत्पन्न कमी आले, तरीही धूर्त व हिशोबी वृत्तीचा सावकार त्याचा हिस्सा वसूल करत असे.

श्री.ना.ना. पाटीलांनी सावकारांकडे १२:८ याऐवजी ११.९ अशाप्रमाणाची मागणी केली. पण मुजोर सावकारांनी ही रास्त मागणीही फेटाळली. यामुळे संघर्ष करण्याशिवाय पर्याय राहिला नाही. आजूबाजूच्या गाव/पाड्यावरचे शेतकरी माझे पणजोबा स्व. श्री. तुकाराम खंडू जाधव यांच्या अंगणात दिनांक २७/१०/१९३३ रोजी जमले. श्री. ना. ना. पाटील अध्यक्षस्थानी होते. त्यावेळी उत्पन्नाचा स्त्रोत म्हणजे शेती हाच होता. सविस्तर विचार करुन शेतकऱ्यांनी शांततामय मार्गाने संप करण्याचे घोषित केले. कुणीही सावकारांच्या शेतावर जमिन कसण्यासाठी जायचे नाही. हा संप १४ गावात पसरला. शेकडो एकर जमीन ओस पडली.

श्री ना ना. पाटील या काळात धीर देऊन मार्गदर्शन करत असत. उदरनिर्वाहाचा मुख्य स्त्रोत बंद झाल्याने शेतकऱ्यांच्या हालाला पारावार उरला नाही. जागोजागी फिरुन कांदे बटाटे इत्यादी पदार्थ विकणे, मिळेल ते काम करणे या बाबी शेतकऱ्यांनी सुरु केल्या. पण चरितार्थासाठी त्या पुरेशा नव्हत्या. त्यातच ब्रिटीश सरकारने सावकारांची बाजू घेत शेतकऱ्यांवर कर्ज वसुलीच्या नावावर जप्ती आणणे सुरु केले. गुरेढोरे, भांडीकुंडी जप्त केली. पशुधन गेल्याने हालात अधिकच भर पडली. अशावेळी कॉ.ग.ल.पाटील हा साम्यवादीयुवक मुंबईतल्या कामगार वस्तीत फिरुन मदत गोळा करुन चरीला येत असे. मात्र आभाळच फाटल्यावर ढिगळ कुठे लावायचे अशी बिकट परिस्थिती निर्माण झाली होती. या काळात लेकरांना खायला कायद्यायचे याची मोठी कसरत माताभगिनींची झाली. तांदूळ व कडधान्य संपले, गुरेढोरे सरकारने जप्त केली. गुरांसाठी ठेवलेला भाताचा कोंडा शिल्लक होता. भोकर या जंगली फळातील बुळबुळीत पदार्थ व भाताचा कोंडा यापासून खापुर्ला व सांजण नावाचे पदार्थ माय भगिनींनी विकसीत केले. आजही चरी परिसरात हाच विष्ट पदार्थ तयार केला जातो. उपासमारीच्या काळात इतरही पदार्थ विकसीत झाले.

श्री.ना.ना.पाटीलांनी कुलाबा जिल्हा शेतकरी परिषद चरी येथे भरवण्याचे ठरवले. त्याचे अध्यक्षस्थान भूषविण्याची डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना विनंती केली. ती त्यांनी मान्य केली. ते दिनांक १६/१२/१९३४ रोजी चरीला आले. सभेला ६००० शेतकरी जमले होते. बाबासाहेबांच्या भाषणाला शेतकऱ्यांनी उत्साहात प्रतिसाद दिला. भाषणात त्यांनी विविध मुद्दे मांडले.

या चळवळीचे एक वैशिष्ट्य म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सहकारी ब्राम्हण, मराठा, कुणबी, आगरी इ. तसेच अनुसूचित जातीतील शेतकरी होते. सामाजिक समतेच्या दृष्टीनेएक पाऊल म्हणून या शेतकरी परिषदेत सहभोजन झाले. काही महिन्यानंतर त्यांनी मुंबईत हजारो शेतकऱ्याचा मोर्चा काढला.विधिमंडळात खोती रद्द करण्याचे विधेयक मांडले.

या जनआंदोलनामुळे डिसेंबर १९३७ मध्ये तत्कालीन महसूलमंत्री श्री. मोरारजी देसाई यांनी चरीला भेट दिली. श्री. ना. ना.पाटील यांच्या विनंतीला मान देऊन त्यांनी संपात मध्यस्थी केली. दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून लवादाचा निर्णय दिला. त्यात कुळाला १० मण व सावकाराला १० मण असे सूत्र मान्य करण्यात आले. अशाप्रकारे सात वर्षानंतर संप मिटला.

स्वातंत्र्य मिळाल्यावर शासनाने खोती पद्धत १९५० पासून बंद केली. कुलाबा (रायगड) जिल्ह्यातील सुमारे १,२२,८६० एकर जमीन खोतांच्या मगरमिठीतून मुक्त झाली. चार शतकांच्या जुलमी पध्दतीचा अस्त झाला.

चरीच्या शेतकऱ्यांचा संप, खोतीविरुध्द जनआंदोलनयामुळे कसेल त्याची जमीन हे तत्व मान्य करण्यात आले. कुळ कायदा १ एप्रिल १९५७ पासून लागू करण्यात आला. हा दिवस कसणाऱ्यांचा दिवस म्हणून साजरा करण्यात आला.

पहिल्या टप्प्यात कुलाबा जिल्ह्याात ८२,८३० कुळांना ठराविक रक्कम जमिनदारांना देऊन जमिनीचे मालकी हक्क मिळाले. संपात सहभागी शेतकऱ्यांच्या त्यागाला फळ मिळाले. आत्मसन्मानाने जगण्याचे साधन मिळाले. संपत्तीचे समन्यायी वाटप (Equitable Distribution of Wealth) झाले. याचे फार सकारात्मक व दूरगामी परिणाम झाले.

माझे पणजोबा स्व. तुकाराम खंडू जाधव या संपात पुढारी होते. पुढे कुळकायदा लागू झाल्यावर माझ्या आजोबांना सुमारे साडेचार एकर कोरडवाहू जमीन विकत मिळाली. चरितार्थासाठी स्वतःचा उत्पन्नाचा स्त्रोत निर्माण झाला. या जमिनीमुळे उपासमार टळली. यामुळे टप्पाटप्प्याने प्रगती झाली. माझ्या वडीलांना भातशेतीमध्ये विक्रमी उत्पादन घेतल्याबद्दल राष्ट्रीय पुरस्कार मिळाला. मी स्वतः स्व. तुकाराम जाधव यांचा पणतू आता सहआयुक्त,समाजकल्याण या पदावर काम करत आहे. तर त्यांचा अजून एक पणतू डॉ. विजयकुमार हा कुशल नेत्रशल्यविशारद (Eye-Cornia Specialist)आहे. आमच्या पूर्वजांनी केलेल्या त्यागाची मधुर फळे आम्हाला मिळाली.

या चळवळीवर प्रकाशझोत टाकावा म्हणून माझे वडील स्व. बळीराम जाधव यांनी जगातील एकमेव, शेतकऱ्यांचा प्रदीर्घ संपहे पुस्तक प्रकाशित केले आहे. जिज्ञासुंनी या पुस्तकाचे जरुर वाचन करावे.आपल्या पूर्वजांनी केलेल्या त्यागाचा विचार करूनसर्व शेतकऱ्यांनी एकोपा ठेवून जमीन राखणे व संवर्धित करणे आवश्यक आहे. हीच त्यांना खरीखुरी श्रद्धांजली ठरेल.

---

**आजकाल**

# मी चरीचा स्मृतीस्तंभ बोलतोय...

**संतोष पाटील**

आज शेतकऱ्यांच्या चरीच्या संपाला ९१ वर्ष पुर्ण होतील. परंतु एकमेव शेतकऱ्यांच्या संपाच्या आठवणी आज कित्येकांच्या स्मृतीतुन पुसटल्या गेल्या आहेत. काहींना या चरीच्या भुमीत शेतकऱ्यांचा संप झाल्याचे आठवत ही नसेल आणि नविन पिढीचे तर काय समाज माध्यमांवर नको त्या गोष्टींवर चर्चा करताना आपल्याला पहायला मिळतात पण मी खात्रीने सांगू शकतो की आजही या माझ्या चरीच्या भुमीतील प्रदिर्घ चाललेल्या शेतकऱ्यांच्या संपाविषयी कुणीही चर्चा करणार नाही. म्हणूनच मला आज आपल्याशी बोलावेसे वाटते. आपल्याशी बोलत असताना माझ्या ९० वर्षांच्या आठवणी चित्रपटाप्रमाणे माझ्या डोळया समोरून चाललेय. या चित्रपटाचा खरा हिरो कोण असेल तर ते होते नारायण नागू तथा ना.ना.पाटील म्हणजेच माझे लाडके अप्पा साहेब. मी सात वर्षाचा प्रवास आपल्याला थोडक्यात सांगण्याचा प्रयत्न करतो. त्यावरून आपल्याला समजेल की, जुलमी सावकारीला लगाम घालण्याचे काम डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मदतीने कसे केले.

१९३२ सालापासून य खारेपाट विभागात जागृतीची नवी बीजे रुजू लागली. सावकाराकडून होत असलेली जुलूम जबरदस्ती आणि अन्याय शेतकऱ्याला असहय झाला. किती दिवस ही दुर्दशा सहन करायची? आमच्या वाडवडिलांनी पिढ्यानं पिढ्या उपसलेल्या कष्टावर सावकारांनी इमले बांधले. पण आमच्या झोपडीला विटेचा कधी आधार लाभला नाही. कधी झावळयाच्या घरावर कौल चढले नाही. मग हे कष्ट कुणासाठी उपसायचे? सावकारशाहीच्या या अन्यायाविरुध्द आगरी शेतकरी दंड थोपटून उभा ठाकला. खारेपाट चरी गाव मोठा. शेतकरी एक झाले. सावकाराला जाब विचारायला पुढे सरसावले. पण पिढयान् पिढ्या आयतं खायला सोकलेली सावकार दाद द्यायला तयार नाही. तेही एकत्र येऊन गुरगुरायला लागले. पण शेतकऱ्यांचा निर्धार पक्का होता, आता ही सावकारशाही मोडून काढायचीच.

त्यावेळी नारायण नागू पाटील यांच्यावर शेतकऱ्यांची नितांत श्रध्दा होती. हा माणूस आपापल्यासाठी काय वाटेल ते दिव्य करील, पण न्याय मिळवून देईल असा शेतकऱ्यांचा नानांवर अपार विश्वास.

ना.ना. पाटीलांची वाणी तर अतिशय तेजस्वी। त्यांच्या भाषणाने मरगळलेल्या शेतकऱ्यातही चैतन्य फुलायचे व तो अन्यायाविरुद्ध पेटून उठायचा. शेवटी खारेपाटतला सारा शेतकरी नारायण नागू पाटलांच्या नेतृत्वाखाली सावकारशाही विरुध्द एकवटला. सावकारही ऐकेनात, तेव्हा लढा अटळ बनला.

शेतकऱ्यांनी जमिनी कसायच्या सोडून दिल्या. शेतकरीही जिद्दीला पेटला. आता माघार नाही, मेलो तरी हरकरत नाही पण ही लढाई निर्णायकच झाली पाहिजे असा निर्धार सर्वांनी केला. पोरखपाली झाली तरी जमिनी कसायच्या नाहीत आणि सावकाराला तर मक्ताही घालायचा नाही. १९३२ ते १९३९ सालापर्यंत तब्बल सात वर्षे हा संप शेतकऱ्यांनी प्राणपणाने लढविला. या काळात ऐन पावसाळ्यातही खारेपाट विभागातील जमिनीत कुठे अंकूर फुटला नाही. हा लढा संबंध महाराष्ट्रात चरीचा शेतकरी संप म्हणून अतिशय गाजला. या चरी संपामुळे संबंध आगरी समाज खडबडून जागा झाला होता. ठिकठिकाणचे अनेक राजकीय पुढारी शेतकऱ्यांना मदत करायला धावून आले. त्याच सुमारास मुंबईतील परळ-भोईवाडा विभागातील एक पदवीधर तरुण जी.एल. पाटील पोटतिडिकेने या लढयात शेतकऱ्यांच्या मदतीला धावून गेला. हालअपेष्टा सहन करुन झुंजारपणे लढणाऱ्या या आगरी समाजातील शेतकऱ्यांच्या लढयात त्याने स्वतःला झोकून दिले.

या लढयाच्या संदर्भात त्यावेळी पूजनीय डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली १९३४ साली चरी येथे ऐतिहासिक अशी 'कुलाबा जिल्हा शेतकरी परिषद' झाली. ही परिषद शेतकऱ्यांचे एकमेव नेते ना.ना. पाटील यांनीच आयोजित केली होती. या परिषदेत शामराव परुळेकर, डॉ. प्रधान, सुरबा टिपणीस आदि मान्यवरांची जोरदार भाषणे झाली. पुढे बाबा साहेबांनी जुलमी शासनाने शेतकऱ्यांवर लावलेल्या केसेस बिनामोबदला लढण्याचे काम केले. अप्पा साहेबांच्या पाठीशी डॉ.बाबा साहेब आंबेडकर खंबीरपणे उभे राहिले. त्यामुळे तत्कालीन महसूल मंत्री मोराजी देसाई यांना चरीला यावे लागले आणि शेतकऱ्यांपुढे माघार घ्यावी लागली.

शासनालाही गंभीर दखल घ्यावी लागली. या लढयाच्या आधारानेच नंतर शासनाने शेतकऱ्यांसाठी 'कुळ कायदा' संमत केला. संबंध महाराष्ट्रातील शेतकऱ्याला या कायद्याने संरक्षण मिळाले. त्यामुळे चरीचा लढवय्या आगरी शेतकरी व त्यांचे नेते ना.ना. पाटील यांचे नाव सर्वतोमुखी झाले आणि पुढे कसेल त्याची जमीन या कायदयाने बळीराजा सुखी झाला.

मला आपल्याशी खुप काही बोलायचे आहे. परंतु कसं बोलाव हे ही सुचत नाही. आज चरीच्या संपाला ९१ वर्ष होतात पण माझी अवस्था काय आहे. दर वर्षी रंगरंगोटी या पलीकडे काहीच नाही. तरी शासनाने माझ्याकडे योग्य लक्ष देउन मोठे स्मारक उभारावे जेणेकरून पुढच्या पिढीला इतिहास समजेल आणि येथील बळीराजा कसा होता हे समजेल एवढीच माफक इच्छा.

---

**लोकसंसद**

## पैसेवाटप कधी थांबणार?

महाराष्ट्र विधानसभेचा निकाल महायुतीला प्रचंड बहुमत देणारा ठरला आणि महाविकास आघाडीच्या सत्तास्थापनेला सुरुंग लावणारा ठरला. लोकसभेतील पिछाडी भरुन काढण्यासाठी मिळालेल्या चार महिन्याचा पुरेपूर वापर करत महायुतीने ती पिछाडी भरुन तर काढलीच पण अपेक्षेपेक्षा जास्त जागांचे दान आपल्या पदरात पाडून घेतले. त्याबद्दल महायुती अभिनंदनास पात्र ठरते. लाडकी बहिण योजना ही विरोधकांना धोबीपछाड देणारी मोठी खेळी खेळून महायुतीने पहिले पाऊल टाकले आणि त्या योजनेला प्रथम विरोध व नंतर तीच योजना आपल्या जाहीरनाम्यात आणल्यामुळ विरोधकांची संभ्रमावस्था स्पष्ट झाली. पण निकालानंतर विकासाच्या कितीही बाता मारल्या तरी पैसेवाटपात कुठलाच पक्ष मागे नव्हता हे मात्र खरे. नुसता ग्रामीण भाग नाही तर शहरी भागातही हे प्रमाण लक्षणीय होते. पैसेवाटपाची ही चर्चा कधी दबक्या आवाजात तर कधी उघडपणे ऐकायला मिळतेय. एक दिवसाच्या पैसेवाटपाचा पुरेपूर मोबदला नंतरच्या पाच वर्षात नेतेमंडळी घेतात. पैशाने विकले जाऊ नका अशी जनजागृती करणारे ढीगभर मेसेज पसरवले गेले. अनेकांनी ते स्टेटसला ठेवले. पण प्रत्यक्षात चित्र उलटेच होते हे सत्य नाकारता येणार नाही.

**- दीपक काशिराम गुंडये, वरळी.**

---

## मराठी साहित्यिक दिनविशेष

**२७ नोव्हेंबर**

**१८७५:-** नाटयलेखक, दिग्दर्शक केशव रामचंद्र छापखाने यांचा जन्म. मूळ आडनाव कानिटकर, लो. टिळकांचे स्नेही असलेले छापखाने ख्यातनाम वकील, नामांकित वक्ते, ज्ञानेश्वरीचे अध्यापक आणि थिऑसाफीस होते. त्यांच्या हातून 'जे. कृष्णमूर्ती संदेश परिचय' हा ग्रंथ साकारला. **१९१४:-** कथाकार दिगंबर बाळकृष्ण मोकाशी यांचा जन्म. 'लामणदिवा', 'वणवा' मिळून ११ कथासंग्रह, 'देव चाल-ले', 'आनंद ओवरी' या कादंबऱ्या, तसेच 'पालखी', '१८ लक्ष पावलं' अशी प्रवासवर्णने, 'संध्याकाळचे पुणे (ललित)', 'रेडिओदुरुस्ती व्यवसायाबद्दलचे पुस्तक व बालसाहित्य देखील त्यांनी लिहिले. जून १९८१ मध्ये त्यांचे निधन झाले. **१९१७ :-** लेखिका सुमति आत्माराम भट यांचा जन्म. ह्यांनी कै. धोंडो वासुदेव विध्वंस (लोकमान्यांचे भाचे) यांचे चरित्र लिहिले. **१९३२:-** लेखक, पत्रकार जयवंत रामचंद्र गुजर यांचा जन्म. ह्यांनी 'जयवंत हो यशवंत हो' हे नाटक, 'निवडक सूर्यफूले' हा लेखसंग्रह व 'शमीवरील शस्त्रे' हा कथासंग्रह अशी साहित्य संपदा. **१९४४ :-** वृत्तपत्रकार, विविध साप्ताहिकांचे संपादक संस्थापक आणि प्रकाशक मुद्रकांच्या माध्यमातून अनेक दर्जेदार साहित्य प्रकाशित करून मराठी साहित्याचे दालन समृध्द करणारे-दामोदर यंदे यांचे निधन. त्यांनी 'सृष्टीदर्शन', 'बडोदावत्सल', 'श्रीसयाजी विजय', 'श्री शिवाजी' आदी साप्ताहिक सरु केली तसेच 'दिनबंधू'चे ते संपादक तर 'इंदूप्रकाश'चे संचालक होते. आपल्या आर्यग्रंथमालेतून त्यांनी कथाकल्पतरु, कथासरित्सागर, रामायण कालीन लोकसिीती, रसायनशास्त्र इ. ग्रंथ आणि विविध विषयांवर लेख प्रसिध्द केले. सावळाराम **१९४५:-** लेखक, अध्यापनशास्त्राचे एक जाणकार प्रा. मधुकर लक्ष्मण नानकर यांचा जन्म. 'अध्यापक पध्दती', 'वाणिज्य अध्यापन', 'शालेय व्यवस्थापन', 'संख्याशास्त्र' इ. आदी पुस्तकांचे ते सहलेखक. **१९४६:-** श्रीधर गणेश भालेराव यांचे निधन. 'गीतेचे रचनांतर, आईनस्टाईनप्रणीत सापेक्षी दर्शन, सुखदुःखविवेक, पुनर्जन्म विरूध्द पुनर्जतन इ. ग्रंथ, तसेच वैयक्तिक अमरत्व आदी ग्रंथ त्यांनी लिहिले. **१९५१ :-** कथा, कविता, कादंबरी, समीक्षा, गझल आदी स्वरुपाचे लेखन करणारे प्रा. तुळशीदास कोंडाजी जाधव यांचा जन्म. ह्यांच्या 'अमृतकण' ह्या ग्रंथासह 'गुलशन-ए- गझल' हे उर्दू गझलांचे संकलन, 'नागमणी' ही अमृता प्रीतम यांच्या कादंबरीचा अनुवाद. 'भावतरंग' हा काव्यसंग्रह आणि 'मुखवटा' कादंबरी अशी साहित्य संपदा. **१९५१ :-** लेखक रविकुमार चंद्रकांत पौडवाल यांचा जन्म. ह्यांचे काही लेख, कविता प्रसंगानुरुप ज्ञातिपत्रातून, साने गुरुजी बालविकास मंदिर मासिकातून, मध्यमुंबई मराठी विज्ञानसंघाच्या या पत्रिकेतून प्रसिध्द केले आहेत. **१९५२ :-** अध्यात्म आणि तत्त्वज्ञानासारख्या गंभीर विषयावर लेखन करणारे लेखक अहिताग्नी राजवाडे यांचे निधन. त्यांचे मूळ नाव शंकर रामचंद्र राजवाडे. अग्निहोत्राची दीक्षा घेतल्यावर नामांतर, गीताभाष्य, समाजशास्त्रदृष्ट्या गीतार्थ विवरण, अग्निहोत्राचे स्वरूप, नारदीय सुक्तभाष्य पूर्वार्ध व उत्तरार्ध' या ग्रंथाखेरीज 'मी आणि माझे कार्य' हे त्यांचे आत्मचरित्र 'अहितांनी राजवाडे : आत्मवृत्त' या नावाने प्रसिध्द झाले. त्यांचा 'गीताभाष्य अथवा नितिशास्त्र व समाज' हया शास्त्रीय लिहिलेला 'गीतार्थ विवरण' हा ग्रंथ तर 'नीत्शेचा ख्रिस्तांतक आणि ख्रिस्तांतक नित्शे' या ग्रंथातून त्यांच्या ज्ञानसंपादनाची व्यापकता लक्षात येतो. 'ईशावास्योपनिषदभाष्य, षदर्शन समन्वय आणि पुरुषार्थ मीमांसा' हे ग्रंथही त्यांच्या अलौकिक बुद्धीमत्तेची साक्ष देतात. **१९७३ :-** अर्जुन रामकिशन देशमुख यांचा जन्म. 'पंख जड' हा काव्यसंग्रह प्रकाशित. याशिवाय विविध वर्तमानपत्रातून कविता व अन्यलेखन प्रसिध्द.

**- संजय वझरेकर**
**९९७५५७६६७५**

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क-** ८०५५३२५६७८ **(बीपीन राठवा)**
९२२६०५५१५५ **(अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

**आजचे अन्नदाते**

**प्राप्ती विनय शाह, वाढदिवस, अहमदाबाद**

**कै. रामेश्वर त्र्यंबक कर्वे, स्मृतिदिन, अलिबाग**


# देहरजे नदीवरील पुलाच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर

**। पालघर । प्रतिनिधी ।**

**मनोर-वाडा रस्त्यावरील देहरजा नदीवर पुलावरून सुरु असलेल्या अवजड वाहतुकीमुळे पुलाच्या सुरक्षिततेबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. पुलाच्या दोन्ही बाजूकडील पोलीस बंदोबस्त हटवण्यात आल्यामुळे पन्नास टनापेक्षा अधिक वजनाची वाहने पुलावरून वेग मर्यादेचे उल्लंघन करून दिवसरात्र धावत आहेत. सार्वजनिक बांधकाम विभागाचे दुर्लक्षामुळे पुलावर दुर्घटना घडण्याची शक्यता असल्यामुळे अवजड वाहतूक रोखण्याची मागणी जोर धरत आहे.**



देहरजा नदीवरील पुलाच्या सुरक्षिततेसाठी वाहनांना वेग मर्यादेसह पुलाच्या स्ट्रक्चरवर सेन्सर बसवून नजर ठेवण्याची शिफारस करण्यात आली होती. तसेच, नादुरुस्त पुलालगतच्या अपूर्णावस्थेतील पुलाचे बांधकाम पूर्ण करण्याचे निर्देश सार्वजनिक बांधकाम विभागाला दिले होते. ३४ टन क्षमतेपेक्षा अधिक वजन आणि वेग मर्यादा ओलांडून अवजड वाहने पुलावरून जात असताना अवजड वाहतुकीवर लगाम घालण्यासाठी पोलीस आणि सार्वजनिक बांधकाम विभाग अपयशी ठरत आहे. महाड तालुक्यातील सावित्री नदीवरील पूल दुर्घटनेसारखी दुर्घटना देहरजा पुलावर घडण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

मुंबई-अहमदाबाद महामार्गाचे काँक्रीटीकरणाच्या कामामुळे होत असलेली वाहतूक कोंडी आणि अन्य कारणामुळे मनोर-वाडा रस्त्यावर वाहनांच्या संख्येत दीड पटीने वाढ झाली आहे. देहरजा नदीवरील पुलावर वेळोवेळी केलेल्या दुरुस्त्यांमुळे पुलाच्या वजनात वाढ झाली आहे. नुकताच पुलाच्या पृष्ठभागाची दुरूस्ती करण्यात आली आहे. परंतु, पावसाळा सुरु झाल्याने पुलाचे फाउंडेशन आणि सबस्ट्रक्चरच्या दुरुस्तीचे काम पूर्ण झालेले नाही. दरम्यान, व्हीजेटीआयचा अंतरीम अहवाल सार्वजनिक बांधकाम विभागाला नुकताच प्राप्त झाला आहे. अहवालात देहेरजा नदीवरील पुलावरुन ३४ टन पेक्षा अधिक वजनाची वाहने ३० किलोमीटर प्रती ताशी वेगापेक्षा अधिक वेगाने वाहतुकीस मनाईच्या सूचना देण्यात आल्या होत्या.

> पुलावर सेन्सर लावून हालचालींची माहिती संकलित केली जात आहे. आतापर्यंत काही मर्यादेपेक्षा अधिक वजन आणि वेग मर्यादेचे उल्लंघन करणाऱ्या वाहनांना रोखण्यासाठी उपाययोजना केल्या जातील. अपूर्ण बांधकाम असलेल्या पुलाचे बांधकाम आणि जमीन अधिग्रहण प्रक्रियेसाठी अंदाजपत्रक तयार करून मंजुरीसाठी पाठवण्यात आले आहे.
>
> - पोपट चव्हाण, उप विभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पालघर.

> ३४ टनापेक्षा अधिक वजनाच्या अवजड वाहतुकीमुळे पुलाला धोका निर्माण झाला आहे. सावित्री नदीवरील पुलासारखी दुर्घटना घडण्याची शक्यता असल्यामुळे तात्काळ अवजड वाहतुकीवर बंदी घालावी.
>
> -रुपेश नरगोळकर, माहिती अधिकार कार्यकर्ता

# पानवल धरणाचे मजबुतीकरण होणार



**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**

रत्नागिरी शहराला नैसर्गिक उताराने पाणीपुरवठा करणाऱ्या पानवल धरणाचे ६० वर्षांनंतर मजबुतीकरण होणार आहे. विधानसभेच्या आचारसंहितेमध्ये हे काम रेंगाळले होते. त्याची निविदा प्रक्रिया लवकरच होणार आहे. त्यामुळे २० कोटींच्या कामाच्या प्रक्रियेला वेग आला आहे. औद्योगिक विकास महामंडळाने त्यासाठी निधी दिला आहे. रत्नागिरी पालिका मुख्याधिकारी तुषार बाबर यांनी याला दुजोरा दिला आहे.

रत्नागिरी शहराला पाणीपुरवठा करणारे पानवल धरण १९६५ बांधण्यात आले होते. शहराला प्रामुख्याने पाणीपुरवठा करणाऱ्या धरणांपैकी हे एक आहे. शीळ, पानवल धरण व नाचणे तलाव या तीन जलस्रोतांतून पाणीपुरवठा होतो. यापैकी पानवल धरणातील पाणीसाठा दरवर्षी फेब्रुवारीअखेरीस संपुष्टात येतो. त्यामुळे शहराच्या पाणीपुरवठ्यावर परिणाम होतो. त्यानंतर शीळ धरणावर वाढत्या रत्नागिरी शहराच्या पाणीपुरवठ्याची भिस्त असते. पावसाळा सुरू होईपर्यंत शहराला पाणीपुरवठा करण्याची मोठी कसरत पालिका प्रशासनाला करावी लागते. सुधारित पाणीपुरवठा योजनेमुळे गळती कमी झाल्याने ताण कमी झाला आहे; परंतु शीळ धरणातील पाण्याच्या मर्यादित साठ्यामुळे पालिकेला पाणीपुरवठ्याची मोठी चिंता आहे.

यातच आता पानवल धरणाला ४० ते ५० टक्के गळती लागली आहे. त्यामुळे त्याची दुरुस्ती होणे, गाळ काढून साठवण क्षमता वाढवणे काळाची गरज आहे. या धरणाच्या मजबुतीकरणासाठी पालिकेने जलसंपदा विभागाला २० कोटींचा प्रस्ताव दिला होता. हा प्रस्ताव मंजूर झाला. पालिकेने याची निविदा प्रक्रिया सुरू केली; परंतु विधानसभा आचारसंहिता आल्यामुळे ही प्रक्रिया रखडली होती. आचारसंहिता संपल्यामुळे लवकरच निविदा प्रक्रिया करून ठेकेदार निश्चित केला जाणार आहे. त्यानंतर लवकरात लवकर धरणाच्या दुरुस्तीचे काम केले जाणार आहे.


## अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार

**। पालघर । प्रतिनिधी ।**

पालघर जिल्ह्यातील मनोर पोलीस ठाण्याच्या हद्दीत दोन तरुणांनी अल्पवयीन मुलीला धमकावून लैंगिक अत्याचार केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. दोन्ही आरोपींविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून दोघांना अटक केली आहे. मनोर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील नानीवली गावातील दोन तरुणांनी गावातील अल्पवयीन मुलीला धमकावून तिच्याच्यावर आळीपाळीने लैंगिक अत्याचार केले.

पीडितेच्या तक्रारीवरून मांडवी पोलीस ठाण्यात दोन्ही आरोपींविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्हा मनोर पोलीस ठाण्यात वर्ग करण्यात आला. गुन्ह्याची माहिती मिळताच मनोर पोलिसांनी सूत्रे हलवत दोन्ही आरोपींना अटक केली. अटकेनंतर दोघांना न्यायालयात हजर केल्यानंतर न्यायालयाकडून आरोपींची रवानगी पोलीस कोठडी करण्यात आली आहे.

## जमाखर्चाचे मेळ बसवण्याचे आव्हान



**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**

विविध कारणांमुळे भातशेती करण्याकडे शेतकऱ्यांनी पाठ फिरवली आहे. त्यामुळे भातशेतीचे क्षेत्रही घटत आहे. तरीही अनेक शेतकऱ्यांनी शेती सोडलेली नाही. यंदा भातशेतीला परतीच्या पावसाचा तडाखा बसला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना जमाखर्चाचा मेळ बसवणे अशक्य झाले आहे. नोव्हेंबर महिना संपला तरीही भातखरेदीचा दर निश्चित झालेला नाही. त्यामुळे भातशेतीच्या जमाखर्चाचा मेळ बसवायचा कसा, असा प्रश्न शेतकऱ्यांसमोर आहे.

लहरी पाऊस, मनुष्यबळाची कमतरता, मजुरी आणि यांत्रिक साधनांचे वाढते दर आदींमुळे भातशेती तोट्यात जात आहे. पावसाळी हंगामात राबूनही त्या तुलनेमध्ये उत्पन्न मिळत नसल्याने अनेकांनी भातशेतीकडे पाठ फिरवली आहे. शेतामध्ये पिकणारे भात शासनाकडून खरेदी केले जात असल्यामुळे शेतकऱ्यांना या भातातून उत्पन्नही मिळते. तसेच, भातशेतीच्या जमाखर्चाचा मेळ बसवता येतो.

यावर्षी परतीच्या पावसाचा भातशेतीला चांगलाच तडाखा बसला आहे. अनेक शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. अनेक गावामधील भातकापणी पूर्ण झाली आहे. काही गावांमधील कापणीची कामे अंतिम टप्प्यात दिसत आहेत. भातकापणीची कामे उरकून अनेक शेतकऱ्यांकडून अनेक वर्षभराची बेगमी मारून शिल्लक राहिलेल्या भाताची विक्री करून उत्पन्न मिळवले जात आहे. मात्र, यावर्षी नोव्हेंबर महिना संपत आला तीरीही भातखरेदी बाबत निर्णय झालेला नाही.

## हातखंबा-खेडशी रस्त्यावर अपघात

**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**


रत्नागिरी शहरानजीकच्या हातखंबा ते खेडशी जाणाऱ्या रस्त्यावर दोन वाहनांमध्ये धडक झाली. यामध्ये दोन्ही वाहनांचे नुकसान झाले असून संशयित चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सुरेंद्र सदानंद चवंडे (६१) असे संशयिताचे नाव आहे. ही घटना शनिवारी (दि.२३) सायंकाळी पाचच्या सुमारास पानवल फाटा येथे घडली आहे. सुरेंद्र चवंडे हे वाहन निष्काळजीपणे चालवून वैभव विजय वाघाटे (३१) यांच्या कारला धडक देऊन अपघात केला. या अपघातात दोन्ही वाहनांचे नुकसान झाले. या प्रकरणी पोलिस हेड कॉन्स्टेबल उदय वाजे यांनी ग्रामीण पोलिस ठाण्यात तक्रार दिली. तक्रारीवरुन पोलिसांनी गुन्हा दाखल केला.

## भरती प्रक्रियेला सुरुवात होणार

**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**

आता आचारसंहिता संपुष्टात येणार असून रखडलेल्या कंत्राटी शिक्षकभरतीप्रक्रियेलासुरुवातहोणार आहे. सोमवारी याबाबत स्थानिक डीएड, बीएड बेरोजगारधारकांनी शिक्षणाधिकाऱ्यांची भेट घेतली. यावेळी आठवडाभरात ही प्रक्रिया होईल, असे सांगण्यात आले असून जिल्ह्यात ५०० जागा रिक्त आहेत.

शासनाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या वीसपेक्षा कमी पटसंख्या असलेल्या शाळेत सेवा निवृत्त शिक्षक किंवा डीएड-बीएड झालेल्या बेरोजगारांना कंत्राटी शिक्षक म्हणून नेमणूक देण्याचा निर्णय ५ सप्टेंबर रोजी घेतला होता. त्यानुसार आदेश देखील काढला गेला होता. कंत्राटी तत्वावर नेमणूक मिळाल्यानंतर संबंधित शिक्षकाला शासनाकडून महिन्याला १५ हजार रुपये हे मानधन मिळणार आहे.



वर्षाला १२ रजा असणार आहेत, जिल्हास्तरीय समितीकडून याची पडताळणी करून या उमेदवारांना त्वरित नियुक्ती देण्यात यावी, असे आदेशात म्हटले होते.

या आदेशाला शिक्षक संघटनांनी आक्षेप घेत २५ सप्टेंबर रोजी राज्यभर हा शासन निर्णय रद्द व्हावा म्हणून शाळा बंद ठेवून आंदोलन केले होते. जे शिक्षक या निर्णयाला विरोध करत होते त्याच अनेक शिक्षकांनी स्वतः च्या पत्नीचा अर्ज या भरती प्रक्रियेत दिला आहे.

## फलोत्पादन कार्यक्रमांतर्गत लाखोंचा निधी

**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**

एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान कार्यक्रमांतर्गत २०२४-२५ मध्ये अनुसूचित जाती प्रवर्गासाठी २४ लाखाचा कार्यक्रम जिल्ह्यासाठी मंजूर आहे. या प्रवर्गासाठी मंजूर कार्यक्रमाच्या तुलनेत खर्च व प्राप्त अर्जाचे प्रमाण अतिशय कमी असल्याचे निदर्शनास येत आहे. यास्तव क्षेत्रीय स्तरावरून या प्रवर्गातील लाभार्थ्यांचे जास्तीत जास्त अर्ज प्राप्त करून घेण्यासाठी २५ नोव्हेंबर ते ५ डिसेंबर या कालावधीत क्षेत्रीय गावपातळीपर्यंत विशेष मोहीम राबविण्यात येणार आहे.



रत्नागिरी जिल्ह्यासाठी मंजूर असलेल्या कार्यक्रमामध्ये विविध बाबींचा समावेश आहे. उच्च तंत्रज्ञानावर आधारित रोपवाटिका, क्षेत्रविस्तार घटकांतर्गत ड्रॅगनफ्रूट या एक्सॉटिक फ्रूट क्रॉप, पुष्पोत्पादन, फळपिके, मसाला पिके, अळिंबी उत्पादन, जुन्या फळबागांचे पुनरूज्जीवन, सामूहिक शेततळे, शेततळे अस्तरीकरण, नियंत्रित शेती (ग्रीनहाऊस, शेडनेट, प्लास्टिक मल्चिंग), फलोत्पादन यांत्रिकीकरण, मुनष्यबळ विकास कार्यक्रम, काढणीत्तोर व्यवस्थापन (पॅक हाऊस, प्रक्रिया युनिट, रायपनिंग चेंबर) आणि पणन सुविधा आदी विविध बाबींचा समावेश आहे. यामध्ये यावर्षी प्रामुख्याने मधुमक्षिका पालनासाठी तरतूद केली आहे.

## गोवा बनावटीची दारू जप्त

**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**

चेतक भरत वाळवे (२९) हा आपल्या गाडीतून १ लाख ८०० रु. किमतीच्या गोवा बनावटीच्या दारूचे ११८ बॉक्स घेऊन गोवा येथून विनापरवाना अवैधरीत्या वाहतूक करत होता. त्याला चिपळूण पोलिसांनी थांबण्याचा इशारा केला असता गाडी न थांबवता परत मागे फिरवून भरधाव वेगाने रत्नागिरी बाजूकडे निघाला. यावेळी संगमेश्वर ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक विवेक साळवी, जयेश रसाळ, सचिन जाधव यांना माहिती मिळाल्यानंतर त्यांनी पाठलाग करत गाडी तुरळ येथे पकडली आणि मुद्देमाल जप्त केला.

## रस्त्याच्या कडेला कचऱ्याचा ढिगारा

**। पालघर । प्रतिनिधी ।**

कासा ग्रुपग्रामपंचायत हद्दीतील विविध भागांमध्ये घनकचऱ्याच्या व्यवस्थापनाचा अभाव दिसून आला असून यामुळे ग्रामपंचायत परिसरात मोठ्या प्रमाणावर दुर्गंधी आणि अस्वच्छतेचे वातावरण निर्माण झाले आहे. रस्त्यावरील टाकलेल्या कचऱ्यामुळे मोकाट जनावरांची संख्या वाढल्याने अपघाताचा मोठा धोका संभावना वाढली आहे. त्याच बरोबर नागरिकांच्या आरोग्यावर मोठा परिणाम होत असल्याची तक्रार स्थानिक नागरिकांकडून होत आहे.



दरम्यान, ग्रामपंचायत हद्दीत घनकचऱ्याचा प्रश्न गंभीर वाढला असून येथील कासा बाजारपेठ, भिसेनगर, पाटील पाडा, डोंगरी पाडा, बरड पाडा, वळवी पाडा आणि गायकवाड पाडा अशा भागांमध्ये कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी कोणतीही ठोस यंत्रणा नाही. ग्रामपंचायतीने नियुक्त केलेल्या घंटागाड्या वेळेवर सेवा देत नसल्याचा आरोप नागरिकांकडून होत आहे. रस्त्यांवर कचऱ्याचा थर पडला असून शिवमंदिर परिसर, नर्सरी आणि मुख्य रस्त्यांवरून ये-जा करणाऱ्या नागरिकांना दुर्गंधीचा सामना करावा लागत आहे. प्लास्टिक, भाजीपाला व अन्य कचरा उघड्यावर फेकल्यामुळे स्वच्छतेचा प्रश्न अधिक गंभीर झाला आहे.

> घनकचरा व्यवस्थापनासाठी दोन घंटागाड्या नेमल्या आहेत. मात्र, रात्री नागरिक कचरा थेट रस्त्यावर फेकतात, त्यामुळे समस्या अधिक बिकट होते. नागरिकांच्या सोयीसाठी घंटागाड्यांच्या फेऱ्या वाढवण्याचा विचार सुरू आहे.
>
> - हरेश मुकणे, उप सरपंच, कासा

उघड्यावर टाकलेल्या कचऱ्याने मोकाट जनावरांवर विपरित परिणाम होत आहे. तसेच, १० हजार लोकसंख्या असलेल्या कासा गावात घनकचऱ्याच्या व्यवस्थापनासाठी अत्यावश्यक सुविधांचा अभाव आहे. त्यामुळे नागरिकांना कचरा उघड्यावर टाकावा लागत असल्याने स्वच्छता आणि आरोग्याचे प्रश्न दिवसेंदिवस गंभीर बनत आहेत.

### धनेशचे अस्तित्व कायम ठेवण्यासाठी विशेष उपक्रम

# ‘हॉर्नबिल फूड प्लान्ट नर्सरी’ची निर्मिती

**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**

‘हॉर्नबील’ अर्थात प्रचलित मराठी भाषेत ‘धनेश’ नावाने तर कोकणी भाषेत ‘ककणेर’ नावाने ओळखल्या जाणाऱ्या पक्ष्यांच्या प्रजाती व अस्तित्व वाढविण्यासाठी रत्नागिरी जिल्ह्यातील देवरुख येथे ‘हॉर्नबिल फुड प्लान्ट नर्सरी’ उभारली जात आहे. देशातील हा पहिलाच प्रकल्प आहे. ककणेर या पक्ष्याचे अस्तित्व आणि प्रजाती हळूहळू दुर्मीळ होण्याची चिंता पर्यावरणप्रेमी, पक्षी अभ्यासकांकडून व्यक्त होत असतानाच आता रत्नागिरी जिल्ह्यातील चिपळूण व देवरूख येथील पक्षीमित्रांनी धनेशची प्रजाती व अस्तित्व कायम ठेवण्यासाठी हा उपक्रम हाती घेतला आहे. त्यानुसार देवरूख येथील आठल्ये सप्रे महाविद्यालयाच्या सभागृहात रविवारी पर्यावरण प्रेमींसाठी कार्यशाळा संपन्न झाली.



ककणेर या पक्ष्याचे मुख्य खाद्य म्हणजे वड, पिंपळ, उंबर अर्थातच फायकल्स जातीतील वृक्षांचा सशावेश आहे. या झाडांची फळे खाऊन वंशवृद्धीसह आपले अस्तित्व राखत असतात. मात्र, विकासाच्या वाटेवर हे वृक्ष उभे असल्याने त्यांची आता कत्तल होऊ लागली आहे. परिणामी ककणेर प्रजातीमधील पक्ष्यांचे जीवनावश्यक खाद्यान्न संपू लागले आहे. त्यामुळे भविष्यात ककणेरची प्रजाती हळूहळू दुर्मीळ होत नामशेष होण्याच्या मार्गावर असल्याची चिंता पर्यावरण, निसर्गप्रेमी व पक्षीमित्रांकडून व्यक्त होत आहे.

फायकल्स जातीतील वृक्षांची लागवड आणि वाढ होण्यास किमान पन्नास वर्षांचा कालावधी लागतो असे अभ्यासकांचे म्हणणे आहे. तर, हॉर्नबिल याचे आयुर्मान तीस ते पस्तीस वर्षांचे आहे. त्यामुळे एखादी हॉर्नबिलची प्रजाती व कुटुंब त्याच्या आयुर्मानाच्या कालावधीत त्यांना पोषक असलेल्या खाद्यान्न झाडांची फळे उपलब्ध न झाल्यास ती संपूर्ण पिढी नामशेष होऊ शकते. ही झाडे लावण्यास व पूर्ण वाढ होण्यास ५० वर्षांच्या कालावधीत योगायोगाने दुसऱ्या पिढीचे अस्तित्व राहिले तर प्रजातीची वंशवृद्धी होईल.

हा सर्व घटनाक्रम लक्षात घेता देवरूख येथील पक्षी, पर्यावरणप्रेमी प्रतीक मोरे, चिपळूणमधील पक्षी अभ्यासक नयनीश गुढेकर, पाचाड (चिपळूण) येथील नार्वेकर सॅन्च्युरीचे नितीन नार्वेकर, वनस्पती विषयक अभ्यासक बाबर आदींसोबत निसर्गप्रेमी तरुणांनी आता पर्यावरणाचे संतुलन राखण्यासह ‘हॉर्नबिल वाचवा’ मोहीम हाती घेतली आहे.

### पक्षांची विष्ठा गोळा करून बीजारोपण

**पाचाड (चिपळूण) नार्वेकर सॅन्च्युरीच्या माध्यमातून नितीन नार्वेकर यांनी आपल्या मुलासह खासगी जंगल क्षेत्रात फायकल्स जातीतील झाडे वाढविण्यास सुरुवात केली आहे. ही झाडे केवळ पक्ष्यांच्या विष्ठेतूनच वाढतात आणि जगतात. हे लक्षात घेऊन या निसर्गप्रेमीनी विष्ठा गोळा करून बीजारोपण सुरू केले आहे. हॉर्नबिलच्या ऐंशी ठिकाणच्या घरट्यांजवळ कॅमेरे बसवून त्याचा अभ्यास करण्याचा हा देशातील पहिलाच उपक्रम आहे.**

## राजीवडा गावातील रस्त्यावर अतिक्रमण

**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**

रत्नागिरी शहरातील राजीवडा गावातून जाणाऱ्या रस्त्यावर आलेल्या अतिक्रमणाची उपप्रादेशिक परिवहन विभागाच्या अधिकाऱ्यांसह रत्नागिरी नगर परिषदेच्या अधिकाऱ्यांनी पाहणी केली होती. विधानसभा निवडणूक मतदानापूर्वी संबंधीत पाहणी करण्यात आली होती. शहरविकास आराखड्यानुसार ९ मीटरचा रस्ता अनधिकृत बांधकामामुळे ९ फुट इतकाच राहिला असल्याचे निदर्शनास आले आहे.

दरम्यान, राजीवडा गावातच राहणाऱ्या एका रिक्षा व्यावसायिकाने राजीवड्यातील अरुंद रस्त्यावर असलेल्या रिक्षा थांब्यासंदर्भात कारवाई करण्याची मागणी केली होती. या निवेदनात सर्व अतिक्रमण हटवण्याचीही मागणी करण्यात आली होती. गेल्या दीड-दोन वर्षांपासून या तक्रारदार रिक्षा व्यावसायिकाकडून उपप्रादेशिक परिवहन अधिकारी आणि रत्नागिरी नगर परिषदेकडे पाठपुरावा केला जात होता. मात्र, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी आणि रत्नागिरी नगर परिषदेने प्रथम तक्रारीची दखल घेण्यास टाळाटाळ केली होती. परंतु, या रिक्षा व्यावसायिकाने वरिष्ठ पातळीवर तक्रारी केल्या. अखेर मतदान होण्यापूर्वी काही दिवस अगोदर नगर परिषद आणि परिवहन विभागाच्या अधिकाऱ्यांनी गावात जाऊन रस्त्याची पाहणी करण्यात आली.

# चरी संप:यशस्वी संघटनात्मक संघर्षाचे प्रतीक

**आज एका ऐतिहासिक घटनेचे स्मरण करण्याचा दिवस आहे. ती घटना म्हणजे तब्बल सात वर्ष चाललेला चरी येथील शेतकरी संप होय. ज्या संपामुळे शासनाला कसेल त्याची जमीन हा कायदा करण्यास भाग पडले आणि कष्टकरी शेतकरी बांधवांचा आवाज बुलंद केला, अशा चरी शेतकरी संपाने महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचे सान्निध्य अनुभवले आणि क्रांतीयोद्धा आप्पासाहेब नारायण नागू पाटील यांचे नेतृत्व प्राप्त केले होते.**

प्रा.महेश बिन्हाडे

भारतात अगोदर राजेशाही होती त्याकाळात सर्व जमीन राजाची असायची ती जमीन राजा रयतेला वाटून द्यायचा आणि त्याबदल्यात राजा काही कर रूपाने धान्य किंवा अन्य स्वरुपात वसूल करत असे, या कर वसुलीसाठी राजाने काही अधिकारी नेमलेले असायचे परंतु राजेशाही मध्ये कायमच परिस्थिती सारखी नसायची आक्रमणामुळे राजाच बदलून जायचा परंतु शेतकरीवर्गाकडून कर वसूल करणारे कायम असायचे, खोत म्हणजे मोठे जमीनदार किंवा वतनदार. पेशव्यांच्या काळापासून खोती हे सरकारी वतन असे. सरकारी सारा वसूल करणं आणि तो सरकार दरबारी जमा करणं हे प्रामुख्यानं खोताचं काम असे. ज्या गावात खोत असतं, त्या गावाला 'खोती गाव' म्हणून ओळखलं जाई. कबुलायत खोत स्वत:ला सरकार समजून गरीब कुळांची लूट करायाचे वर्षभर राब राबून अखेर अन्नधान्य खोताच्या पदरी पडत असे. केवळ एवढेच नव्हे, तर खोत या कुळांना स्वत:कडेही राबवून घ्यायचे. शेतकऱ्यांच्या अशिक्षितपणाचाही खोत फायदा घेत असत. कबुलायत नावाचा खोतांनी सुरू केलेला प्रकार असाच होता. कबुलायत म्हणजे जमिनीची ११ महिन्याची भाडेपट्टी लिहून घेतली जात असे. एक एकरामागे खंडीभर भात मक्ता म्हणून खोत घेत. सुरवातीला हा मक्ता ७ -१३ असा होता म्हणजे ७ मण सावकाराला आणि १३ मण शेतकऱ्याला अशी व्यवस्था होती नंतर खोत सावकार यांना हाव सुटली त्यांनी १३-७ अशी उलट पद्धती सुरु केली कुणी शेतकरी हे देऊ शकला नाही, किंवा दुष्काळ पिकांवर रोगराई झाली तर आणि शेतात काही पिकले नाही तर तर मग पुढच्या वर्षी दीडपटीने वसूल केलं जाई.

सामान्य कुळांकडे किंवा शेतकरी समुदायाकडे भट शिल्लक नसायचा कारण तो त्यांना पोटापुरताच मिळायचा परिणामी आगामी पावसाळ्यात शेत पेरणी करण्यासाठी शेतकरी वर्गाला सावकाराकडे किंवा खोताकडे दीड पट परत देण्याच्या बोलीवर भात बियाणे घ्यावे लागायचे परंतु हे बियाणे कुळांना देण्यासाठी सावकार जे माप किंवा फरा वापरायचा ते दोन प्रकारचे असायचे सावकार ज्या मापाने किंवा फऱ्याने कुळांना बियाणे द्यायचा तो बारा पायल्यांचा नवीन फरा असायचा तो बारा पायली भात मावणारा डोळ्यादेखत शेतकऱ्यांना नाडणारा नाड्या फरा असायचा आणि जेव्हा पिक येऊन केलेल्या बोली प्रमाणे बियाणे म्हणून घेतलेला भात परत घेतांना सावकार ते दीड पट तर घ्यायचाच पण त्यासाठीजे माप किंवा फरा वापरला जायचा तो जुना झालेला आणि १४ पायली भात मावणारा फरा असायचा यामुळे शेतकरी पूर्ण लुबाडला जायचा आणि सावकार पोसला जायचा म्हणून शेतकरी त्या फऱ्यास पोशा फरा म्हणायचे थोडक्यात प्रत्येक मापामागे २ पायली भात सावकार लुटायचा अगदी डोळ्यांदेखात त्यामुळे शेतकरी कुळ अधिकच भरडला जायचा

केवळ अधिकच भात वसूल करून सावकाराचे भागायचे नाही तो कुलांकडून जेव्हा खळ्यात मळणी व्हायची तेव्हा त्याच्या साथीदारांसह हजर व्हायचा व पहिल्यांदा बियाणे म्हणून दिलेला भट वसूल करायचा तेव्हा पाहिला मण देवाचा म्हणून फुकटचा भात स्वताच्या ताब्यात घ्यायचा नंतर मोजणी मोजणी करतांना पत्येक मणामागे मोठे पसाभर धान्य (फसकी) म्हुन उगाचच घ्यायचा असे धान्य वीस मणामागे २ मण उगाचच फसवून खोत सावकार घेत असत त्यामुळे शेतकरी कुळांची अतोनात हाल होऊन डोळ्यांदेखत होणारी फसवणूक हताशपणे बघत राहण्याशिवाय कुळांना पर्याय नसायचा कारण गरीब हतबल दारिद्र्याने पिचलेले लोक जुलुमी खोत सावकारांविरुद्ध काही करू शकत नसत.

त्याकाळी समाजात शांतंता सुव्यवस्था राहावी यासाठी गाव पातळीवर पंच ,मंडळ कार्य करत असे आणि हे पंचमंडळ गावकऱ्यांनी निवडावे असे संकेत असत परतू खोत सावकार मानाडली अशी योजना कपटाने तयार करत असत कि त्यामध्ये खोत सावकारांशिवाय दुसरा कोणीही त्यात येणार नाही. त्यामुळे कुळांचा प्रतिनिधी कुणीही त्या पंचमंडळीत नसायचा जर ग्झावत खोत सावकार विरुद्ध शेतकरी असा संघर्ष झाला तर खोत सावकार यांच्या बाजूने निकाल जायचा, शिवाय खोतांची अशी धारणा होती कि, शेतकरी कुळ म्हणजे त्यांचे बटिक त्यांचा माणसासोबत पंच म्हणून राहणे म्हणजे खालच्या स्तरातील लोकांची बरोबरी स्वताचा अपमान म्हणून प्रतिष्ठा सांभाळण्यासाठी हे खोत लोक कोणत्याही कुळ व्यक्तिला पंच मंडळात येऊ देत नसत ,वास्तविक तो कुलांवर अन्याय करण्याचा एक मार्ग होता

सावकार लोक गरीब शेतकरी कुळांना कर्जाऊ पैसे देत असत दिलेल्या पैशावर अधिकचे शून्य वाढवून त्यावर अशिक्षित अशा गरीब लोकांचे अंगठ्यांचे ठसे उमटवून तसे करार पत्र बनवून घेत असत परंतु ते कुळांना त्यवेळेस वाचून दाखवत नसत व त्यानुसार कुलांकडून वसुली घेतली जात असे कुळाने वसुली नीट दिली नाही, तर प्रसंगी कुळातील संपूर्ण कुटुंबाला गुलाम किवा वेठबिगार म्हणून वागवलं जाई त्यांना सावकाराच्या घरी किंवा मळ्यात दिवसभर विना मोबदला सक्तीने काम करावे लागे अशी अमानवी पद्धत त्यावेळी संपूर्ण कोकणात लागू होती.



खोती गावाचे खोत सावकार स्वत:ला त्यागावाचे राजे समजायचे त्यांचा गावात मोठा सन्मान मिळावा असे त्यांचे वर्तन असायचे. कुळांना ते कुचकामी मानायचे एखादा कुळ जर चालत असेल आणि समोरून सावकार चालत आला तर कुळाने स्वत:च्या पायातली चप्पल काढून डोक्यावर ठेवायची आणि खोत समोरून जाईपर्यंत चप्पल डोक्यावरच ठेवायची. असे नाही केले. तर खोत सावकार त्याकुळाला आपल्या बंगलीवर बोलवून चाबकाचे आसूड ओढत असे. गावात फक्त सावकाराचे घर कौलाचे असे कुळाला कौल टाकायची असतील तर सावकाराला कौलकर द्यावा लागे. खोत शेत मजुरांकडून, कुळांकडून सर्व खासगी कामे व जमिनीच्या मशागतीची कामे धाकदपटशाने करून घेत असत. अशाप्रकारचे अनेक अन्याय अत्याचार खोत सावकारांकडून होत असत. याविरुद्ध आवाज उठवणे गरजेचे होते या खोती पद्धतीला एकोणिसाव्या शतकाच्या शेवटच्या दशकापासून ठिकठिकाणी विरोध झाला. कधी रत्नागिरीतल्या खेड तालुक्यात, तर कधी रायगडमधील पेण तालुक्यात. पण त्या त्या वेळी हा विरोध मोडून काढला जाई.असेच छोटे-मोठे संप १९२१ ते १९२३ या कालावधीत खोतांविरोधात रायगडमध्ये झाले, मात्र तेही मोडून काढण्यात आले. मात्र, या सर्व घडामोडी नारायण नागू पाटील पाहत होते आणि त्यानंतर यासाठी आवाज उठवण्याचा विचार करत नारायण नागू पाटलांनी शेतकरी वस्त्यांना भेटी द्यायला सुरुवात केली. खोतांना विरोध करण्यासाठी अखेर १९२७ साली 'कोकण प्रांत शेतकरी संघ' स्थापन करण्यात आला. भाई अनंत चित्रे या संघाचे सचिव होते. या कोकण प्रांत शेतकरी संघाने खोती पद्धतीविरोधात रायगड-रत्नागिरी जिल्ह्यात सभांचा धडाका लावला. त्यांच्या सभा उधळून लावण्याचेही प्रयत्न झाले. अनेकदा नारायण नागू पाटील आणि भाई अनंत चित्रे यांच्यावर भाषणबंदीही लादण्यात आली. मात्र, तरीही शेतकऱ्यांचा प्रतिसाद वाढत गेला.

या संपाच्या दृष्टीने सर्वांत महत्त्वाची परिषद २५ डिसेंबर १९३० रोजी पेण तालुक्यात पार पडली. कुलाबा जिल्हा शेतकरी परिषद असं या परिषदेचं नाव. कुलाबा हे रायगड जिल्ह्याचे तत्कालीन नाव. या परिषदेचं नेतृत्त्व नारायण नागू पाटील आणि भाई अनंत चित्रे यांनी केलं होतं. या परिषदेत मंजूर झालेले ठराव, हे पुढील संपासाठी प्रेरक ठरले. खोती पद्धत नष्ट झाली पाहिजे, जमिनीची मालकी शेतकऱ्यांची व्हावी, मक्ते आणि व्याज कमी करावे, कबुलायतचा नमुना बदलला पाहिजे इत्यादी २८ मागण्यांचा हा ठराव झाला. या परिषदेनंतर नारायण नागू पाटील आणि भाई अनंत चित्रे यांनी सभांचा धडाका लावला आणि शेतकऱ्यांमध्ये जनजागृती केली. तत्कालीन कुलाबा (आताचा रायगड) जिल्ह्यातील खेड, तळा, माणगाव, रोहा, पेण अशा ठिकाणी हजारोंच्या गर्दीत सभा झाल्या.या जनजागृतीची आणि खोती पद्धतीविरोधी भावना १९३३ साली ऐतिहासिक संपात परावर्तित झाली.

१९३१ ते १९३३ या सालांदरम्यान नारायण नागू पाटील आणि भाई अनंत चित्रे यांच्या सभा आणि एकूणच चळवळीवर निर्बंध लादले गेले. परिणामी चळवळही मंदावली. मात्र, १९३३ साली बंदी उठवल्यानंतर अलिबाग तालुक्यातील चरी परिसरातील २५ गावांची एक सभा झाली. या चरी गावातच ऐतिहासिक संपाची घोषणा झाली. नारायण नागू पाटील हे चरीच्या सभेचे संघटक होते. शेतकऱ्यांना उत्पादनातील योग्य वाटा मिळत नसल्यानं शेतकऱ्यांनी संपावर जावं, अशी घोषणा झाली आणि त्याच दिवसापासून संपाला सुरुवात झाली. कुळांनी जमीनदारांच्या जमिनी कसायच्या नाहीत, अन्न पिकवायचं नाही, असा निर्णय झाला. हा संप मोडून काढण्यासाठी खोतांकडून आणलेला दबावही परतवून लावण्यात हे शेतकरी यशस्वी झाले खरे, मात्र, शेतीच न केल्यानं आलेली उपासमारी कशी परतवून लावणार हा प्रश्न होताच. तरीही १९३२ ते १९३९ पर्यंत हा संप चालला. म्हणजे तब्बल सात वर्षे. या संपात चरीसह एकूण २५ गावं सहभागी झाली होती. जो काही फटका बसला तो याच गावांना बसला.

या संपादरम्यान शेतकऱ्यांची ससेहोलपट झाली. जंगलामधील लाकूड-फाटा तोडून दिवस काढावे लागले, करवंद, कांदा-बटाटा विकून, मासेमारी करून जगावं लागलं. प्रसंगी उपासमारीही झाली. मात्र, तरीही शेतकरी संपावरून मागे हटले नाहीत. या संपादरम्यान रायगड जिल्ह्यातील 'कुलाबा समाचार' सारख्या वृत्तपत्रांनी संपावर प्रश्न उपस्थित केले. 'कुलाबा समाचारमध्ये 'जमीनदार आणि कुळे यांच्यात बेबनाव करण्याचा प्रयत्न' अशा मथळ्यांखाली अग्रलेख लिहिले गेले. संपाच्या हेतूबद्दल शंका उपस्थित केल्या गेल्या. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनीही या संपाला जाहीर पाठिंबा दिला होता. त्यासाठी स्वतः बाबासाहेब चरीला आले होते. त्यांनी संपकरी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केला होते हा शेतकरी संप सुरू असताना १९३४ साली आणखी एक शेतकरी परिषद भरवण्यात आली होती आणि या परिषदेचं अध्यक्षपद डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याकडे देण्यात आलं होतं. स्वत: भाई अनंत चित्रे बाबासाहेबांना आणण्यासाठी मुंबईत गेले होते. खोतशाही नष्ट करा, सावकारशाही नष्ट करा अशा घोषणाही या परिषदेतच देण्यात आल्या. बाबासाहेबांनी शेतकरी मजूर पक्षाची घोषणा याच परिषदेत केली. तर पुढे शंकरराव मोरेंसारख्या मंडळींनी स्थापन केलल्या शेतकरी कामगार पक्षाचे बिजं सुद्धा चरीच्या शेतकरी संपात असल्याचं बोललं जातं. सावकारांविरोधात या परिषदेत भाषणं झाली. आधीपासूनच संपाविरोधात असलेल्या कुलाबा समाचारने त्यावेळी लेख छापला आणि त्याला मथळा दिला 'सावकार तितका तुडवावा'. जगातील शेतकऱ्यांच्या इतिहासात नोंद झालेल्या महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या या निर्धाराला 'चरीचा शेतकरी संप' म्हणून ओळखलं जातं. कोकणातील खोती पद्धतीविरोधात हे शेतकरी मोठ्या धैर्याने एकवटले होते.

रायगड जिल्ह्यातील अलिबागजवळील चरी या कृषीप्रधान ग्रामीण पट्ट्यात आजपासून सुमारे ९२ वर्षांपूर्वी हा संप झाला होता. पण बाबासाहेबांच्या भेटीनंतर चर्चेलाही वेग आला. २५ ऑगस्ट १९३५ रोजी जिल्हाधिकाऱ्यांनी कुळ आणि खोतांमध्ये चर्चा घडवून आणली. पण त्यातून काहीच निष्पन्न झालं नाही आणि संप सुरूच राहिला.पुढे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्वतंत्र मजदूर पक्षाच्या १४ आमदारांच्या पाठिंब्यावर १७ सप्टेंबर १९३९ रोजी खोती पद्धत बंद करण्याचे विधेयक मुंबई विधिमंडळात मांडले. त्यानंतर सरकारला जाग आली आणि मोरारजी देसाईंना संपकऱ्यांना भेटण्यासाठी पाठवण्यात आलं बाळासाहेब खेर हे मुंबई प्रांताचे मुख्यमंत्री होते. त्यांनी मंत्रिमंडळातील महसूलमंत्री असलेल्या मोरारजी देसाईंना चरीला जाऊन आढावा घ्यायला सांगितलं. त्यावेळी मोरारजींनी दिलेले आश्वासन नारायण नागू पाटलांना पटलं होतं. नारायण नागू पाटील त्यांच्या 'कथा एका संघर्षाची' या स्व.प्रभाकर पाटील संपादित ग्रंथात असे म्हणतात, 'मोरारजीभाईंनी लवादनाम्याद्वारे दिलेला निकाल माझ्या अपेक्षेपेक्षाही नि:पक्षपाती आणि समतोल होता. शेतकऱ्यांच्या काही मागण्या मान्य झाल्या. शेतकऱ्यांचा विजय झाला होता.' यानंतर संपाचं वातावरण निवळू लागलं आणि दुसरीकडे शेतकरीही संपाने त्रासले होते. हाता-तोंडाची गाठभेट होत नव्हती, इतकं संकट आलं होतं. पण अशा स्थितीतही हा संप सहा वर्षे टिकला. १९३९ साली सरकारने कुळांना संरक्षण देण्याची घोषणा केली आणि २७ ऑक्टोबर १९३३ पासून सुरू असलेला संप अखेर मिटला. कुळ कायद्याचा जन्म या संपामुळेच झाला.

महाराष्ट्रात १९३९ साली कुळांना अधिकृत संरक्षण मिळालं. कसेल त्याची जमीन हे तत्त्व मान्य केलं आणि प्रत्यक्ष जमीन कसणाऱ्या कुळांना जमिनीची मालकी मिळण्याची तरतूद करण्यात आली. तत्कालीन इंग्रज सरकारला झुकवणाऱ्या या संपाचं नेतृत्त्व केलं होतं शेतकरी-कामगार नेते नारायण नागू पाटील यांनी. याच संपामुळे पुढे महाराष्ट्रात कुळ कायदा लागू झाला. या ऐतिहासिक संपाच्या वर्धापन दिनानिमित्त चरी संपाचे क्रांतीयोद्धे स्व.आप्पासाहेब उर्फ नारायण नागू पाटील आणि समस्त चरी कोपर येथील बहाद्दर शेतकरी यांना एक संघटनात्मक परंतु अहिंसक मार्गाने चालविलेला यशस्वी लढा भविष्यातील अनेक पिढ्यांना प्रेरणादायी ठरेल यात शंका नाही अशा संपाच्या मानकऱ्यांना त्रिवार मानाचा मुजरा.

## आरसीएफची मोबाईल मेडिकल व्हॅनव्दारे वैद्यकीय सेवा



**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

आरसीएफ थळ तर्फे निगमित सामाजिक दायित्व अंतर्गत कारखाना परिसरातील ग्रामपंचायत हद्दीत फिरते वैद्यकीय चिकित्सा वाहन माध्यमातून विनामूल्य वैद्यकीय सेवा सुरु करण्यात आली आहे. किहीम येथे कार्यकारी संचालक (वित्त) पी. शिवकुमार आणि कार्यकारी संचालक (थळ) नितिन हिरडे यांच्या शुभहस्ते या वाहनांना हिरवे झेंडे दाखवून सेवेचा शुभारंभ करण्यात आला.

कारखाना परिसरातील ग्रामस्थांचे आरोग्यमान उत्तम रहावे यादृष्टीने आरसीएफ तर्फ सीएसआरच्या माध्यमातून परिसरातील आरोग्यवर्धिनी प्राथमिक आरोग्य केंद्रांना सहाय्य, वेळोवेळी विनामूल्य आरोग्य चिकित्सा, नेत्र चिकित्सा शिबिरांचे आयोजन व मोफत औषधे चष्मे वाटप यांसारखे विविध उपक्रम सातत्याने राबविले जातात याचाच एक भाग म्हणून कारखाना परिसरातील ग्रामपंचायत हद्दीत फिरते वैद्यकीय चिकित्सा वाहन माध्यमातून विनामूल्य वैद्यकीय सेवा देण्याचा उपक्रम राबविला जातो. या अंतर्गत तज्ज्ञ डॉक्टर्स वाणि फार्मासिस्ट सह दोन मेडिकल व्हॅन्स कारखाना परिसरातीन गावातील नियोजित स्थळी गरजूंची विनामूल्य तपासणी करून औषधे देतील.

या सेवेचा शुभारंभाप्रसंगी कार्यकारी संचालक नितिन हिरडे यांनी सद्य परिस्थितीत सर्वांगीण स्वास्थ्याचे महत्व विशद करून सीएसआरच्या माध्यमातून कारखाना परिसरात लोकोपयोगी उपक्रम राबविले जातीच याची ग्वाही दिली. कार्यकारी संचालक (वित्त) पी. शिवकुमार परिसरातील नागरिकांच्या एकंदरीत स्वास्थ्यासाठी आरसीएफ राबवित असलेल्या उपक्रमांचे कौतुक करून फिरते वैद्यकीय चिकित्सा वाहन (मोबाइल मेडिकल व्हॅन) उपक्रमास शुभेच्छा दिल्या.

## 'नोटा' पर्यायाचा टक्का घसरला

**। पनवेल । वार्ताहर ।**

पनवेल विधानसभा मतदारसंघात मतदानाचा टक्का वाढला असला तरी नोटाला मात्र २०१९ च्या तुलनेत कमी मतदान झाले आहे. गेल्या वेळी १२ हजार ३९९ मतदारांनी नोटाला पसंती दिली होती. या निवडणुकीत हा आकडा खाली आला असून केवळ तीन हजार ९०५ मते नोटाला मिळाली आहेत. त्याचबरोबर काही महिन्यांपूर्वी पार पडलेल्या लोकसभा निवडणुकीतसुद्धा यापेक्षा जास्त जणांनी नोटा पर्यायाचा वापर केला. त्यामुळे हा टक्का घसरल्याचे एकंदरीत दिसून आले.

मतदान हे आपले राष्ट्रीय कर्तव्य मानून त्या लोकशाहीच्या उत्सवात आपण सहभागी होणे आवश्यक आहे. आपले एक मत हे खूप अनमोल मानले जाते. त्याच्यामुळे एखाद्या उमेदवाराचा पराभव; तरं कोणाचा तरी विजय होऊ शकतो. याशिवाय जर मतदारांना कोणताही उमेदवार पसंत नसेल तर आपण नोटाचा पर्याय वापरू शकतो. मतदान यंत्रावर नोटाचे सर्वात शेवटी बटन असते. पनवेल हे मिश्र लोकवस्तीचे ठिकाण आहे. या परिसरामध्ये सुशिक्षित मध्यमवर्गाचा प्रभावसुद्धा मोठा आहे. याव्यतिरिक्त उच्चभ्रू सोसायटीतील लोकही या भागात राहतात.

२०१९ला पनवेल विधानसभा मतदारसंघात १२ हजार ३९९ मतदारांनी नोटाचा वापर केला होता. आता दोन दिवसांपूर्वी पार पडलेल्या विधानसभा निवडणुकीत या मतदारसंघात ३,९०५ मतदारांनी नोटाला मतदान केले. त्यामुळे यावेळी हा पर्याय खूपच कमी मतदारांनी वापरल्याचे दिसून आले. लोकसभा निवडणुकीत पनवेल विधानसभा मतदारसंघातील ४,४०० मतदारांनी नोटाचे चिन्ह दाबून सर्वच उमेदवारांना नापसंती दिली होती; मात्र हे प्रमाण दिवसेंदिवस कमी होत असल्याचे दिसून येत आहे.

**समस्या, प्रश्न आणि अडचणी या प्रत्येक मतदारसंघात असतात. उमेदवारांचे प्लस-मायनस पॉईंट असतात. त्यामुळे कोणा एकाची मतदाराला निवड करावी लागते. यापैकी कोणीही पसंत नसेल तर नोटा हा पर्याय निवडणूक आयोगाने दिलेला आहे. मागील निवडणुकीत पनवेल विधानसभा मतदारसंघात अपक्षेपेक्षाही नोटाला अधिक पसंती मिळाली होती; परंतु यावेळी हा आकडा आठ हजाराने ही कमी झाला आहे.**
**- वैशाली जगदाळे, अध्यक्ष, संकल्प शैक्षणिक व सामाजिक संस्था.**

## निवडणुकीनंतर शहरात अनधिकृत होर्डिंगचा विळखा

**। तुर्भे । वार्ताहर ।**

विधानसभा निवडणुकीनंतर शहराला पुन्हा अनधिकृत होर्डिंगचा विळखा पडला आहे, मात्र याकडे पालिका प्रशासन दुर्लक्ष करत असल्याने नाराजी व्यक्त करण्यात येत आहे, तसेच संबंधित होर्डिंग लवकरात लवकर हटवावे, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत विजयी उमेदवारांच्या जाहिराती शहरात मोठ्या प्रमाणात विनापरवाना लावण्यात आल्या आहेत. यामुळे शहराला विद्रूपीकरण आले आहे. विशेष म्हणजे नवी मुंबई महापालिकेचे आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार शहरातील अनधिकृत होर्डिंगवर कारवाई करण्याचे आदेश दिले होते, मात्र त्यांच्या या आदेशाला न जुमानता राजकीय पक्षांच्या कार्यकर्त्यांनी राजरोस मोठ्या प्रमाणात अनधिकृत होर्डिंग लावले आहेत. याप्रकरणी होर्डिगवर कारवाई करण्याची मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

अनधिकृत होर्डिंगमुळे नवी मुंबई महापालिकेचा लाखो रुपयांचा महसूल बुडत आहे. असे असतानाही महापालिका प्रशासन त्याकडे कानाडोळा करताना दिसून येत आहे. विशेष म्हणजे नवी मुंबई महापालिकेचे मुख्यालय असलेल्या किल्ले गावठाण चौकातही अनधिकृत होर्डिंग लावण्यात आलेले आहेत, तसेच तुर्भे नाका, तुर्भे स्टोअर, आयसीएल शाळा चौक, अरेंजा सर्कल, कोपरखैरणे डी- मार्ट, ऐरोली सेक्टर पाच चौक, घणसोली, सीबीडी बेलापूर येथील कोकण भवन चौक, पोलिस आयुक्तालयाकडे जाणारा चौक, दिवाळी गाव, अग्रोली गाव, नेरूळ अक्षर चौक, गायमुख चौक, सारसोळे बस डेपो, समाधान चौक, एलपी चौक, राजीव गांधी उड्डाणपूल चौक या ठिकाणी मोठ्या प्रमाणात अनधिकृत होर्डिंग लागलेले आहेत. बहुतेक होर्डिंग पालिकेची कोणतीही परवानगी न घेता लावण्यात आलेले आहेत.

## सर्पमित्राने दिले सात फुटी अजगराला जीवदान

**। मुरुड । प्रतिनिधी ।**

एकदरा खोरा परिसरात जाळ्यात अडकलेल्या सात फुटी अजगराला सुखरूप सोडवून सर्पमित्र महेश साळुंखे यांनी जीवदान दिले आहे. या अजगराला पकडल्यानंतर संबंधित वनखात्याच्या ताब्यात देण्यात आले आहे.




खोरा बंदराजवळ असलेल्या एका झाडावर मच्छिमारांच्या ठेवलेल्या जाळ्यात अडकलेल्या अजगराला मारून टाकणे शक्य होते परंतु कोळी बांधवांनी त्याला न मारता जवळच राहतं असलेल्या सर्पमित्र महेश साळुंखे यांना पाचारण केल्याने या अजगराचे जीव वाचले.

## क्लासिफाईड

जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- सन स्टोन रीयल इस्टेट, साईना कॉम्प्लेक्स, चर्चच्यासमोर(ऑफीस, अलिबाग व आजुबाजुच्या गावामध्ये N.A.Plat बागायती प्लॉट भातशेती खरेदी व विक्री. संपर्क :८६६९००६९०२/९२७०८८८८०३
- नागाव मधील हॉटेल मध्ये काम करण्यासाठी स्टाफची आवश्यकता आहे. हाऊस कीपर, नाईट शिफ्ट हाऊस कीपर, वेटर ० ते २ वर्षे अनुभव असणाऱ्यांनी सकाळी १० ते ५ या वेळेत संपर्क साधावा. अथवा व्हॉटसअॅप वर मेसेज करावा. मोबाईल - ७५५९१८४६१२
- नागावमधील हॉटेलमध्ये ऑलरॉऊंडर कुक, कॅप्टन, वेटर आणि हाऊसकिपर इत्यादी कामासाठी माणसे पाहिजेत. (पार्ट टाईम काम सुद्धा मिळेल.) मो.९९२१९७८०८०
- महाराष्ट्रातील कोकणस्त प्रथम वधूवरांना तसेच घटस्फोटित, विधवा, विधूर, यांना आपला मनपसंत जोडीदार निवडण्यासाठी एकच नाव लग्न सोहळा मुंबई ९७०२५२७३७३
- अलिबाग येथील नामांकित आर्किटेक्ट ऑफिस करीता खालील पदे भरावयाची आहेत. 1] Receptionist 2] Civil Draftsman [Auto cad drafting ची माहिती असलेला) 3] Civil Engineer संपर्क -: मो नं ९७६७७४४६५८, ९८२२५८५५००

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

### रानफळांच्या विक्रीतून अर्थाजनाचा मार्ग झाला सुकर

## रायगडात हिवाळी रानफळांना आला बहर

**। माणगाव । वार्ताहर।**

**नुकताच हिवाळा सुरू झाला आहे. हिवाळी दिवसांत रानावनात होणाऱ्या रान फळांना बहर येण्यास सुरूवात झाली आहे. हिवाळा सुरू झाला की सर्वांना वेध लागतात ते गुलाबी थंडीचे आणि या थंडीच्या दिवसात खायला मिळणाऱ्या विविध रान फळांचे. नुकतीच थंडीला सुरुवात झाली असून खास हिवाळ्यातील रानफळांचे आगमन सुरू झाले आहे.**

उन्हाळ्यात ज्याप्रमाणे रानावनात आंबे, जांभूळ, काजू, इत्यादी रानफळे खावयास मिळतात तसेच खास हिवाळी दिवसातही विविध प्रकारच्या रानफळांना बहर येत असतो. यामध्ये बोंडे, आवळा, बोरे, चिंच इत्यादी फळांचा समावेश होतो. चवीला गोड नसणारी आंबट, तुरट वर्गात मोडणारी ही फळे यांच्या वैशिष्ट्यपूर्ण चवीमुळे सर्वांसाठी आकर्षणाचा भाग आहेत.

पावसाळा संपल्यानंतर सुरू होणाऱ्या थंडीच्या मोसमातील पौष्टिक व आरोग्यवर्धक फळे म्हणून ही फळे प्रसिद्ध आहेत. पावसाळ्यानंतरच्या वाढणाऱ्या उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर व थंडीच्या मोसमात ही फळे तयार होतात.

आवळा, बोरे, चिंच ही आंबट चवीसाठी प्रसिद्ध असून खास हिवाळ्यात तयार होणारी बोंडे ही तुरट-राकट चवीसाठी प्रसिद्ध आहेत. काटेरी अशा बोरीच्या झाडांवर आढळणारी बोरे पक्की होण्यास सुरुवात झाली असून बाजारात पाच ते दहा रुपयांना पुरचुंडीमध्ये ती विकली जात आहेत. कोकणातील रानावणात होणारी ही बोरे खास वाळवून उन्हाळी दिवसांसाठीही ठेवली जातात. खाडी पट्ट्यातील टपोऱ्या बोरांचे खवय्यांना खास आकर्षण असते. बोरा प्रमाणेच या दिवसात आंबट- चिंबट अशा चिंचांचा मोसम सुरू झाला आहे. चिंचांनी चिंचेची झाडे लगडलेली दिसून येत आहेत. याच दिवसातील चिंचांचा स्वाद घेणे,मिठासोबत खाणे अनेक जण पसंत करतात. पूर्ण परिपक्व झालेल्या चिंचांचा मोसम सुरू होत असून खवय्यांना आंबट चव देणाऱ्या चिंचांची बोंडूके भुरळ घालत आहेत. चिंचेचा कोळ तयार करणे चिंचोके तयार करणे इत्यादी कामे या दिवसात घरोघरी केली जातात. या उद्योगातून अनेक कुटुंबांना अर्थाजनही प्राप्त होत असते. दहा ते पंधरा रुपये वाटा याप्रमाणे या चिंचा विकल्या जात आहेत.



अशा या खास दिवाळी दिवसातील रानफळांची सध्या सर्वत्र चर्चा असून या रानफळांना चांगली मागणी आहे. ही फळे खास क जीवनसत्व देण-ारी असून थंडीच्या दिवसांत उत्तम आरोग्यासाठी ही फळे खाणे आवश्यक असल्याचे जाणकार सांगतात.

जंगलातील वनवे आणि वृक्षतोड यामुळे या रानमेवांच्या झाडांची संख्या कमी होत असली तरी या रान फळांचा गोडवा आणि चव खवय्यांच्या जिभेवर कायम रेंगाळत असते. रान फळांना बाजारात विक्रीसाठी चांगली मागणी आहे. वाट्यावर, किलो प्रमाणे हि फळे विकली जातात. यातून अर्थार्जन होत असते.

कृषीवल | रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग
आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)



# वाहन पसंती क्रमांकाचे करा हस्तांतर

। पनवेल। वार्ताहर ।

वाहनांचा पसंती क्रमांक आता घरातील सदस्यांच्या नावे हस्तांतर करणे शक्य झाले आहे. कारण, राज्याच्या परिवहन विभागाने तसा निर्णय घेतला असून, त्याची अंमलबजावणीदेखील सुरू झाली आहे. या निर्णयामुळे वाहनधारकांना मोठा दिलासा मिळालेला आहे. विशेषतः चारचाकी ग्राहकांच्या बाबतीत हा निर्णय फायद्याचा ठरणार आहे.

वाहनांच्या पसंती क्रमांकांच्या विक्रीतून परिवहन विभागाला पर्यायाने राज्य सरकारला दर महिन्याला कोट्यवधी रुपयांचा महसूल मिळतो. चारचाकीचे पसंती क्रमांकाचे दर हे दहा हजार ते पाच लाख रुपयांपर्यंत निश्चित करण्यात आले आहेत. त्यात जर विशिष्ट क्रमांकासाठी एकाहून अधिक अर्ज आले, तर त्या क्रमांकासाठी बोली लावली जाते. हा आकडा निश्चितच पाच लाखांहून जास्त असतो. यावरून पसंती क्रमांकाला वाहनधारकांकडून मिळणारा प्रतिसाद लक्षात येतो. वाहन क्रमांकाचे पती, पत्नी, मुलगा व मुलगी यांच्या नावे हस्तांतर करता येणार आहे. ज्याच्या नावे वाहन घ्यायचे आहे, त्यांचा मृत्यू झाला, तर तो क्रमांक सदस्यांच्या नावे हस्तांतर करणे शक्य झाले आहे.




## मृत्यूनंतर होणारे नुकसान टळणार

वाहनाचा पसंती क्रमांक ज्या व्यक्तीच्या नावे नोंदविला आहे, त्या व्यक्तीचा मृत्यू झाला तर त्या बाबतीतदेखील क्रमांकाची रक्कम सरकार जमा होते, मात्र त्या व्यक्तीच्या नातलगांना तो क्रमांक दिला जात नाही. दुसरा क्रमांक घेण्यासाठी त्यांना परिवहन कार्यालयात ती रक्कम भरावी लागते. यातदेखील आर्थिक नुकसान होते. त्यामुळे हस्तांतरणाचा निर्णय महत्त्वाचा वाटतो.

## निर्णय का महत्त्वाचा?

अनेकदा काही व्यक्ती आपल्या पत्नीच्या नावे चारचाकी घेण्याचे ठरवितात. त्यासाठी पत्नीच्या नावेच पसंती क्रमांक आरक्षित केला जातो, मात्र बँकांकडून अथवा वित्तीय संस्थांकडून कर्ज उपलब्ध करण्यात अडचण निर्माण होते. त्या वेळी पतीच्या नावे कर्ज घेण्यात येते, मात्र पसंती क्रमांकाचे हस्तांतर करता येणे शक्य नसल्याने संबंधित वाहनधारकाने भरलेली रक्कम सरकारकडे जमा होते, मात्र तो क्रमांक संबंधित व्यक्तीला दिला जात नाही. परिणामी, वाहनधारकांचे आर्थिक नुकसान होते. यासाठी आरटीओने घेतलेला हस्तांतरणाचा निर्णय फायद्याचा ठरणार आहे.

## कालावधी आता सहा महिन्यांचा

पसंती क्रमांक आरक्षित केल्यापासून पुढच्या एक महिन्यापर्यंत त्या क्रमांकाची वैधता होती. त्यात जर तो क्रमांक वाहनाला मिळाला नाही तर महिन्यानंतर तो क्रमांक दुसऱ्या वाहनधारकाला दिला जातो. या प्रकरणात त्या क्रमांकाची रक्कम सरकारकडे जमा होते. त्यामुळे आता एक महिन्याची असणारी वैधतेची मुदत सहा महिने करण्यात आली आहे. वाहनाचा पसंती क्रमांक घेतल्यानंतर गाडीची डिलिव्हरी लेट झाली किंवा लोन प्रकरणात विलंब झाला, तर वाहनधारकाचा हिरमोड होत होता. परिवहन विभागाच्या या निर्णयामुळे वाहनधारकांना दिलासा मिळाला आहे. त्यामुळे त्यांचे आर्थिक नुकसान होणार नाही, असे पनवेलचे सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी नीलेश धोटे यांनी सांगितले.


# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोल्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**


### जाहीर नोटीस

याद्वारे सामान्य जनतेला नोटीस देण्यात येत आहे की, आमचे अशिल इच्छुक असल्याने आम्ही श्री. राजेंद्र नारायण पाटील (मालक) यांच्या मालमत्तेची विशेषतः खाली दिलेल्या परिशिष्ट मध्ये वर्णन केलेल्या मालमत्ता याची चौकशी करत आहोत.

कोणत्याही व्यक्ती किंवा संस्थेला सदर मालमत्ता किंवा त्यावरील कोणत्याही भागाच्या संदर्भामध्ये/विरूद्ध कोणताही हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा मागणी/किंवा आक्षेप जसे की, विक्री अदलाबदल, भाडेपट्टा, कुळवहिवाट, परवाना, विश्वस्त, धारणाधिकार, निर्वाह, सुविधाधिकार, वारसाहक्क, ताबा, जप्ती, गहाण, प्रभार, बक्षीस, प्रलंबित वाद, एफ.एस.आय वापर किंवा अन्य काही दावे असल्यास त्यांनी तसे लिखीत सुचनेसह झुंजारराव आणि कं. ॲडव्होकेट आणि सॉलिसिटर्स, ४ था मजला, जलाराम ज्योत, जन्मभुमी मार्ग, फोर्ट, मुंबई - ४०० ००१ येथे तसे हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा मागणी आणि/किंवा आक्षेपाच्या कागदपत्रांच्या प्रमाणित सत्य प्रतींसह या सुचनेच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून १४ (चौदा) दिवसांचे आत कळविणे आवश्यक आहे, कसूर केल्यास, तसा दावा, मागणी किंवा आक्षेप अस्तित्वात नसल्याचे मानण्यात येईल आणि जरी तसा दावा, मागणी किंवा आक्षेप कायद्यात किंवा अन्यथा अस्तित्वात असल्यास, दावेदारांनी तसा दावा, मागणी किंवा आक्षेप रद्द केल्याचे मानण्यात येईल आणि/किंवा तसा दावा, मागणी किंवा आक्षेप आमचे अशिलांवर बंधनकारक असणार नाही आणि आमचे अशिल वर नमूद केल्याप्रमाणे सदर मालमत्तेसंदर्भात खरेदीव्यवहार करू शकतात.

**परिशिष्ट**
**( मालमत्तेचे वर्णन)**

| मौजे | भुमापन क्रमांक/ उपविभाग | क्षेत्र (आर.चौ.मी.) | आकार (रू.पैसे) |
|---|---|---|---|
| नारंगी | ७ | एकुण ७-७३-०० | ७७.३० |
| ता.अलिबाग | ८ | एकुण ४-५७-०० | ४५.७० |

सदर बिनशेती मिळकती या नोटीसीचा विषय आहेत.

ठिकाण -अलिबाग
दिनांक :२७/११/२०२४

**झुंजारराव ॲन्ड कंपनी करीता**
**ॲड. विक्रांत झुंजारराव**

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची जमिन मिळकत तिचे मालक हिराबाई परशुराम पाटील व इतर ६ यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तिचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे:

**मौजे- ढाक तालुका कर्जत जिल्हा रायगड येथील जमिन मिळकत**

| भूमापन क्रं व उपविभाग/ सर्व्हे नंबर/ हिस्सा नंबर | क्षेत्र (हे.आर.पॉ) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|
| ३० | एकुण क्षेत्र १-२२-०० हे आर पॉ | २-०६ |

या मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, बयानापावती खरेदीखत, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीज, कब्जा, लोन, भाडेपट्टा, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत लेखी पुराव्यासह खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक : २७/११/२०२४ **ॲड. निलेश कान्हु मोरे** मोबा. ९८२२६९११०९
ऑफिस पत्ता- शॉप नं. २९, तळ मजला,
हिरापन्ना शॉपिंग प्लाझा बिल्डींग, भारत गॅस समोर.
अमराई रोड, कर्जत ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१

### जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येते की, आमच्या अशिलांनी मौजे तिवणे, ता. कर्जत, जि. रायगड येथील हक्क नोंदीस वर्णन असलेली जमिन मिळकत तिचे मालकांकडून खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे तिवणे, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमिन मिळकत**

| जमिन मालकाचे नाव | सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|---|
| अभय अंबाजी राणे | २४ | ११अ | ०-३१-८० | ०.२२ |

तरी वरील मिळकतीमध्ये इतर कोणत्याही प्रकारचे हक्कहितसंबंध असल्यास व सदर व्यवहार होण्यास कोणाचीही हरकत असल्यास सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत पूराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही जाहिर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून चौदा (१४) दिवसांत नोंदवावी. सदर नोटीसीच्या मुदतीत हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध बोजारहित आहे, असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

कर्जत
दिनांक : २७/११/२०२४

**ॲड. साहिल राजेंद्र निगुडकर**
पत्ता कोर्ट व्ह्यु को. ऑप. हौ. सोसायटी, शॉप नं. १, कर्जत सिव्हील कोर्ट समोर, कर्जत रायगड
मो.: ९५९५३२४२३४/९५६१५७५६२६

**ॲड. राजेंद्र पी. निगुडकर**
पत्ता: ओम श्री भाग्योदय को. ऑप. हौ.सो. कोतवाल नगर, कर्जत, जि. रायगड
मो. : ९८२२७७४०७५/८४८४९६५६२६

### वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतीलउत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

### पनवेल महानगरपालिका

ता.पनवेल, जिल्हा-रायगड, पनवेल ४१० २०६
दुरध्वनी कार्यालय : ०२२-२७४५८०४०/४१/४२ फॅक्स नं. : ०२२-२७४५२२३३
उपायुक्त कार्यालय : ०२२ - २७४५५७५१ आयुक्त कार्यालय : ०२२- २७४५२३३९
ई-मेल : panvelcorporation@gmail.com वेबसाईट : www.panvelcorporation.com
जा.क्र. पमपा/मातंवि/१२२४/प्र.क्र.०३/५४७/२०२४ दिनांक : २६/११/२०२४

**अंदाजपत्र बनविणेकामी**

| अनु. क्र. | निविदा क्र. | कामाचे नाव |
|---|---|---|
| १. | निविदा/पमपा/मातंवि/२२२४/प्र.क्र. ०३ /२०२४-२५ | पनवेल महानगरपालिका मुख्यालय, सर्व प्रभाग समिती कार्यालये व सर्व नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र येथे इंक बॉटल व मेंटेनन्स बॉक्सचे दर मंजूर करणेबाबत. |

या निविदेबाबतची माहिती वृत्तपत्रात प्रसिद्ध करण्यात येत आहे. सदरबाबतची दरपत्रके दि. २७/११/२०२४ ते दि. ०३/१२/२०२४ रोजी दुपारी ०३.०० वाजे पर्यंत माहिती व तंत्रज्ञान विभाग, पनवेल महानगरपालिका येथे सादर करण्यात यावी. सदर कामाबाबतची विस्तृत माहिती पनवेल महानगरपालिकेच्या माहिती व तंत्रज्ञान विभागात प्राप्त होईल. संबंधित निविदाधारकांनी याची नोंद घ्यावी.

सही/-
उप आयुक्त (I)
पनवेल महानगरपालिका

### महाराष्ट्र शासन
**महसुल व वनविभाग**
**तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी तळा यांचे न्यायालय, तळा जि. रायगड**
**दुरध्वनी क्रमांक - ०२१४०-२६९३१७ फॅक्स-२६९०४२**
Email ID -tahasiltala@gmail.com

क्र.प्रशासन कात-५/जन्म-मृत्यू/जाहिर नोटीस/२४१५/२०२४ दि.०८/१०/२०२४

**जाहिर नोटीस मसुदा**

श्रीम. अमिता राकेश जाधव — अर्जदार
रा. रेवदंडा, ता. अलिबाग जि. रायगड

विरुद्ध

१. निबंधक जन्म-मृत्यू व विवाह नोंदणी अधिकारी — सामनेवाला
गटविकास अधिकारी पंचायत समिती तळा
२. गृप ग्रामपंचायत मांदाड ता. तळा जि. रायगड.

तमाम जनतेस या जाहिर नोटीस अन्वये कळविण्यात येते की, सदरहू अर्जदार यांनी कै. विलास कृष्णा तांदलेकर यांचा मृत्यू दि.१३/०४/२००० रोजी मौजे कुडे, ता. तळा, जि. रायगड येथे झाला असून त्यांचे मृत्यूची नोंद सामनेवाल्यांचे कार्यालयीन अभिलेख सदरी नसल्यामुळे सामनेवाल्यानी तसा दाखला अर्जदार यांना दि.१०/०७/२०२४ रोजी दिला आहे. त्यामुळे अर्जदार यांनी या न्यायालयामध्ये त्यांचे चुलते कै. विलास कृष्णा तांदलेकर यांचा मृत्यू दि.१३/०४/२००० रोजी झाले असल्याचे घोषीत करुन मृत्यू दाखला आदेश मिळणेकरीता कार्यकारी दंडाधिकारी तळा यांचे न्यायालयात जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अन्वये व तशी नोंद दाखल होऊन दाखला मिळणेकरीता या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. सदर दाखला देणेस कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरीता १ महिन्याचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे. न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळविण्यात यावी.

विहीत मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार यांचे चुलते कै. विलास कृष्णा तांदलेकर यांचा मृत्यू दि.१३/०४/२००० रोजी मौजे कुडे ता.तळा येथे झाला असल्याचे गृहित धरून सदर प्रकरणी पुढील योग्य तो आदेश पारीत केला जाईल याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

आज दिनांक ०८ ऑक्टोंबर २०२४ रोजी माझे सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले

सही/-
**(स्वाती पाटील)**
**कार्यकारी दंडाधिकारी तळा**

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे धोकवडे ता. अलिबाग जि.रायगड येथील खालील वर्णन केलेल्या मिळकतीचे विद्यमान मालक १. सौ. अर्चना अच्युत म्हात्रे रा. हरिश बेकरी समोर नवेदर चेंढरे अलिबाग ता. अलिबाग, जि. रायगड २. सौ. विदुला रमेश ठाकुर रा सासवणे खारदळआळी, सासवणे ता. अलिबाग, जि. रायगड ३. सौ. प्रगती प्रतिश म्हात्रे रा. घर नं. ३३, म्हातवली, नवे पोपुड उरण, ता. उरण, जि. रायगड यांच्या नांवे असलेली सामाईक मालकी हक्काची व त्यांचे ताबे कब्जातील व वहिवाटीतील खालील वर्णन केलेली मिळकत माझे आशिल यांना कायमस्वरूपात विकत घेण्याचे ठरविले आहे. त्याबाबत तशा आशयाची साठेकरार विद्यमान मालकांबरोबर झालेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग क्र. | क्षेत्र (हे.आर) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| धोकवडे ता.अलिबाग जि.रायगड | ३९ | ०-३३-४० पो.ख. ०-०२-३० एकुण क्षेत्र ०-३५-७० | ४.६९ |

वर नमुद भातशेती मिळकतीपैकी दुसरेपक्षी यांच्या मालकी हक्कात व ताबेकब्जा वहिवाटीतील हिश्श्याचे ०-१५-३० हे. आर मिळकतीचा

सदर मिळकत निर्वेध असल्याचा निर्वाळा विद्यमान मालकांनी दिलेला आहे. तरी याउपरही सदरहु मिळकतीमध्ये अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कुळ वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, खरेदीखत, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी या नोटीशीच्या तारखेपासुन चौदा दिवसांचे आत प्रथमदर्शनी पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खालील पत्त्यावर समक्ष वा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. जर विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहे, असे गृहित धरून माझे आशिल वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पुर्ण करतील. याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

तारीख :-२६/११/२०२४

सही /-
**ॲड. रिया गणेश पाटील**
रा. मु. नेहुली, पो. खंडाळे
ता. अलिबाग, जि. रायगड.
मोबाईल नं. ९६०७३३१९७५

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमिन मिळकत या त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांकडून आमचे अशिल एस. बी. मसणे, यांनी कायमचे खरेदीखताद्धारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा चार्ज, ताबेकब्जा, कुलमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन ७ (सात) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचाही हरकत न आल्यास आमचे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या भातशेती/रापड जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**मौजे :- भडवळ, ता. कर्जत, जि. रायगड येथील मिळकत :-**

| मालकांचे नाव | स.नं./हिस्सा नं. | क्षेत्रः हे.आर.प्रति | आकार |
|---|---|---|---|
| श्री श्रीराम धर्मा पाटील व इतर | ४२/५/ब | ०-२७-७० पोट ख.०-०३-७० एकुण ०-३१-४० | ३.९४ |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

कार्यालयीन पत्ता : ए ४ पहिला मजला,
गणेश अपार्टमेंट, कर्जत नगरपरिषद समोर कर्जत,
ता. कर्जत, जि. रायगड.
ठिकाण कर्जत

सही/-
**ॲड.जयेश संभाजी म्हसे**
दिनांक: २७/११/२०२४
मो.नं. ९०२८९८२२१७

### जाहीर नोटीस

दिनांक २६/११/२०२४

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशील यांनी ग्रुप ग्रामपंचायत तिवरे हद्दीतील मौजे पेडली ता. सुधागड जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत कायम खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन :-**
**मौजे पेडली ता. सुधागड जि. रायगड**

| कब्जेदाराचे नाव | मिळकत नंबर | क्षेत्र. चौ.फुट | मालमत्तेचे वर्णन |
|---|---|---|---|
| श्रीमती.अमिता प्रसेन राऊळ | २४० क | २५२.०० | दुकान गाळा |

सदर वरील वर्णन केलेली एकूण सर्व मिळकत आमचे अशिलांनी सदर मिळकतीचे कब्जेदार यांचेकडून कायम खरेदीने विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी सदर होणारे खरेदी विक्री व्यवहारास कोणाचीही हरकत अथवा दावा असल्यास वा सदरहु मिळकतीचे खरेदी विक्री बाबत तसेच हक्क हितसंबंध, मालकी वहीवाट, पोटगी बक्षिसपत्र मृत्यपत्र, साठेकरार अथवा कोणाचेही काही हक्क हितसंबंध वहीवाट अथवा सदर मिळकतीचे ताबे कब्जा वहीवाट असल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झालेपासून संबंधित तक्रारदार याने आपली हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासहीत ७ दिवसांचे कालावधीत खालील पत्त्यावर नोंदवावे. सदर कालावधीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित आहे. असे समजून आमचे अशिल सदरचा खरेदी विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेली हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची नोंद घ्यावी.

ठिकाण :- पाली-सुधागड
दिनांक :- २६/११/२०२४

सही/-
**श्री. राहुल जे.भंडारी**
ॲडव्होकेट
रा. पाली ता.सुधागड जि.रायगड
मोबा नं. ९४२३२३२८६२

### महाराष्ट्र शासन
**महसुल व वनविभाग**
**तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी तळा यांचे न्यायालय, तळा जि.रायगड**
**दुरध्वनी क्रमांक ०२१४०-२६९३१७ फॅक्स- २६९०४२.**
Email ID -tahasiltala@gmail.com

क्र. प्रशासन कात-५/जन्म-मृत्यू/ जाहिर नोटीस/२४१४/२०२४ दि.०८/१०/२०२४

**जाहिर नोटीस मसुदा**

श्रीम. अमिता राकेश जाधव — अर्जदार
रा. रेवदंडा, ता.अलिबाग जि.रायगड

विरुद्ध

१. निबंधक जन्म-मृत्यू व विवाह नोंदणी अधिकारी — सामनेवाला
गटविकास अधिकारी पंचायत समिती तळा
२. गृप ग्रामपंचायत मांदाड ता. तळा जि.रायगड.

तमाम जनतेस या जाहिर नोटीस अन्वये कळविण्यात येते की, सदरहू अर्जदार यांनी कै. गोपाळ कृष्णा तांदलेकर यांचा मृत्यू दि.१२/०६/१९९० रोजी मौजे कुडे, ता. तळा, जि. रायगड येथे झाला असून त्यांचे मृत्यूची नोंद सामनेवाल्यांचे कार्यालयीन अभिलेख सदरी नसल्यामुळे सामनेवाल्यानी तसा दाखला अर्जदार यांना दि.१०/०७/२०२४ रोजी दिला आहे. त्यामुळे अर्जदार यांनी या न्यायालयामध्ये त्यांचे चुलते कै. गोपाळ कृष्णा तांदलेकर यांचा मृत्यू दि.१२/०६/१९९० रोजी झाले असल्याचे घोषीत करुन मृत्यू दाखला आदेश मिळणेकरीता कार्यकारी दंडाधिकारी तळा यांचे न्यायालयात जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अन्वये व तशी नोंद दाखल होऊन दाखला मिळणेकरीता या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. सदर दाखला देणेस कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरीता १ महिन्याचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे. न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळविण्यात यावी.

विहीत मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार यांचे चुलते कै. गोपाळ कृष्णा तांदलेकर यांचा मृत्यू दि.१२/०६/१९९० रोजी मौजे कुडे ता. तळा येथे झाला असल्याचे गृहित धरुन सदर प्रकरणी पुढील योग्य तो आदेश पारीत केला जाईल याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

आज दिनांक ०८ ऑक्टोंबर २०२४ रोजी माझे सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

सही/-
**(स्वाती पाटील)**
**कार्यकारी दंडाधिकारी तळा**

### महाराष्ट्र शासन
**महसुल व वनविभाग**
**तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी तळा यांचे न्यायालय, तळा जि.रायगड**
दुरध्वनी क्रमांक - ०२१४०-२६९३१७ फॅक्स-२६९०४२
Email ID -tahasiltala@gmail.com

क्र.प्रशासन कात-५/ जन्म-मृत्यू/जाहिर नोटीस/२८३५/२०२४ दि.०८/१०/२०२४

**जाहिर नोटीस मसुदा**

श्रीम. अमिता राकेश जाधव — अर्जदार
रा. रेवदंडा, ता. अलिबाग जि.रायगड

विरुद्ध

१. निबंधक जन्म-मृत्यू व विवाह नोंदणी अधिकारी — सामनेवाला
गटविकास अधिकारी पंचायत समिती तळा
२. गृप ग्रामपंचायत मांदाड ता. तळा जि. रायगड.

तमाम जनतेस या जाहिर नोटीस अन्वये कळविण्यात येते की, सदरहू अर्जदार यांनी कै. पार्वती कृष्णा तांदलेकर यांचा मृत्यू दि.०४/०५/१९८२ रोजी मौजे कुडे, ता. तळा, जि. रायगड येथे झाला असून त्यांचे मृत्यूची नोंद सामनेवाल्यांचे कार्यालयीन अभिलेख सदरी नसल्यामुळे सामनेवाल्यांनी तसा दाखला अर्जदार यांना दि.०६/०८/२०२४ रोजी दिला आहे. त्यामुळे अर्जदार यांनी या न्यायालयामध्ये त्यांची आजी कै.पार्वती कृष्णा तांदलेकर यांचा मृत्यू दि. ०४/०५/१९८२ रोजी झाले असल्याचे घोषीत करुन मृत्यू दाखला आदेश मिळणेकरीता कार्यकारी दंडाधिकारी तळा यांचे न्यायालयात जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अन्वये व तशी नोंद दाखल होऊन दाखला मिळणेकरीता या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. सदर दाखला देणेस कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरीता १ महिन्याचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे. न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळविण्यात यावी.

विहीत मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार यांची आजी कै. पार्वती कृष्णा तांदलेकर यांचा मृत्यू दि. ०४/०५/१९८२ रोजी मौजे कुडे ता.तळा येथे झाला असल्याचे गृहित धरुन सदर प्रकरणी पुढील योग्य तो आदेश पारीत केला जाईल याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

आज दिनांक. ०८ ऑक्टोंबर २०२४ रोजी माझे सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

सही/-
**(स्वाती पाटील)**
**कार्यकारी दंडाधिकारी तळा**

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, आमचे अशिलांनी मौजे आंबिवली / रजपे, तालुका कर्जत, जि. रायगड येथील वनविहार कृषी फलोद्यान विकास सहकारी सोसायटी मर्यादीत आंबिवली या मधील शेअर सर्टिफिकेट नंबर ६३ प्लॉट नंबर १३२ ( शेअर नंबर ३२६ ते ३३०) आणि शेअर सर्टिफिकेट नंबर १७५ प्लॉट नंबर १३३ (शेअर नंबर ८९६ ते ९००) ह्या दोन्ही प्लॉट मिळकती तिचे विद्यमान मालक व कब्जेदार श्री. कॅप्टन महेश गुलबानी यांचेकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविलेले आहे.

सदरच्या प्लॉट मिळकती ह्या वरील मालकांच्या निर्वेध मालकी हक्काच्या व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीच्या असून त्या विकत देण्याचा त्यांना हक्क अधिकार असल्याने त्यांनी सदरील मिळकती या तद्‌गभुत हक्क हितसंबंधासह आमचे अशिलांना विकत देण्याचे ठरविले आहे. तरी वर वर्णन केलेल्या मिळकती संदर्भात इतर कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, मृत्युपत्रांकीत दान, कुळवहिवाट, बोजा, चार्ज लिन वगैरे कोणतेही प्रकारचा हक्कहित संबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाले पासून ०७ दिवसांचे आत खाली सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी हरकती नोंदवाव्यात. मात्र दिलेल्या मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील व मुदती नंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर कोणतेही प्रकारे बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

ठिकाण : कर्जत
दि. २७/११/२०२४

खरेदीदारा तर्फे वकील
**ॲड. लक्ष्मण धर्मराज जाधव**
पत्ता. मार्वल क्षिप्रा रेसीडेन्सी, शॉप नं. २४,
डी विंग, मुद्रे बुद्रक, ता. कर्जत, जि. रायगड
मो. ८१४९२११३६६/७७०९१६०५६७

### सक्षम प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, रायगड यांचे कार्यालय

**शुक्रतारा बिल्डींग, तळ मजला, कामतआळी, सतक्रार प्रेस समोर, ता.अलिबाग, जि. रायगड**
**दुरध्वनी क्रमांक/फॅक्स क्र. ०२१४१-२२२०१३**
ई-मेल.ddr_rgd@rediffmail.com

**महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत (त्या बांधण्यांस प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन, हस्तांतरण त्यांचे नियमन करण्याबाबत) अधिनियम १९६३ चे कलम ११ (३) अन्वये अर्ज मानिव अभिहस्तांतरण (डिम्ड कन्व्हेंयस बाबत) जाहीर नोटीस**

अर्जदार कावेरी डी सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. चेंढरे ता.अलिबाग जि.रायगड यांनी गैरअर्जदार १) श्री किशोर जे तलरेजा बॅरक क्र.अे-५४, रुम नं. ३१९, सती भवन, ता. उल्हासनगर जि. ठाणे, ४२१००१ २) मे. कृष्णा एन्टरप्रायझेस तर्फे प्रोप्रा. श्री किशोर जे तलरेजा बॅरक क्र. अे-५४, रुम नं. ३१९, सती भवन, ता. उल्हासनगर, जि. ठाणे, ४२१००१ यांचेविरुद्ध महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत (मोफा) अधिनियमाचे कलम ११ (३) अन्वये खालील मालमत्तेचे एकतर्फी मानिव अभिहस्तांतरण प्रमाणपत्र करुन मिळणे बाबत अर्ज केला आहे.

**मालमत्तेचे वर्णन**

**भूमापन क्रमांक व उपविभाग १२०/१/अ/6 क्षेत्र 322.50 चौ.मी.**

अर्जदाराचे अर्जाबाबत गैरअर्जदार यांना नोटीस बजावणी झाली नाही. त्यांचे पोस्टाचे पाकीट अपूर्ण पत्ता असा शेरा घेवून परत आले आहे. सबब अर्जदाराचे अर्जाबाबत सर्व गैरअर्जदार यांना या नोटीसद्वारे कळविण्यांत येते की, सदर मिळकतीचे अर्जदारास अभिहस्तांतरण करुन देणे संबंधीचे त्यांचे म्हणणे दिनांक १२/१२/२०२४ रोजी सकाळी ११.३० वाजता उपस्थित राहून मांडावे. तसेच निश्चित दिवशी व वेळी सुनावणीस आवश्यक त्या कागदपत्रांसह हजर रहावे. यात कसूर झाल्यास त्यांची काहीही म्हणणे नाही असा निष्कर्ष नोंदवून पुढील कार्यवाही करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण : अलिबाग
दिनांक २६.११.२०२४

सही/-
**(प्र.का.जगताप)**
**सक्षम प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक**
**सहकारी संस्था, रायगड अलिबाग**

**निवडक**

### ‘विराटकडे अनुभवाची शिदोरी’

**पर्थ :** मागील १५ डावांमध्ये शतकापासून दूर राहिलेल्या विराट कोहलीने पर्थ कसोटीतील दुसऱ्या डावात नाबाद शतकी खेळी करीत भारताच्या विजयात मोलाचा वाटा उचलला. या विजयानंतर कर्णधार जसप्रीत बुमराहने कोहलीच्या अनुभवाचे कौतुक केले. बुमराहने म्हटले की, मी याआधीही म्हटले होते की, कोहलीला आमची गरज नाही. आम्हाला त्याच्या अनमोल अनुभवाची आवश्यकता आहे. ऑस्ट्रेलियात तो चार ते पाच वेळा आला आहे. त्यामुळे त्याच्याकडे अमूल्य अशी अनुभवाची शिदोरी आहे.

### केकेआरचा कर्णधार कोण?

**नवी दिल्ली :** श्रेयस अय्यरला रिलीज केल्यानंतर कोलकताने काही चांगले खेळाडू लिलावातून मिळवले. परंतु, कर्णधार होऊ शकेल असा खेळाडू त्यांना मिळाला नाही. एका मोसमात नेतृत्व केलेल्या नितीश राणासाठी त्यांनी बोली लावली. परंतु, राजस्थान संघाने त्याला ४ कोटी २० लाख रुपयांमध्ये आपल्या संघात घेतले. याशिवाय त्यांनी वेंकटेश अय्यरसाठी २३.४५ कोटी खर्च केला. तसेच, क्विंटन डी कॉक आणि अजिंक्य रहाणे या खेळाडूंना संघात घेतले. मात्र, कोणीही दीर्घकाळासाठी संघाचा कर्णधार होऊ शकेल असा खेळाडू नाही.

### जितेशची ११ कोटींत खरेदी

**अमरावती :** अमरावतीचा धडाकेबाज यष्टीरक्षक जितेश शर्माला २०२५ मध्ये होणाऱ्या आयपीएल क्रिकेट मोसमासाठी रॉयल चॅलेन्जर्स बंगळूरुने ११ कोटी रुपयांमध्ये खरेदी केले आहे. जितेशच्या या यशाने अमरावतीच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. वयाच्या १३ व्या वर्षीपासूनच त्याने श्री. हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या मैदानावर क्रिकेटचे धडे गिरविण्यास सुरवात केली होती. जितेशच्या कुटुंबात आई, वडील आणि एक लहान भाऊ आहे, त्या सर्वांचेच त्याला प्रोत्साहन लाभले आहे.

### ऑस्टेलियन संघात फूट?

**पर्थ :** भारतीचे माजी प्रशिक्षक रवी शास्त्री तसेच इंग्लंडचा माजी कर्णधार मायकेल वॉन यांनी ऑस्ट्रेलियन संघात एकजुटीचा अभाव असल्याचे म्हटले आहे. बॉर्डर-गावस्कर ट्रॉफीचा पहिला सामना हरल्यानंतर ऑस्ट्रेलियाचा वेगवान गोलंदाज जोश हेझलवूडने एक विधान केले, त्यामुळे ऑस्ट्रेलियन संघाच्या एकतेवर प्रश्न उपस्थित होत आहेत. जोश म्हणाला, कदाचित तुम्हाला हा प्रश्न एखाद्या फलंदाजाला विचारावा लागेल, मी थोडी विश्रांती घेण्याचा प्रयत्न करत आहे. मी पुढील कसोटीवर लक्ष केंद्रित करत आहे.

### अर्जुन तेंडुलकरवर बोली

**मुंबई :** मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकरचा मुलगा अर्जुन तेंडुलकर पुन्हा एकदा मुंबई इंडियन्समध्ये शामिल झाला आहे. आयपीएल २०२५ च्या मेगा लिलावात मुंबईने त्याला त्याची बेस प्राईज ३० लाख रुपयांत खरेदी केले. अर्जुन सुरुवातीला अनसोल्ड राहिला होता. अखेर मुंबई इंडियन्सचे मालक आकाश अंबानी यांनी त्याच्यावर बोली लावली. अपेक्षेप्रमाणे इतर कोणत्याही संघाने त्याच्यात रस दाखवला नाही.

# गतविजेत्या डिंग लिरेनचा विजय

**। सिंगापूर । वृत्तसंस्था ।**

भारताचा युवा ग्रँडमास्टर दोम्माराजू गुकेशला जागतिक अजिंक्यपद बुद्धिबळ लढतीच्या पहिल्या डावात चांगल्या सुरुवातीचा फायदा करून घेण्यात अपयश आले आहे.विद्यमान जगज्जेत्या चीनच्या डिंग लिरेनकडून त्याला हार पत्करावी लागली. त्यामुळे १४ डावांच्या या लढतीत डिंगने १-० अशी आघाडी मिळवली आहे.

गेल्या काही काळापासून लय गमावून बसलेला डिंग डावाच्या सुरुवातीला अडखळताना दिसला. त्याने चाली रचण्यासाठी बराच वेळ घेतला. पांढऱ्या मोहऱ्यांनी खेळणाऱ्या गुकेशने आक्रमक सुरुवात करताना आपले वर्चस्व प्रस्थापित केले होते. मात्र, डावाच्या मध्यात त्याच्याकडून चुकीची चाल रचली गेली. त्यामुळे डिंगचा पुनरागमनाचा मार्ग मोकळा झाला. त्याने आपले मोहरे पटाच्या मध्यावर आणण्यास सुरुवात केली. त्यामुळे गुकेशला चाली रचण्यासाठी आपला वेळ घ्यावा लागला. वेळेचे गणित साधताना त्याच्यावर बरेच दडपण आले आणि ४२ चालींअंती त्याने हार पत्करली.

डिंग लिरेनने २०२३ मध्ये विश्वविजेता होण्याचा मान संपादन केला होता. त्यावेळी डिंग लिरेन याने इयान नेपोनियात्ची याला पराभूत केले होते.

**पहिल्या डावात गुकेशची हार**



**अनपेक्षित सुरुवात**

गुकेशने अनपेक्षित पहिली चाल खेळताना आपला राजा पुढे केला. यासह आपले आक्रमक मनसूबे त्याने स्पष्ट केले. याच्या प्रत्युत्तरात डिंगने फ्रेंच बचावपद्धती अवलंबली. गुकेशच्या अनपेक्षित सुरुवातीमुळे डिंगला चाली रचण्यासाठी बराच विचार करावा लागला. पुढील आठ चालींनंतर डिंगकडे अधिक वेळ शिल्लक होता. त्यामुळे सुरुवातीच्या अडचणीतून डिंग बाहेर पडल्याचे स्पष्ट झाले होते. त्यानंतर गुकेश वेळेवर नियंत्रण राखण्यात अपयशी ठरला. केवळ दोन सेकंद शिल्लक असताना गुकेशने आपली ४०वी चाल खेळली. मात्र, डिंगने तोवर पटावर भक्कम स्थिती मिळवली होती. पुनरागमनाची शक्यता नसल्याने गुकेशने ४२व्या चालीअंती हार मानली.

> डिंग लयीत नसल्याचे म्हटले जात होते. मात्र, जगज्जेतेपदाच्या लढतीत तो त्याचा सर्वोत्तम खेळ करेल हे मला अपेक्षित होते आणि तसेच झाले. ही लढत प्रदीर्घ काळ चालणार आहे. अद्याप बरेच डाव शिल्लक आहेत. आता या लढतीतील चुरस वाढली आहे.
> – युवा ग्रँडमास्टर डी. गुकेश

> काळ्या मोहऱ्यांनी खेळताना प्रतिस्पर्ध्याला हरविणे हे खूप मोठे यश मानले जाते. डिंगने हे पहिल्याच डावात करून दाखवले. आता गुकेश या पराभवातून कसा सावरतो हे पाहणे महत्त्वाचे ठरेल. डिंगच्या तुलनेत गुकेशच्या गाठीशी अनुभव कमी आहे. मात्र, त्याच्यासाठी सकारात्मक बाब म्हणजे अजूनही १३ डाव शिल्लक आहेत. त्यामुळे त्याला पुनरागमनाची पुरेशी संधी आहे.
> – रघुनंदन गोखले, द्रोणाचार्य पुरस्कार विजेते बुद्धिबळ प्रशिक्षक.

त्या लढतीत रिचर्ड रॅपोर्ट हा व्यक्ती डिंग लिरेन याचा ट्रेनर होता. यंदाही डिंग लिरेन याने रॅपोर्ट यालाच ट्रेनर म्हणून निवडले आहे. डिंग लिरेन याने या लढतीत फ्रेंच डिफेन्सने ओपनिंग केली होती.

## तन्मई कराटे स्पर्धेत पहिली

**। अलिबाग । वार्ताहर ।**

पालघर क्रीडा संकुलात सोमवारी (दि.२५) शालेय मुंबई विभागीय कराटे स्पर्धा संपन्न झाल्या. या स्पर्धेत जय शोतोकाण कराटे अँड स्पोर्ट अकॅडमी संघटनेची तन्मई सुधीर पाटील हिने १९ वर्षाखालील ६५ किलो वजनी गटामध्ये सुवर्णपदक पटकावले आहे.

तन्मई पाटील ही पेझारीच्या ना.ना. पाटील हायस्कूलची विद्यार्थीनी आहे. तन्मई ही संतोष कवळे यांच्या मार्गदर्शनाखाली कराटे प्रशिक्षण सूर्योदय पेझारी साई मंदिर हॉल येथे घेत आहे. तसेच, ती नवीन मुलांना स्वतः प्रशिक्षण देत आहे. तन्मई ब्लॅक बेल्ट असून पंजाब येथे झालेल्या गतका मार्शल आर्ट या राष्ट्रीय स्पर्धेत सुवर्णपदक पटकावले होते. त्यामुळे तिची महाराष्ट्र ऑलिम्पिकतर्फे होणाऱ्या खेलो इंडिया या राष्ट्रीय स्पर्धेसाठी देखील निवड झाली आहे. या यशाचे श्रेय तिने आई-वडील तसेच कराटे मुख्य प्रशिक्षक



संतोष कवळे, राष्ट्रीय खेळाडू जिज्ञासा पाटील व शिक्षक पुरुषोत्तम पिंगळे यांना दिले आहे.

तन्मई पाटीलची पुणे बालेवाडी येथे होणाऱ्या शालेय कराटे राज्य स्पर्धेसाठी निवड झाली आहे. त्याबद्दल ना.ना. पाटील हायस्कूलचे चेअरमन माजी आ. पंडित पाटील व मुख्याध्यापक शशिकांत पाटील यांनी विशेष अभिनंदन केले व पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# वैभव सूर्यवंशीने रचला इतिहास

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

आयपीएल २०२५ मेगा लिलावाच्या दुसऱ्या दिवशी १३ वर्षीय फलंदाजाने इतिहास रचला आहे. बिहारचा फलंदाज वैभव सूर्यवंशी आयपीएल लिलावात विकला जाणारा सर्वात तरुण खेळाडू ठरला आहे. या खेळाडूला विकत घेण्यासाठी राजस्थान रॉयल्स आणि दिल्ली कॅपिटल्समध्ये स्पर्धा लागली होती, ज्यामध्ये अखेर राजस्थान रॉयल्सने बाजी मारली. राजस्थानने वैभव सूर्यवंशीसाठी १.१० कोटी मोजत आपल्या ताफ्यात सामील केले.

वैभव १३ वर्षांचा असून तो भारताच्या अंडर-१९ संघातून खेळला आहे. लिलावात विकल्या जाण्यापूर्वीच, वैभवने इतिहास रचला होता, जेव्हा तो आयपीएल लिलावात सहभागी होणारा सर्वात तरुण खेळाडू ठरला होता. दिल्ली कॅपिटल्सने या तरुण स्टारसाठी पहिली बोली लावली, मूळ किंमत तीस लाख रु. होती. दिल्ली कॅपिटल्सने त्याच्यासाठी १ कोटी रुपयांपर्यंत बोली लावली, पण शेवटी राजस्थानने बाजी मारली. वैभवला आता माजी भारतीय प्रशिक्षक आणि महान क्रिकेटपटू राहुल द्रविड यांच्याकडून क्रिकेटचे धडे गिरवण्याची संधी मिळणार आहे.

वैभव सूर्यवंशी हा बिहार मधील समस्तीपूर येथील रहिवासी आहे. वैभव सूर्यवंशीने याआधीच मैदानावर आपल्या असामान्य कामगिरीने इतिहास रचला आहे. २०२३-२४ रणजी ट्रॉफी हंगामात, त्याने वयाच्या १२ वर्षे आणि २८४ दिवसांत मुंबईविरुद्ध पदार्पण केले आणि असे करणारा तो स्पर्धेच्या इतिहासातील सर्वात तरुण खेळाडू ठरला. या कामगिरीसह त्याने सचिन तेंडुलकर-युवराज सिंग यांसारख्या महान क्रिकेटपटूंचे विक्रम मोडीत काढले.




## रत्नागिरी जिल्ह्याचा द्वितीय क्रमांक

**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**

जळगाव जिल्हा तायक्वांदो असो. तथा तायक्वांदो असो. ऑफ महाराष्ट्र मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने २१ ते २३ नोव्हेंबर रोजी महाराष्ट्र राज्य सब-ज्युनियर क्योरोगी अंजिक्यपद तायक्वांदो स्पर्धा व पुमसे स्पर्धा जळगाव येथील छ. शिवाजी महाराज जिल्हा क्रिडा संकुलात आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत क्योरीगी व पुमसेत रत्नागिरी जिल्हाने द्वितीय क्रमांक पटकावला आहे. तसेच, या स्पर्धेतील सुवर्णपदक विजेते १४ मुले व १४ मुलींची हरियाणा येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेसाठी महाराष्ट्र संघात निवड झाली आहे.

रत्नागिरीच्या अर्थव मुरुकुटे (सुवर्णपदक) याची राष्ट्रीय स्पर्धसाठी महाराष्ट्र संघात निवड झाली आहे. तर, बरखा संदे, मृण्मयी वांयगणकर यांनी रौप्यपदक तसेच दुर्वा हातिसकर हिने कांस्यपदक पटकावले आहे. या खेळाडूंना मार्गदर्शन करणारे प्रशिक्षक गणराज क्लबचे महाराष्ट्र राज्य स्वयंमसिध्दा प्रशिक्षक प्रशांत मकवाना व प्रशिक्षक शाहरुख शेख यांचे मार्गदर्शन लाभत आहे. यावेळी विजय शिंदे, डॉ. अविनाश बारगजे, मिलिंद पठारे, वेंकटेश कररा, नरज बोरसे, दुलीचंद मेश्राम, प्रवीण बोरसे, सुभाष पाटील, अजित घार्गे आदींनी शुभेच्छा दिल्या आहेत.



## गौतम गंभीर मायदेशात परतला

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

पर्थ कसोटीतील निकालानंतर मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर तातडीने मायदेशात परतणार आहे. गंभीरच्या अनुपस्थितीत सहाय्यक प्रशिक्षक अभिषेक नायर आणि रायन टेन डोएश्चॅट, गोलंदाजी प्रशिक्षक मॉर्ने मॉर्केल आणि क्षेत्ररक्षक प्रशिक्षक टी दीपिल हे सराव सामन्यावर लक्ष ठेवून असतील. गंभीर वैयक्तिक कारणामुळे मंगळवारी मायदेशात परतणार आहे आणि दुसऱ्या कसोटीला सुरुवात होण्यापूर्वी तो पुन्हा ऑस्ट्रेलियात दाखल होईल. त्याने वैयक्तिक कारण सांगितले आहे आणि बीसीसीआयने त्याची विनंती मान्य केली आहे, असे बीसीसीआयच्या सूत्रांनी सांगितले.

## क्रीडामंत्री मांडविया यांची भेट

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक समितीच्या (आयओसी) नव्या अध्यक्षपदाचे एक उमेदवार आणि जागतिक ॲथलेटिक्सचे अध्यक्ष सेबॅस्टियन को यांनी सोमवारी केंद्रीय क्रीडामंत्री मनसुख मांडविया यांची भेट घेऊन २०३६ ऑलिम्पिक आयोजनाविषयी त्यांच्या भावना जाणून घेतल्या. तसेच, या दोघांत देशातील ॲथलेटिक्स विकासाबाबत चर्चा केली.

चार वेळा ऑलिम्पिक विजेते राहिलेले सेबॅस्टियन को हे आगामी आयओसीफ निवडणुकीत अध्यक्षपदाचे उमेदवार आहेत. भारताचे समर्थन मिळवणे हा



को यांच्या भारत दौऱ्याचा मुख्य भाग होता. यादरम्यान त्यांनी वेळ काढून क्रीडामंत्री मांडविया यांची भेट घेऊन त्यांच्याशी चर्चा केली. त्यानंतर सायंकाळी त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचीही औपचारिक भेट घेतली.

भारताने गेल्याच महिन्यात २०३६ ऑलिम्पिक स्पर्धेच्या

**■ देशातील ॲथलेटिक्स विकासाबाबत चर्चा**

आयोजनाबाबत इरादा पत्र सादर केले आहे. मांडविया यांनी को यांना ऑलिम्पिक आयोजनामागील सर्व योजना आणि मुख्य हेतू सांगितला. भारताची ऑलिम्पिक आयोजित करण्याची महत्त्वाकांक्षा असून, देशाचा सांस्कृतिक आणि क्रीडा वारसा जगासमोर दाखविण्यासाठी आम्ही इच्छुक आहोत. या मोहिमेत सरकार, उद्योगविश्व आणि सर्व जनतेचा आम्हाला पाठिंबा आहे, असे मांडविया म्हणाले.

## कायरा घरतची उत्कृष्ट कामगिरी

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

अलिबाग तालुक्यातील चेंढरे येथे नुकतीच कराटे स्पर्धा पार पडली. या स्पर्धेत चौलमधील कायरा अक्षय घरत हीने उत्कृष्ट कामगिरी करीत यश संपादन केले. तिच्या या यशाबद्दल सर्व स्तरातून अभिनंदन व कौतूक करण्यात येत आहे.

कायरा घरत ही चौल शितळादेवी येथील रहिवासी आहे. साळाव येथील जिंदाल विद्यामंदिर मध्ये ती शिक्षण घेत आहे. चेंढरे ग्रामपंचायतीच्या सभागृहात रविवारी (दि.२४) कराटे स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. कायरा घरत हीने या स्पर्धेत सुवर्ण पदक मिळवले असून उत्कृष्ट फायटर म्हणून चषक प्राप्त



केले आहे. पालकांकडून मिळालेले प्रोत्साहन आणि प्रशिक्षक राहूल तावडे यांच्याकडून मिळालेल्या मार्गदर्शनातून कायरा घरत हीने आतापर्यंत १२ हून अधिक पदके व चषक प्राप्त केले आहेत. त्यामध्ये कांस्य, सुवर्ण रौप्य पदकांचा समावेश आहे.

## लिलावात वेगवान गोलंदाजांना मागणी

**। जेद्दा । वृत्तसंस्था ।**

दोन वर्षांहून अधिक काळ भारतीय संघातून बाहेर असलेल्या भुवनेश्वर कुमारने आपल्या अनुभवाच्या जोरावर इंडियन प्रीमियर लीगमधील संघांना लिलावाच्या दुसऱ्या दिवशी आकर्षित करण्यात यश मिळवले. रॉयल चॅलेंजर्स बंगळूरुने त्याला १० कोटी ७५ लाख रुपयांना आपल्या ताफ्यात घेतले. भुवनेश्वरसह भारतीय वेगवान गोलंदाजांसाठी मोठी मागणी पाहायला मिळाली.

गेल्या काही काळापासून दुखापतींचा सामना करत असलेल्या दीपक चहरला मुंबई इंडियन्सने नऊ कोटी २५ लाख रुपयांना आपल्या संघात घेतले. कसोटी संघातील

**■ भूवनेश्वर कुमारला लिलावात संघ मालकांना आकर्षित करण्यात यश**

राखीव खेळाडू मुकेश कुमारसाठी दिल्ली कॅपिटल्स संघाने आरटीएमफ कार्डचा वापर करत ८ कोटी रुपये खर्च केले. आकाश दीपला लखनऊ सुपर जायंट्सने ८ कोटी रुपयांना आपल्या ताफ्यात घेतले.

भुवनेश्वरने आतापर्यंत २८७टी-२० सामन्यांत ३०० बळी मिळवले. त्याने भारताकडून अखेरचा सामना



नोव्हेंबर २०२२ मध्ये न्यूझीलंडविरुद्ध खेळला होता. मात्र, आयपीएलमध्ये त्याला कामगिरीत सातत्यराखण्यात यश आले आहे.

मुंबईकर वेगवान गोलंदाज तुषार देशपांडेला राजस्थान रॉयल्सने तब्बल ६ कोटी ५० लाख रुपयांना संघात सहभागी करून घेतले. चेन्नई सुपर किंग्ज आणि राजस्थान यांच्यात तुषारसाठी बरीच चढाओढ पाहायला मिळाली. अखेर राजस्थानने बाजी मारली.

**नायजेरिया संघाचा जागतिक विक्रम**

# अवघ्या सात धावांत प्रतिस्पर्धींना गुंडाळले

**। केप टाउन । वृत्तसंस्था ।**

नायजेरियाच्या संघाने टी-२० विश्वचषक आफ्रिका उप खंडीय पात्रता स्पर्धेतील सामन्यात आयव्हरी कोस्टावर २६४ धावांनी दणदणीत विजय मिळवला आहे. आंतरराष्ट्रीय टी-२० क्रिकेटमधील हा सर्वात मोठा विजय ठरला आहे. नायजेरियाच्या गोलंदाजांनी प्रतिस्पर्धींना अवघ्या ७ धावांत गुंडाळले आणि आंतरराष्ट्रीय टी-२०तील ही सर्वात निचांक काशगिरी ठरली आहे. यापूर्वी



सिंगापूर संघाने सप्टेंबरमध्ये मंगोलियाचा संपूर्ण संघ १० धावांत तंबूत पाठवला होता.

दरम्यान, नायजेरीयाने प्रथम फलंदाजी करताना ४ बाद २७१ धावांचा डोंगर उभा केला होता.

**■ नायजेरियाचा आयव्हरी कोस्टावर दणदणीत विजय**

**■ टी-२० क्रिकेटमधील सर्वात मोठा विजय**

सलामीवीर सुलैमन रुन्सेवे आणि सेलिम सालाऊ यांनी पहिल्या विकेटसाठी १२८ धावांची भागीदारी केली. सुलेमन २९ चेंडूंत ८ चौकारांच्या मदतीने ५० धावांवर बाद झाला. हा गडी गमावल्यानंतर नायजेरीच्या मधल्या फळीने निराश केले. पण सेलिम व इसाक ओक्पे यांनी तुफान फटकेबाजी केली. सेलिम ५३ चेंडूंत १३ चौकार व २ षटकारांच्या मदतीने ११२ धावांवर रिटायर हर्ट झाला. ओक्पेने २३ चेंडूंत ३ चौकार व ६ षटकारासह ६५ धावांची खेळी केली. आयव्हरी कोस्टाने २३ अतिरिक्त धावा दिल्या.

प्रत्युत्तरात आलेल्या आयव्हरी कोस्टा संघाला ७.३ षटकांत ७ धावांवर गाशा गुंडाळावा लागला. त्यांचे सहा फलंदाज शून्यावर बाद झाले. सलामीवीर क्काटारा मोहम्मद हा ४ धावाकरून संघाकडून सर्वाधिक धावा करणारा फलंदाज ठरला.

नायजेरीच्या इसाक डनलाडीने २-०-२-३ आणि प्रॉस्पर उसेनीने १.३-१-०-३ यांनी अप्रतिम स्पेल टाकली. पीटर आहोने २-२-०-२ अशी गोलंदाजी केली, तर सीलव्हेस्टर ओक्पेने ५ धावांत १ बळी घेतला.

## भारत पुन्हा क्रमांक एकवर

**। पर्थ । वृत्तसंस्था ।**

भारतीय संघाने सोमवारी (दि.२५) पर्थमध्ये १६ वर्षांनंतर पुन्हा इतिहास घडवला. भारताने ऑस्ट्रेलियाला पर्थमध्ये कसोटी सामन्यात पराभवाचा धक्का दिला. बॉर्डर-गावसकर ट्रॉफी या ५ सामन्यांच्या कसोटी मालिकेतील पहिला सामना ऑप्टस स्टेडियमवर झाला. या सामन्यात भारताने २९५ धावांनी विजय मिळवला. त्यामुळे भारताने ५ सामन्यांच्या कसोटी मालिकेत १-० अशी आघाडीही घेतली आहे. याशिवाय भारताला जागतीक कसोटी अंजिंक्यपदाच्या क्रमवारीतही मोठा फायदा झाला आहे.

बॉर्डर-गावसकर चषक



जागतीक कसोटी अजिंक्यपद २०२३-२५ स्पर्धेचा भाग आहे. या मालिकेपूर्वी भारताला न्यूझीलंडविरुद्ध मायदेशात कसोटी मालिकेत पराभवाचा धक्का बसला होता. त्यामुळे भारताने गुणतालिकेमधील अव्वल स्थानही गमावले होते. मात्र, आता भारताने ऑस्ट्रेलियाला पहिल्या सामन्यात पराभूत केल्याने पुन्हा अव्वल स्थानावर कब्जा केला आहे. भारताने गुणतालीकेते ६१.११ टक्केवारीसह अव्वल स्थान मिळवले आहे.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ I MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)